सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २१ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १३२ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |


ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### सलग चौथ्या दिवशी बाजारांत तेजी

**मुंबई :** अमेरिकी फेडरल रिझर्व्हने या वर्षासाठी व्याजदर कपातीचा अंदाज कायम ठेवल्यानंतर जागतिक शेअर बाजारांत संमिश्र कल असला तरी, देशातील बाजारांत सर्व स्तरावर खरेदीचा उत्साह दिसून आल्याने गुरुवारी सलग चौथ्या दिवशी शेअर बाजारातील तेजी कायम राहिली. रिलायन्स इंडस्ट्रीज, भारती एअरटेल आणि माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांमध्ये झालेल्या दणकेबाज खरेदीमुळे गुंतवणूकदारांच्या भावना उंचावल्या. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ८९९ अंकांनी उसळून ७६,३४८ या पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २८३ अंकांनी वधारून २३,१९० या पातळीवर बंद झाला. शेअर बाजारात परतलेल्या तेजीमुळे मागील चार दिवसांत कंपन्यांच्या बाजार भांडवल १७.४३ कोटी रुपयांनी वाढून ते ४,०८,६१,८५१ कोटी रुपयांवर पोहोचले.



### चारधाम यात्रेसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू

**डेहराडून :** भाविकांची सुरक्षा आणि सुविधेसाठी चारधाम यात्रेकरिता ऑनलाईन आधार नोंदणी करण्यास प्रारंभ झाला आहे. यात्रेकरिता ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य असून, दर्शनासाठी टोकन दिले जाणार आहे. त्यानुसार दर्शनाची वेळ आणि तारीख निश्चित करण्यात येणार आहे. उत्तराखंड सरकारच्या पर्यटन विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकानुसार, चारधाम यात्रा करणाऱ्या भाविकांना उत्तराखंड सरकारने आनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. ऑनलाईन नोंदणीशिवाय ही यात्रा करता येणार नाही. नोंदणीसाठी आधार कार्ड अनिवार्य राहणार आहे. भाविकांना त्यांच्या सोयीनुसार तारीख निश्चित करायची असून, उत्तराखंडच्या पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन नोंदणी करायची आहे. ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी टोकन उपलब्ध केले जाईल. त्यात दर्शनाची तारीख आणि वेळेचा समावेश राहणार आहे. भाविकांची सुरक्षा आणि सुविधा लक्षात घेता चारधाम यात्रेसाठी नोंदणी अनिवार्य करण्यात आली. नोफ्लदणीनंतर टोकनवर आलेल्या तारखेनुसारच यात्रा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सरकारी शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न

**मुंबई :** आगामी शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येत असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज सभागृहात दिली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षापासून सीबीएसई पॅटर्न लागू होणार असून, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीला लागावी, यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे दादा भुसे यांनी म्हटले आहे. राज्य अभ्यासक्रमाच्या आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संबंधित सुकाणू समितीने देखील मान्यता दिली असल्याची माहिती दादा भुसे यांनी विधान परिषदेत प्रश्नावर लेखी उत्तर देताना दिली आहे. आमदार प्रसाद लाड यांनी यासंबंधी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना दादा भुसे यांनी हे उत्तर दिले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याला सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करून दिली आहे.

### ५४ हजार कोटींच्या संरक्षण खरेदीस मंजुरी

**नवी दिल्ली :** देशाच्या संरक्षण सिद्धतेत मोठी वाढ होणार असून, ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदीस गुरुवारी मंजुरी देण्यात आली. यात एअरबॉर्न अर्ली वॉर्निंग ॲण्ड कंट्रोल एअरक्राफ्ट सिस्टिम, टॉर्पिडो आणि टी-९० रणगाड्यांच्या इंजिनचा समावेश आहे. भांडवल अधिग्रहण प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर लागणारा वेळ कमी करण्यासाठी संरक्षण अधिग्रहण परिषदेने (डीएसी) मार्गदर्शक तत्त्वांनाही मान्यता दिली, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.

# फहीम खानवर देशद्रोहाचा गुन्हा

### सखोल चौकशीसाठी सर्वांना घेणार ताब्यात

### आज करणार न्यायालयात हजर

◆ **नागपूर, २० मार्च**

फहीम खानसह २९ जणांवर देशविरोधी कृत्य केल्याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनात संशयित सोशल मीडिया अकाऊंट धारकाविरुद्ध बुधवारी रात्री हा एफआयआर दाखल करण्यात आला.

एफआयआरनुसार आयपीसी १५२, १९२, १९६, ३५३, (१ बी), ३५३(१ सी), ३५३ (२) आयटी ॲक्ट ६७ प्रमाणे एकूण चार एफआयआरमध्ये २९ जणांविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सोशल मीडियावरून दंगल, हिंसा भडकविणे आणि पोलिस दलाविरुद्ध हिंसेस प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने इन्स्टाग्राम, एक्स या समाजमाध्यमांवर चलचित्र, छायाचित्र, ध्वनिफितीच्या फाईल अपलोड करून पोस्ट शेअर करण्यात आल्या, असा एफआयआरमध्ये उल्लेख आहे.

याशिवाय दोन गटांत धार्मिक तेढ निर्माण करणे, हिंसेला प्रवृत्त करणे, धार्मिक ग्रंथाबाबत चुकीचा समज पसरविणे, सांप्रदायिक दंगा भडकविणे, पोलिसांच्या कायदेशीर कृतीला बेकायदेशीर ठरविणे आणि धार्मिक तेढ निर्माण करणारी नारेबाजी केल्याप्रकरणी २९ जणांविरुद्ध नव्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यशोधरानगर येथील रहिवासी फहीम खान शमीम खान हा मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचा शहर अध्यक्ष आहे. त्याने २०२४ मध्ये निवडणूक लढविली होती. त्याला एक हजार ७३ मते मिळाली होती. राजकीय क्षेत्रात असल्याने पक्षाशी संबंधित कार्यकर्ते त्याच्याशी जुळले आहेत. फहीम या घटनेशी संबंधित असल्याचे काही व्हिडीओ पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. पोलिस केवळ आश्वासन देऊ शकतात. हा लढा आपल्याला लढावा लागेल, अशी त्याची समाजमाध्यमावर पोस्ट आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### आयडी तपासणीसाठी पाठविल्या कंपनीकडे

सायबर पोलिस ठाण्यात नव्याने चार एफआयआर दाखल करण्यात आले. यात २९ लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या सर्वांच्या आयडी तपासून ओळख पटविण्यासाठी मोबाईल कंपनीकडे पाठविण्यात आल्या आहेत. ७२ तासांत माहिती येणे अपेक्षित आहे. माहिती मिळाल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल. गणेशपेठ प्रकरणात गुरुवारी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी दिल्यास सर्वांना ताब्यात घेण्यात येईल.

**लोहित मतानी,**
पोलिस उपायुक्त, सायबर क्राईम

### संचारबंदीने करून दिली टाळेबंदीची आठवण

घरी कोंडल्यासारखे वाटते. कधी उठेल संचारबंदी, असा प्रश्न नागरिकांना पडला होता. एकमेकांना विचारणा होत होती. विशेष म्हणजे या संचारबंदीने नागरिकांना टाळेबंदीची आठवण करून दिली. आता परिस्थिती नियंत्रणात आल्याने नंदनवन आणि कपिलनगर ठाण्यांच्या हद्दीतील संचारबंदी पूर्णपणे उठविण्यात आली आहे, तसेच सहा ठाण्यांच्या हद्दीत दोन तासांची सूट देण्यात आली आहे. परिस्थिती सामान्य होताच अन्य ठाण्यांच्या हद्दीतीलही संचारबंदी लवकरच उठविली जाईल.

# छत्तीसगडमध्ये ३० नक्षल्यांचा खात्मा

### बिजापूर, कांकेरमध्ये कारवाई; जवान हुतात्मा

### कमांडर हिडमाचा १२५ गावांमध्ये शोध

◆ **बिजापूर/कांकेर, २० मार्च**

नक्षलवाद्यांच्या विरोधातील मोहिमेला सुरक्षा दलांनी मोठा वेग देत छत्तीसगडमध्ये बिजापूर आणि कांकेरमध्ये गुरुवारी झालेल्या चकमकीत तब्बल ३० नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. मात्र, या कारवाईत एका जवानाला वीरमरण आले. दोन्ही ठिकाणच्या चकमक स्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

जिल्हा राखीव रक्षक आणि सीमा सुरक्षा दल अर्थात्? बीएसएफने केलेल्या या संयुक्त कारवाईत बिजापुरात २६, तर कांकेरमध्ये चार माओवाद्यांना ठार करण्यात आले. बिजापुरातील चकमकीत पोलिस जवान हुतात्मा झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

येत्या काही दिवसांत नक्षलवाद्यांच्या विरोधातील कारवाया अधिक तीव्र होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सुरक्षा दल नक्षलवादी कमांडर हिडमाच्या मागावर असून, त्याचा शोध घेण्यासाठी छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्रप्रदेशच्या सीमेवरील १२५ गावांचे थर्मल इमेजिंग केले जात आहे. हिडमा नक्षलवाद्यांचा मोठा प्रभाव असलेल्या गावांमध्ये लपला असल्याची सुरक्षा दलाला शंका आहे. या १२५ गावांमध्ये नक्षलवाद्यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे सुरक्षा दल हिडमाला शोधून काढण्यासाठी एनटीआरओची मदत घेत आहे. याच्या मदतीने या परिसराचे मॅपिंग केले जाणार आहे. या परिसरात सुरक्षा दल कारवाईसाठी जाईल, त्यावेळी त्यांना येथील रस्त्यांची पूर्ण माहिती असेल. सोबतच नक्षलविरोधी मोहिमांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्यासाठी मदत मिळेल.

जिल्हा राखीव रक्षक आणि बीएसएफचे संयुक्त पथक कांकेर नारायणपूर जिल्ह्यातील सीमेवर गस्त घालत असताना आणखी एक चकमक झडली, अशी माहिती कांकेरचे पोलिस अधीक्षक इंदिरा कल्याण एल्सेला यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)



### नारायणपूरमध्ये आयईडी स्फोट

सुरक्षा दलाला लक्ष्य करून नक्षलवाद्यांनी नारायणपूर येथे गुरुवारी सकाळी आयईडीचा स्फोट घडवला. स्फोटामुळे उडालेल्या धूळ व मातीमुळे एका अधिकाऱ्यासह दोन पोलिसांच्या डोळ्याला दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### देश नक्षलमुक्त करू : अमित शाह

**सर्व सुविधा देऊनही शरण न येणाऱ्या नक्षलवाद्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. नक्षलमुक्त भारताच्या दिशेने आज आपल्या जवानांनी मोठे यश मिळवले आहे. पुढील वर्षी ३१ मार्चपर्यंत देश नक्षलमुक्त होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये व्यक्त केली.**

'बिजापूरच्या गंगलूर पोलिस ठाण्यातील बिजापूर-दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवरील जंगलात आज सकाळी सातच्या सुमारास नक्षलविरोधी मोहीम राबवणाऱ्या सुरक्षा दलाचा आमना-सामना नक्षलवाद्यांसोबत झाला. गोळीबार थंडावल्यानंतर घटनास्थळी २६ नक्षल्यांचे मृतदेह, मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आढळला.यात जिल्हा राखीव दलाचा जवान हुतात्मा झाला.'

**पी. सुंदरराज,**
पोलिस महानिरीक्षक

# शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची विधानसभेत घोषणा

◆ **मुंबई, २० मार्च**

राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांना जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात याबाबतची घोषणा केली. मागील महिन्यात सुतार यांचा शंभरावा वाढदिवस साजरा करण्यात आला.

'स्टॅच्यू मॅन' अशी ओळख असलेले राम सुतार हे सुप्रसिद्ध भारतीय शिल्पकार आहेत. त्यांचे पूर्ण नाव राम वंजी सुतार असे आहे. धुळे जिल्ह्यातील गोंदूर या खेडेगावात त्यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती अत्यंत बेताची होती. त्यांचे बालपण अतिशय खडतर आणि संघर्षाच्या स्थितीत गेले. परंतु, लहानपणापासून त्यांना शिल्पकलेची आवड होती. पुढे त्यांना त्यांच्या शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. राम सुतार पुढील शिक्षणासाठी मुंबईतील सर जेजे आर्ट ऑफ स्कूलमध्ये आले. प्रतिरुपण व शिल्पकलाविषयक पदविका मिळवली.

खरंतर राम सुतार महात्मा गांधी यांच्या मुर्तीसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी तयार केलेल्या महात्मा गांधी यांच्या मूर्ती ५० पेक्षा जास्त देशांत बसवण्यात आलेल्या आहेत. संसद भवनात स्थापित करण्यात आलेले महात्मा गांधी यांचे शिल्पही राम सुतार यांनीच तयार केले आहे. राम सुतार यांनी जगाच्या कानाकोपऱ्यात शेकडो शिल्पे साकारली आहेत. त्यांचे प्रत्येक शिल्प अप्रतिम आणि सौंदर्याचा अद्भुत नमूना आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचा जगातील सर्वांत उंच गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी', देशाच्या संसदेतील महात्मा गांधींचा पुतळा, दिल्लीतील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, जवाहरलाल नेहरू, गोवद वल्लभ पंत यांच्यासह अन्य नेत्यांचे शिल्पही राम सुतार यांनी तयार केले आहेत.



सध्या राम सुतार केम्पेगौडा येथे एक ९० फूट उंचीची मूर्ती तयार करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्य सरकारने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला. ◂(तभा वृत्तसेवा)

### कठुआत पाकिस्तानी घुसखोराला अटक

**जम्मू :** जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमेवर सुरक्षा दलांनी एका पाकिस्तानी घुसखोराला अटक केली, अशी माहिती पोलिस सूत्रांनी गुरुवारी दिली.

हिरानगर सेक्टरमधील सीमेवर एका संशयास्पद व्यक्तीची हालचाल सुरक्षा दलाच्या जवानांनी बुधवारी रात्री टिपली होती. संशयिताला ताब्यात घेण्यापूर्वी जवानांनी इशारा देत बंदुकीच्या काही फैरी हवेत झाडल्या. कबीर बक्ष असे या घुसखोराचे नाव आहे. तो पाकिस्तानातील चिनियोट तहसीलमधील गफुराबाद येथील रहिवासी आहे. त्याची कसून चौकशी केली जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# युद्धबंदीवर झेलेन्स्की, पुतिन सहमत

**किव, २० मार्च**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीने रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी ३० दिवसांच्या मर्यादित युद्धबंदीवर सहमती दर्शवली आहे. या अंतर्गत ऊर्जा प्रकल्प, पायाभूत सुविधांवरील हल्ले रोखण्यात येणार आहे. तथापि युद्धबंदी करार केव्हापासून लागू होणार यासंदर्भात भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही.

ट्रम्प यांनी मंगळवारी रात्री पुतिन यांच्याशी फोनवरून चर्चा केल्यानंतर त्यांनी अटी, शर्तीसह मर्यादित युद्धबंदी करारास सहमती दर्शवली होती. बुधवारी झेलेन्स्की यांनी ट्रम्प यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर झेलेन्स्की यांनी मर्यादित युद्धबंदी करारास सहमत असल्याची भूमिका जाहीर केली. या करारांतर्गत दोन्ही देश एकमेकांच्या ऊर्जा प्रकल्प आणि पायाभूत सुविधांवर हल्ले करणार नाहीत. युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यात येणार असल्याचे दोन्ही नेत्यांनी स्पष्ट केले. झेलेन्स्की यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, सौदी अरम येथे युद्धबंदी करारासंदर्भात चर्चा झाली असून, त्यावर आमची सहमती आहे. त्यानुसार पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यात येईल. ट्रम्प यांनी रशियाशी चर्चा केल्यानंतर मी कराराला पाठिंबा दिला. कराराची तातडीने अंमलबजावणी व्हावी अशी आमची इच्छा आहे.



# वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची हजेरी

### गहु, ज्वारी, द्राक्ष, आंबे, चिक्कू, केळी, टरबुजला फटका

**अक्कलकोट दि २० मार्च-**

अक्कलकोट शहर व तालुक्याच्या अनेक भागात गुरुवारी संध्याकाळी ८.३० वाजेच्या सुमारास वादळी वारे विजेचा लखलखा कडकडाट व मेघ गर्जनेसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. तालुक्यात काढणीस आलेले ज्वारी गहू जोड हरभरा आदि पिकांचे रास मळणी होणे बाकी आहे. आंबे द्राक्ष केळी कलंगड टरबुज टमाटे आदि फळ बागाना या वादळी वारा पाऊस यामुळे फटका बसण्याची शक्यता आहे .



गुरुवारी दिवसभर उकाडा तीव्र होता. सुर्य नारायणाचा प्रकोप वाढला होता. दुपारी वांबां ळ पडत होती रात्री ८.३० दरम्यान विजेचा लखलखाट ढगांचा गडगड ट वादळी वारे चालु झाले पावसाच्या सरी कोसळल्या. उष्ण असलेले वातावरण पालटण्यास सुरवारत झाली. हन्नूर चुंगी चप्पळगाव दहिटण कुरनुर सांगवी मिरजगी निमगाव बोरी उमरगा मातन हळळी उडगी बासले गाव स्टेशन कडबगा व हसापुर आदि भागात वादळी वारा पाऊस झाला. यामुळे रात्री वीज पुरवठा खंडीत झाला.

# राज्य बँकेच्या रोखे वितरणास सुरुवात



**मुंबई, दि २० मार्च-**

रिझर्व्ह बँकेने दिली परवानगी मुंबई, २० मार्च रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या आर्थिक सक्षमतेच्या निकषांचे पालन केल्यामुळे मध्यवर्ती बँकेने देशातील राज्य सहकारी बँकांच्या इतिहासात प्रथमच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस ५०० कोटीं रुपयांच्या रोखे वितरणास अनुमती दिली.

रोखे वितरणाचा शुभारंभ गुरुवारी सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, नॅफस्कॉबचे कार्यकारी संचालक भीमा सुब्रमण्यम्? तसेच पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष, गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, लोकप्रतिनिधी, अनेक साखर कारखान्यांचे अध्यक्षांच्या उपस्थितीत पार पडला.

या प्रसंगी पाच संस्थांना रोख्यांचे वितरण अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पवार यांनी प्रगतीचे कौतुक केले तसेच या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षामध्ये सहकार टिकला पाहिजे, वाढला पाहिजे व सक्षम झाला पाहिजे अशी भावना व्यक्त केली. राज्यातील सर्व सहकारी संस्थांनी राज्य सहकारी बँकेचा कित्ता गिरवत आपल्या कार्यशैलीत बदल करावा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून स्पर्धात्मक वातावरणात टिकण्यासाठी नवनवीन योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

राज्य सहकारी बँकेने वितरीत केलेले रोखे १० वर्षांच्या मुदतीचे असून, त्यावर .८.५० टक्के दराने परतावा मिळणार आहे. बँकेने वितरीत केलेले रोखे रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मुदतीपूर्वी म्हणजे ३० जूनपूर्वीच संपूर्ण खरेदी केले जातील, असा विश्वास व्यक्त केला.


# मानवाइतकीच सक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता पुढील वर्षीच येणार!

◆ **वॉशिंग्टन , २० मार्च**

सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय'चा बोलबाला असला तरी सध्याच्या 'एआय'ला वैज्ञानिक 'एएनआय' असे संबोधतात. 'एएनआय' म्हणजे 'आर्टिफिशियल नॅरो इंटेलिजन्स'. ही कृत्रिम बुद्धिमत्ता सामान्य दर्जाची असून, ती केवळ काही विशिष्ट कामे करण्यापुरतीच सक्षम आहे. भविष्यात 'एजीआय' म्हणजेच संपूर्णपणे मानवी बुद्धीइतकीच सक्षम अशी 'आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स' येऊ शकेल, असे मानले जाते.

एखादा मानव ज्या सहजतेने विविध कामे करू शकतो, तितक्याच सहजतेने ही कृत्रिम बुद्धिमत्ता कार्य करील. त्यानंतर 'एएसआय' म्हणजेच 'आर्टिफिशियल सुपरइंटेलिजन्स'चा जमाना येऊ शकतो. ही कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी बुद्धिमत्तेपेक्षाही सरस असेल. अर्थात, सध्या तरी 'दुर्बल' म्हणवल्या जाणाऱ्या 'एएनआय'नेच माणसाला इतके थक्क केले आहे, तर या पुढच्या दोन कृत्रिम बुद्धिमत्ता कशा असतील, याची कल्पनाच केलेली बरी! काही संशोधकांच्या मते, 'एजीआय' म्हणजेच मानवी बुद्धिमत्तेच्या पातळीची कृत्रिम बुद्धिमत्ता अगदी पुढच्या वर्षीही उपलब्ध होऊ शकेल. अर्थात, अनेक संशोधकांना हे पटत नाही! 'एआय मल्टिपल रिसर्च' या संस्थेचे प्रमुख विश्लेषक सेम दिलमेजानी यांनी नुकत्याच प्रकाशित केलेल्या एका अभ्यासात २००९ ते २०२३ या कालावधीत वैज्ञानिक, एआय तज्ज्ञ आणि उद्योजकांनी केलेल्या ८,६०० भाकितांचे विश्लेषण करण्यात आले. विशेषतः १० वेगवेगळ्या सर्व्हेत ५,२८८ एआय संशोधकांचा सहभाग होता. या अभ्यासानुसार, २०४० ते २०६१ दरम्यान एआय मानवी स्तरावर पोहोचण्याची ५० टक्के शक्यता आहे. मात्र, अलिकडील सर्वेक्षणांनुसार, 'एजीआय' हे त्यापेक्षाही लवकर म्हणजे अगदी पुढच्या वर्षी येऊ शकते. २०२३ मध्ये २,७७८ वैज्ञानिकांवर केलेल्या एका सर्वेक्षणात २०४० पर्यंत 'एजीआय' साकार होण्याची शक्यता वर्तवण्यात आली. काही संशोधक, जसे की 'अँथोपिक' या एआय कंपनीचे सीईओ दारियो अमोडेई, यांच्या मते 'एजीआय' २०२६ पर्यंतही येऊ शकते!

'एजीआय'च्या वेगवान विकासामागील मुख्य कारण म्हणजे ट्रान्सफॉर्मर आधारित मोठे भाषा मॉडेल. हीच ती तंत्रज्ञानाची शाखा आहे, जिच्या आधारे एआय प्रणाली विकसित झाल्या आहेत. २०१९ मध्ये काही संशोधकांचा असा विश्वास होता की, 'एजीआय' हे २०६० पर्यंत किंवा कदाचित कधीच येणार नाही. मात्र, गेल्या काही वर्षांत 'एआय'च्या क्षमतेत झालेली झपाट्याने वाढ पाहता, तज्ज्ञांचा अंदाज आता अधिक लवकरच्या कालावधीकडे झुकत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वेगवान प्रगतीमुळे भविष्यात मानव आणि मशीन यांच्यातील नाते कसे असेल, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. ◂(वृत्तसंस्था)




# उद्या नितीन गडकरी होणार सन्मानित

**अमरावती, २० मार्च**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण शनिवार २२ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात होणार आहे.



या समारंभात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना प्रतिष्ठेच्या 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार-२०२४' ने सन्मानित करण्यात येणार आहे. पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला खा.शरदचंद्र पवार हे प्रमुख अतिथी म्हणून आभासी पद्धतीने उपस्थित राहतील.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### नाट्यगुरू पद्माकर देव यांच्या जन्मशताब्दी निमित्त रविवारी संगीत मंदारमाला नाटक

**सोलापूर, दि. २० मार्च-**

सांस्कृतिक कार्य संचालनालयतर्फे आयोजित संगीत मंदारमाला या नाटकाचे आयोजन केलेले आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या नियोजनाखाली आणि सांस्कृतिक कार्यचे अपर मुख्य सचिव विकास खारगे आणि संचालक विभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही संधी सोलापूरकरांना मिळत आहे. पं. राम मराठे आणि सोलापुरात संगीत नाटक ज्यांनी रुजवले ते नाट्यगुरू पद्माकर देव यांच्या जन्मशताब्दी निमित्त या संगीत नाटकाचे आयोजन पं. राम मराठे फाउंडेशन निर्मित संगीत मंदारमाला हे नाटक म्हणजे साठोत्तर संगीत नाटकातील विविधांगी संगीत आणि नृत्याने नटलेली अस्सल लखलखते सोनेरी पान, विद्याधर गोखले लिखित या संगीत नाटकात भाग्येश मराठे आणि प्राजक्ता मराठे, मकरंद पाध्ये यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हे मूळ नाटक पंडित राम मराठे यांनी संगीतबद्ध केलेले होते. या नाटकाचे आयोजन सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे रविवार, दि. २३ मार्च रोजी सायं ७ वाजता केले आहे. हे नाटक विनामूल्य असले तरीही प्रवेशिका घेणे गरजेचे आहे. या प्रवेशिका हुतात्मा स्मृती मंदिर येथे २१ मार्चपासून उपलब्ध झाले आहेत. सोलापुरातील कलारसिकांनी या संगीत नाटकाचा आनंद घ्यावा, असे आवाहन संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.



### संजय साळुंखे यांचा 'धर्मयोद्धा' पुरस्काराने दिल्ली येथे सन्मान

**सोलापूर, दि. २० मार्च-**

लव्ह जिहाद विरोधी संघर्षात उल्लेखनीय योगदान देणारे संजय साळुंखे यांना एम्स आयडॉल धर्मयोद्धा २०२५ पुरस्कार दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. नवी दिल्लीतील कन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडिया येथे झालेल्या कार्यक्रमात 'रक्तरंजित बांगलादेश-मजहब, सत्ता और संघर्ष की कहानी' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर भारताचे माजी शिक्षण राज्यमंत्री डॉ. सत्यपाल सिंह, वायुसेनेचे एअर व्हॉईस मार्शल एच. पी. सिंह, माजी खासदार बी. बी. पाटील, भाजपा महिला मोर्चा केंद्रीय कार्यालयीन सचिव दीपिका रेड्डी, गगनांचलचे निदेशक रवि शंकर, दिल्ली येथील सभ्यता अध्ययन केंद्राचे अध्यक्ष डॉ. धर्मवीर शर्मा, लेखक आणि एम्स परिवाराचे अध्यक्ष गुरुप्रसाद हुंडेकर उपस्थित होते. डॉ. सत्यपाल सिंह यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात हिंदू समाजाच्या अस्तित्वासाठी संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला.



### सेवासदन महाविद्यालयात पर्यावरणपूरक घरट्यांचे प्रदर्शन

**सोलापूर, दि. २० मार्च-**

सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील पर्यावरण विभागाद्वारे जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून पर्यावरण पूरक घरट्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थिनींना पर्यावरण संवर्धनाची जाणीव व्हावी, विद्यार्थिनींचा पर्यावरण संवर्धनात सहभाग वाढावा याकरिता महाविद्यालयाद्वारे प्रतिवर्षी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यंदाही महाविद्यालयाच्या पर्यावरण विभागाद्वारे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत चिमणी व इतर पक्षांकरिता विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या पर्यावरण पूरक घरट्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन पर्यावरणदूत डॉ. मनोज देवकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे सेवासदन संस्था शाखा सोलापूरच्या अध्यक्षा श्रीमती शीला मिस्त्री, उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, कार्यकारणी सदस्य डॉ. श्रीकांत येळगावकर, सचिव वीणा पतकी व सर्व कार्यकारणी सदस्य यांनी या उपक्रमाबद्दल विद्यार्थिनींचे कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थिनींना डॉ. तेजस्विनी मस्के यांचे मार्गदर्शन मिळाले. सूत्रसंचालन प्रा. गीता मोहोळकर यांनी केले.



### दिनदुबळ्या उपेक्षितांच्या जीवनात आस्था सामाजिक संस्थेने भरला रंग

**सोलापूर, दि. २० मार्च-**

सोलापुरात येथील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारी आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने रंगपंचमी दिनानिमित्त शहरातील फुटपातावरील जीवन जगणाऱ्या उपेक्षित वंचित, बेघर, निराधार लोकांना त्यांना पुरणाची पोळी, चपाती, पापड, आमटी, भजी, डाळीचे वडे, मिक्स व्हेज भाजी इ. करून व रंग लावून आगळ्यावेगळ्या पद्धतीने रंगपंचमी साजरी करून एक समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे. यावेळी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, पिंटू कस्तुरे, सुरज छंचुरे, उदय छंचुरे, उपस्थित होते.

# डिपीसीचा अवघा १५ कोटी निधी शिल्लक

## जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार; मार्च अखेर सर्व निधी खर्ची पडणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

सोलापूर जिल्हा नियोजन आराखड्यातील ७०२ कोटींपैकी ६८७ कोटींच्या कामाचे पैसे सर्व शासकीय विभागांच्या खात्यांवर वर्ग झाले असून, उर्वरित १५ कोटी निधीही मार्चखेर खर्ची पडणार असून, शासनाचा १०० टक्के निधी मार्च महिनाखेर पर्यंत सर्व खात्यांना वितरीत करणार असल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना दिली.

डिपीसीतून जिल्ह्यातील राज्य शासनाच्या विविध विभागांना ३१३ कोटीचा निधी, तर सोलापूर महानगरपालिका आणि नगरपालिकांना १२९ कोटी आणि जिल्हा परिषदेला १० कोटीचा निधी वर्ग करण्यात येत आहे. यासाठी मनपा, नगरपालिका तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी युद्धपातळीवर काम करत आहेत. पूर्ण झालेल्या ६८७ कोटींच्या कामांची बिले मंजुरीसाठी अधिकाऱ्यांच्या टेबलावर आलेली आहेत. या बिलांना लवकरच मंजुरी दिली जाणार आहे. एकंदरीत, डिपीसीमधून आलेला १०० टक्के निधी खर्ची पडणार आहे.

सोलापूर जिल्हा प्रशासनाने २०२५ व २६ सालासाठी ८६१ कोटींचा नवीन वार्षिक नियोजन आराखडा सादर केला आहे. तर गतवर्षीचा ७०२ कोटीचा आराखडा शासनदरबारी होता. यातील गेल्या महिन्यापर्यंत ६० टक्केच निधी प्राप्त झाला होता. मात्र नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी याबाबत सविस्तर माहिती उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांना देवून उर्वरित ४० टक्के निधीचीही मागणी केली होती. यामुळे उपमुख्यमंत्री पवार यांनी मागील महिन्यात पुण्यात झालेल्या विभागीय बैठकीत यास मान्यता देवून ४० टक्के निधी वर्गही केला आहे. यानुसार एकूण ७०२ कोटीचा निधी सोलापूर जिल्ह्यास प्राप्त झाला असून, त्याद्वारे विविध विकासात्मक कामे केली जात आहेत.

**▶▶आगामी वर्षासाठी २०० कोटीची अतिरिक्त मागणी**

शासनाकडून ७०२ कोटी निधी प्राप्त झाला तरी जिल्ह्यातील विविध नियोजित कामांचा विचार करता यंदा २०० कोटींची अतिरिक्त निधीची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आल्याचीही माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**▶▶आमदार, खासदारांना निधी वेळेत वितरित होणार**

नूतन आमदार आणि खासदारांचेही विकासकामांबाबतचे मागणी प्रस्ताव आल्यानंतर त्यांना प्रती वर्षी ५ कोटीप्रमाणे निधी वेळेत वितरित केले जाणार आहेत. दरम्यान, मागील पंचवार्षिकमध्ये सर्व आमदार-खासदारांनी आपला निधी वेळेत खर्ची टाकला असून, त्याच धर्तीवर नूतन लोकप्रतिनिधींनाही जिल्हा नियोजन कार्यालयाकडून सहकार्य केले जाईल, अशीही ग्वाही जिल्हा नियोजन अधिकारी पवार यांनी यावेळी दिली.

# राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची प्रलंबित तक्रारींवर सुनावणी

## सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील २१ तक्रारींचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारींच्या सुनावणीबाबत नियोजन भवन, सोलापूर येथे सुनावणी व आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.



सदर सुनावणी व आढावा बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील १२ व धाराशिव जिल्ह्यातील ९ तक्रारी अशा एकूण २१ तक्रारींवर सुनावणी करण्यात आली. सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारीची सुनावनी बालहक्क आयोगाचे चैतन्य पुरंदरे, ॲड. जयश्री पालवे, ॲड. निलिमा चव्हाण हे सदस्य उपस्थित होते. तसेच आयोगाचे विधी सल्लागार प्रमोद बाडगी, माधवी भोसले शिक्षणाधिकारी वंदना जैन, अवर सचिव व त्यांचे अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. सदर सुनावणी व आढावा बैठकीत बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९, पोक्सो कायदा २०१२, बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच बाल हक्कांविषयक अन्य तक्रारी या अनुषंगाने सुनावनी संपन्न झाली, सुनावणीस शिक्षण विभाग, पोलिस विभाग, बांधकाम विभाग, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बालकल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अशासकीय संस्था, जिल्हास्तरीय चाईल्ड हेल्प लाईन, रेल्वे हेल्प डेस्क व अन्य विभाग प्राशासकीय विभागाचे सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रमेश काटकर यांनी केले.



# समता सैनिक दलाच्यावतीने पाणपोईचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह वर्धापन दिनाच्या निमित्ताने समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूरच्यावतीने समता परिवार न्यू बुधवार पेठ सोलापूर येथे सोनबा येलवे पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शाक्य संघाचे अध्यक्ष अंगद मुके, समता सैनिक दलाचे जिओसी अंबादास कदम, बौद्ध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन झाले. या पाणपोईची सुरुवात निवृत्त पोलीस उपनिरीक्षक दिवंगत केरू जाधव यांनी २००० साली सुरू केलेली होती. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या सुमित्रा जाधव त्याचप्रमाणे त्यांचे सर्व कुटुंबीय, समता सैनिक दलाचे संभाजी तळभंडारे, मुकुंद चंदनशिवे ,समता सैनिक दलाचे महासचिव अनिल जगझाप, रत्नदीप कांबळे, विनोद जाधव, शाक्य संघाचे सदस्य निवृत पोलीस उपनिरीक्षक शांताराम वाघमारे, मुंबई आकाशवाणीचे निवृत्त अधिकारी शांतिकुमार कांबळे, पत्रकार महेश गायकवाड, गौतम चंदनशिवे, कुणाल जानराव, रितेश कसबे, सत्यजित वडवरावउपस्थित होते. समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांची साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा यावेळी उचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक सुमित्रा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन महासचिव अनिल जगझाप यांनी केले तर जाधव यांनी आभार मानले.

# हद्दवाढ भागात काही ठिकाणी दूषित पाणीपुरवठा

## ● शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख पाटील यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च -**

हद्दवाढ भागात काही ठिकाणी नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारीनंतर शिवसेनाउबाठा गटाचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी आयुक्तांना निवेदन देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हद्दवाढ भागातील काही ठिकाणी नागरिकांना दूषित पाणी नळाला येत असल्याचे शिवसेनाउबाठा गटाचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्याकडे नागरिकांनी तक्रार केली असता आज सोरेगाव येथील जल शुद्धीकरण केंद्र येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. त्या ठिकाणी स्वच्छता नसल्याचे दिसून आले. त्याचबरोबर पाण्यामध्ये मृत अवस्थेमध्ये मासे, किडे आढळून आले. त्यावेळी संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे.त्या ठिकाणी पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्या संदर्भात महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात येणार आहे. नागरिकांच्या जीवाशी अशाप्रकारे खेळू नये. तातडीने महापालिका



प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करणार असल्याचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी म्हटले आहे.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर, उपशहर प्रमुख रोहित, उपशहर प्रमुख शिवा माळी आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानार्थ भारत गौरव सर्किट यात्रेचे आयोजन

**▶▶शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक स्थळांना रेल्वेने जोडणार**

**▶▶रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत केली घोषणा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानार्थ विशेष भारत गौरव सर्किट यात्रेची घोषणा केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात संसदेच्या लोकसभा अधिवेशनात उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना वैष्णव यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी आणि काळाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना जोडण्याच्या योजनेवर काम आधीच सुरू आहे. ही ठिकाणे भारत गौरव सर्किट यात्रेद्वारे एकमेकांशी जोडली जातील.



छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा पाया घातला. महाराष्ट्र व कर्नाटकमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी आणि काळाशी संबंधित किल्ले, राजवाडे, युद्धभूमी इत्यादी अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळे आहेत.

विशेष भारत गौरव सर्किट यात्रेमुळे प्रवाशांना, विशेषतः तरुणांना या भूमीच्या इतिहासाशी जोडण्याची संधी मिळेल, समृद्ध मराठा इतिहासाचा भाग असलेल्या याठिकाणांना भेट देण्याची आणि जवळून बघण्याची संधी मिळेल. पुण्याला जाणाऱ्या गाड्यांच्या मागणीबद्दल बोलताना वैष्णव म्हणाले, पुणे हे एक महत्त्वाचे शैक्षणिक आणि तंत्रज्ञान केंद्र आहे आणि महाराष्ट्राला देशाच्या इतर भागांशी जोडणारे एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून पुण्याला जाणाऱ्या गाड्यांच्या विनंत्या येत आहेत. पुणे स्टेशन आणि त्याच्या आसपासच्या ठिकाणांच्या विकासाचे मोठे काम जलद गतीने सुरू आहे. याशिवाय, पुण्यापासून थोड्या अंतरावर असलेले उरुळी स्टेशन टर्मिनस म्हणून विकसित केले जात आहे. प्रवाशांना पुण्यात उतरवल्यानंतर पुण्याकडे जाणाऱ्या गाड्यांची देखभाल करता येईल, ज्यामुळे गाड्यांचा भार आणि पुणे स्टेशनवरील प्रवाशांची गर्दी कमी होईल. त्याचप्रमाणे हडपसर आणि शिवाजी नगर सारखी स्थानके देखील सॅटेलाइट टर्मिनस स्टेशन म्हणून विकसित केली जात आहेत. यामुळे पुणे स्टेशनची क्षमता वाढेल आणि पुण्याहून येणाऱ्या - जाणाऱ्या गाड्या वाढतील. असेही वैष्णव यांनी यावेळी सांगितले.

# मालमत्ता कर विभागाकडून सुमारे २४ हजार थकबाकीदारांना नोटीसा

## शनिवारी राष्ट्रीय लोक अदालत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

महापालिका आवारात शनिवार दि. २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित केली आहे. यामध्ये मालमत्ता कर विभागाकडून सुमारे २४ हजार, भुमी व मालमत्ता विभागाकडील थकबाकीदार असलेल्या मिळकतदारांची, गाळेधारकांची प्रकरणे तडजोडी करीता दाखल करण्यात आल्याची माहिती उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

दाखल प्रकरणनिहाय जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत संबंधित मिळकतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. लोक अदालतमध्ये मिळकतदारांच्या थकबाकीतील नोटीस फि, वॉरंट फि व शास्ती ची जी रक्कम आहे त्यामधील ५० टक्के रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ॲड प्रकरण ८ कराधान नियमातील नियम ५१ नुसार सुट म्हणून देण्यात येणार आहे. सबब जास्तीत जास्त मिळकतदारांनी सदर सवलतीचा लाभ लोकअदालतच्या माध्यमातून घेण्याचे आवाहन उपायुक्त लोकरे यांनी केले आहे. जे मिळकतदार नोटीसीस अनुसरुन थकबाकी भरणार नाहीत त्यांच्याबाबत न्यायालयाच्या निर्देशानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई सुरु होईल. ज्यांना नोटीसा प्राप्त झाल्या नाहीत, ५० टक्के शास्ती माफिचा लाभ घेऊ इच्छित आहेत अशा मिळकतदारांनीही दि.२२ मार्च रोजी लोक अदालतमध्ये देण्यात येणाऱ्या सवलतीचा लाभ संबंधित पेठेचे कर निरिक्षक यांना संपर्क साधून अथवा थेट ऑनलाईन रक्कम भरुन लाभ घेऊ शकतात.

लोक अदालत अंतर्गत यापुर्वी नोटीस बजावूनही थकित कर न भरलेल्या २२ मिळकतीवर बोजा चढविणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला असून, आणखी ५० थकबाकीदारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**१ एप्रिलनंतर होणार जाहीर लिलाव**

थकबाकी असलेल्या मिळकतीवर बोजा चढविलेल्या मिळकतीचा अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १ एप्रिल नंतर जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. याची सर्व थकबाकीदार मिळकतदारांनी नोंद घ्यावी,असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले.

# जिल्हा परिषद आवारात घुमणार पक्षांचा आवाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

फेब्रुवारीपासूनच उन्हाळ्याची चाहूल लागल्याने मराठा सेवा संघाने जिल्हा परिषद आवारातील बागेत पक्षासाठी पाण्याची सोय केली आहे. तसेच कॉंक्रीटच्या जंगलामध्ये चिमण्यांना घर करणे शक्य नाही यासाठी कृत्रिम घरटे तयार केले आहेत. सर्वानी पक्षासाठी पाण्याची सोय करावी असा रंगपंचमीनिमीत्त संदेश दिला. यामुळे जिल्हा परिषद आवारात पक्षांचा आवाज घुमणार आहे.

मराठा सेवा संघ शाखा जिल्हा परिषद यांच्या वतीने पक्षांसाठी पाण्याची सोय करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांचे शुभहस्ते करण्यात आले . यावेळी अनुपमा पडवळे, राजश्री कांगरे,वेशाली शिंदे, स्मिता पोरेड्डी, शितल कडलासकर, राजश्री रोजी, अनिता तुपारे, प्रियंका डांगे, स्मिता चव्हाण, अंजली पेठकर, आरती माढेकर, सविता मिसाळ, गौरी कदम, राणी तवटी, छाया क्षीरसागर, श्रीदेवी माने, अर्चना निराळी, सुवर्णा पंगुडवाले, भारती उमराणी, मराठा सेवा संघ



जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष राजेश देशपांडे, गिरीष जाधव, राज्य सहसचिव दिनेश बनसोडे, सुर्यकांत मोहिते, लिपीक संघटनेचे अध्यक्ष नागेश पाटील आरोग्य संघटनेचे समीर शेख, संतोष जाधव, रणजीत घोडके, राजपाल रणदिवे, अमित सलगर, योगेश हब्बु लक्ष्मण वंजारी श्रीकांत मेहेरकर, उमाकांत कोळी, मल्लीनाथ स्वामी, सचिन चव्हाण, अनिल जगताप, सुहास चेळेकर, सचिन साळुंखे, सुधाकर माने देशमुख, चेतन भोसले, रोहीत घुले, विकास भांगे, सचीन जाधव, संतोष शिंदे, गणेश साळुंखे, गणेश कलुबर्मे, मंजुनाथ चिंचोळे, संजय कांबळे, मंगेश पंदे, संजय कुंभार, नरसिंह गायकवाड, महेश केंद्रे, महेश जाधव, पणेश ओहोळ, दिपक सोनवणे, गणेश कलुबर्मे, विशाल घोगरे, विठ्ठल मलपे, संजय पाटील, भूषण काळे,रणजीत गव्हाणे, उमेश खंडागळे, सचिन खराडे, प्रसाद काशीद, संतोष निळ, जयंत पाटील, सचिन लामकाने, हरिभाऊ देशमुख, राजू देशमुख, किरण देशमुख, राजु आतकरे, महेंद्र माने, अनिल पाटील, अजित देशमुख, गोपाल शिंदे, नितीन जाधव, ऋषिकेष जाधव , अभिजीत निचळ, संतोष सातपुते, पी. बी.पवार, अमरसिंह पताले, सुरज कव्हाळे, संजय चव्हाण, रोहन भोसले, प्रकाश शेंडगे, विनायक कदम, प्रदिप सुपेकर, मनोज वडगावे, तानाजी पवार, प्रविण पवार, उत्कर्ष इंगळे, मुशीर कलादगी,शामेल आडाकुल, महेश आदमाने . रोहन भोसले, चंदु कोळी, हरिष म्हेत्रे, योगेश हबु, विलास मसलकर, सुजित पुकाळे, जमीर शेख, सैफन जमादार आदि उपस्थित होते. या उपक्रमाचे पक्षीप्रेमी नागरीकांकडून कौतुक केले होत आहे.

# जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. २० मार्च-**

आंबेडकर चौक येथे क्लास समोर लावलेली सायकल कोणीतरी घेऊन गेली याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेस मारहाण केली. ही घटना १८ मार्चला रात्री साडेआठ वाजता घडली.

याप्रकरणी सुनंदा राजू गोतसुर्वे (वय-४५, रा.सर्वसुखी नगर,निर्मिती विहार) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून श्वेता,नीता (रा.आंबेडकर चौक) व इतर एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादीचा भाचा प्रतीक याची सायकल क्लास समोर लावली होती.ती कोणीतरी घेऊन गेली.याची विचारणा करण्यासाठी चिवरीकर सरांना सीसीटीव्ही कॅमेरा बघून सांगा अशी विचारणा केली.यावेळी चिवरीकर सरांच्या दोन्ही मुलींनी सीमा गायकवाड यांना शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच तेथे थांबलेला अज्ञात व्यक्तीने मागून येऊन फिर्यादीच्या डोक्यात लाकडी दांडक्याने मारून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## घरगुती कोंबड्यांचे अहवाल आले निगेटिव्ह; अंडी, चिकन शिजवून, खाण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. २० मार्च-**

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसर व किल्ला परिसर येथील कावळे, घार व बगळा या पक्षांमध्ये अनैसर्गिक मरतुक होती; या पक्षाच्या नमुन्यांमध्ये पुणे-भोपाळ लॅबमधून बर्ड फ्लूची लक्षणे असल्याचे आढळून आल्याने हा परिसर सतर्कता भाग म्हणून घोषित करण्यात आला आहे. यानंतर बाधीत क्षेत्रातील ० ते १ किमीमधील ७४ आणि १ किमी ते १० किमीमधील १२६ घरगुती कोंबड्यांचे नमुने तपासणीसाठी पुण्याच्या लॅबला पाठविले होते. याचे अहवालही आज (दि. २०) निगेटिव्ह आले असून, शहरातील नागरिकांनी घाबरून जावू नये असे आवाहन पशु चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर



पराडे यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना केले. दरम्यान, वन्य पक्षाचे अहवाल पॉजिटिव्ह आल्याने अजून किमान १५ दिवस तरी शहवासियांनी सतर्कता बाळगावी आणि मांस चांगले शिजवून आणि अंडीही चांगली उकडून खावीत, असाही सल्लाही डॉ. पराडे यांनी दिला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशान्वये सदर ठिकाणच्या रोगाचा प्रसार जिल्ह्यातील इतर ठिकाणी होण्याची शक्यता करता येत नसल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून प्राण्यांमधील संक्रमक व संसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार सोलापूर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला परिसर येथे सर्वेक्षणचे काम पूर्ण होईपर्यंत प्रतिबंधात्मक उपाययोजना सध्याही केलीच आहे. यामुळे सदर परिसरातील येथील १० किलोमीटर त्रिज्येतील क्षेत्र सतर्क भाग घोषित करण्याचे आदेश दिले होते. बाधित क्षेत्राच्या ठिकाणी नागरिकांच्या हालचालीस व इतर पक्षी व प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला आहे. सदर शहरातील दोन्ही बाधित परिसरांची २ टक्के सोडियम हायपोक्लोराइड किंवा पोटॅशियम परमँग्नेट निर्जंतुकीकरण केले आहे आणि चुन्याची फक्की मारली आहे. प्रभावित क्षेत्राच्या दहा किलोमीटर त्रिज्येतील कुक्कुट पक्षांचे सर्वेक्षण करून नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठवावेत, असे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याप्रमाणे डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या १४ टिमने शहराच्या विविध भागातून घरगुती कोंबड्यांचे नमुने घेवून पुणे येथील लॅबला सोमवार, दि. १७ मार्च रोजी पाठविले होते. त्याचे अहवाल आज सोलापूरला प्राप्त झाले असून, यामध्ये घरगुती पक्षाचे सर्व अहवाल निगेटिव्ह आल्याने सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. पुणे येथील लॅबमध्ये हे अहवाल निगेटिव्ह आल्याने ते नमुने भोपाळ येथे पाठविण्याची गरजही नसल्याचे डॉ. पराडे यांनी शेवटी नमूद केले.

## उत्कर्ष नगरमध्ये वृद्धाची तर पाकणी फाटा येथे तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २० मार्च-**

राहत्या घरी किरणा दुकानामध्ये लोखंडी सळईस सुती दोरीने गळफास घेऊन ७० वर्षीय वृद्धाने आत्महत्या केल्याचा प्रकार गुरुवारी दुपारी १२:३० च्या सुमारास उघडकीस आला. अर्जुन नागप्पा धोत्रे (रा. उत्कर्ष नगर, जुळे सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या वृद्धाचे नाव आहे. यातील वृद्ध राहत असलेल्या घरी किरणा दुकान आहे ते त्यांनी लोखंडी रॅकच्या मधोमध असलेल्या सळईला दोरी बांधून हे कृत्य केले. विजापूर नाका पोलीस ठाण्याचे हवालदार ए. एम. गावडे यांनी घटनास्थळी पोहचून यादीसमवेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी करुन उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले. सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे. दुसऱ्या घटनेत पाकणी फाटा येथील हॉटेल संभाजीच्या पाठिमागे सुरु असलेल्या बांधकामावर एका तरुणाने तारेला टॉवेलच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. गुरुवारी दुपारी ही घटना उघडकीस आली. रोहित लाल बहादूर (वय २४, रा. परसेहरी कला जुन्दरवालखीटी, सुल्तेखास, उत्तर प्रदेश) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पी. महिंद्रकर यांनी माहिती मिळताच घटनास्थळी पोहचून तरुणास शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## विशेष अभय योजनेमुळे होणार २५ हजार कोटींची वसूली

**मुंबई, दि.२० मार्च :-**

महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२५ गुरुवारी विधानसभेच्या सभागृहात उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी सादर केले. याद्वारे सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी विशेष अभय योजना आणली आहे. या योजनेद्वारे थकबाकीच्या तडजोडीला गती मिळेल. त्यातून थकीत महसूल शासनाच्या तिजोरीत जमा होऊन विकासकामांसाठी निधी उपलब्ध होणार आहे. अजित पवार यांनी अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेनुसार आज थकबाकीची तडजोड करण्याबाबतचे विधेयक सादर केले. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांना दिलासा मिळणार आहे. वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात येणारे विविध कर यासंदर्भात ही योजना असणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे प्रलंबित थकबाकीची रक्कम सुमारे २५ हजार कोटी रुपये आहे. या थकबाकीच्या वसुलीसाठी सरकारने विशेष सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. सदर तडजोड योजना विधेयक लागू झाल्याच्या दिनांकापासून ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू असेल. दि. १ एप्रिल २००५ ते दि. ३० जून २०१७ या कालावधीतील थकबाकी यासाठी पात्र असणार आहे. अविवादीत करासाठी कोणतीही सवलत दिली जाणार नाही, त्याचा शंभर टक्के भरणा करणे अनिवार्य असणार आहे. ही संपूर्ण योजना ऑनलाईन पद्धतीने पारदर्शकपणे राबवली जाणार असल्याची माहिती अजित पवार यांनी सभागृहाला दिली.

## नाना पालकर स्मृती समितीतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

**पुणे, दि. २० मार्च -**

नाना पालकर स्मृती समितीतर्फे रक्तदान शिबीर आयोजित केले आहे. रविवार, दि. २३ मार्च २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० पर्यंत शिबीर आहे. मुंबई परळ येथील नाना पालकर स्मृती समिति, रुग्ण सेवा सदन, नरेपार्क शेजारी येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान टाटा मेमोरियल रुग्णालय मधील गरजू रुग्णांना उपयुक्त ठरणार आहे. रक्तदानाप्रती जागरूकता वाढवणे जरुरीचे आहे. गरजूंना वेळेवर, सुरक्षित आणि योग्य रक्त मिळावे, यासाठी नेहमी रक्तदानास तयार असले पाहिजे. मित्रपरिवारासहीत येऊन रक्तदान करावे व या पवित्र कार्यात सहभागी व्हावे. असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत बडवे आणि सचिवा सुमेधा जोशी यांनी केले आहे. संपर्क क्र. : ९३२४६३५४४७, ९८६९९००६६८, ९८२१४६७०८७ असे आहेत.

# दिशा सालियन मृत्यूप्रकरणावरुन दोन्ही सभागृहात राडा!

### सत्ताधारी-विरोधकांमध्ये जुंपली

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२० मार्च:**

दिशा सालियन मृत्यूप्रकरणी तिच्या वडिलांनी उच्च न्यायालयात केलेल्या याचिकेचे पडसाद बुधवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उमटले. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी याबाबत नेमलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) अहवाल उघड करण्याचे मागणी करत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. तर ठाकरे गटाच्या आमदारांनी अहवाल सरकारने जाणीवपूर्वक दडपून ठेवला असल्याचे सांगत याप्रकरणी राजकारण करण्यात येत असल्याचा आरोप केला. या विषयावरून दोन्ही सभागृहात जोरदार गोंधळ होऊन सभागृहाचे कामकाज दोनदा तहकूब करावे लागले.

विधान परिषदेत मंत्री गिरीश महाजन व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यात आणि त्यानंतर ठाकरे गटाचे नेते अनिल परब व भाजपाच्या चित्रा वाघ यांच्यामध्ये जोरदार खडाजंगी झाली. परब यांनी म नीषा कायंदे या सरड्याप्रमाणे रंग बदलतात, त्यांना पाहून सरडाही लाजेल, संजय राठोड जयकुमार गोरे व किरीट सोमय्या यांच्यावर झालेल्या आरोपाची दाखले देत त्यावेळी चित्रा वाघ का गप्प होत्या? राठोडला मंत्रीपदावर पुन्हा कसे घेण्यात आले ?अशी विचारणा केली त्यावर चित्रा वाघ यांनी संतप्त होत राठोड ना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी क्लीनचीट दिली होती तुमच्यात हिम्मत असेल तर त्यांना जाऊन विचारा असे आव्हान दिले त्याचप्रमाणे तुमच्यासारखे ५६ जण पायात भिंगरी बांधून फिरवत असते, अशी आगपाखड केली. त्यांच्यातील वादामुळे सभागृह ह प्रचंड तापले होते.

२०२० मध्ये दिशा सलियन हिचा मृत्यू झाला होता. त्यामागे आदित्य ठाकरे यांचा हात असल्याचा यांच्यावर राणे पिता- पुत्र आरोप करत होते. त्यावेळी दिशा सलियन हिचे वडील सतीश सलियन यांनी आपल्या मुलीचा मृत्यू अपघाती झाल्याचे सांगून त्यामध्ये राजकारण करून आम्हाला तोडू नका अन्यथा कोर्टात बदनामीबद्दल केस करू, असा इशारा दिला होता. राणीच्या मागणीप्रमाणे त्यावेळी या प्रकरणाचा तपास करण्यासाठी जून २०२२ मध्ये विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली होती. मात्र त्याचा अहवाल अद्याप सादर करण्यात आलेला नाही तसेच सीबीआय ने ही या प्रकरणी ठाकरे यांचा सहभाग नसल्याचा निर्वाळा दिला होता मात्र आता देशाच्या वडिलांनी या प्रकरणात उच्च न्यायालयात याचिका दाखल करत आपल्या मुलीचा वर सामूहिक अत्याचार करून खून करण्यात आला असल्याची शक्यता वर्तवली आहे याबा बत प्रकरणी आदित्य ठाकरे, अभिनेता सुरज पांचोली व दिनेश मोरया, माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावर संशय व्यक्त केला असून त्या प्रकरणाची तपासणी सीबीआय कडून करण्यासाठी उच्च न्यायालयात बुधवारी याचिका दाखल केली आहे. अधिवेशनात आज त्याचे पडसाद उमटणे साहजिकच होते विधानसभेत 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन ' अन्वये या विषयावर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये भाजपा सदस्य अमित साटम यांनी दिशा सालियन मृत्यूप्रकरणी आणि प्रकरणी राज्य सरकारने तपासासाठी राज सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीची स्थापना होऊन दीड वर्ष होऊन गेले. मात्र अद्यापही तपास का पूर्ण झालेला नाही, त्याचा अहवाल केव्हा उघड करणार आहात ?अशी विचारणा केली तर मंत्री नितेश राणे यांनी याप्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करून चौकशी करण्याची मागणी त्यावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी याबाबत न्यायालयात प्रकरण प्रलंबित असून न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येईल, असे सांगितले .मात्र तपास केव्हापर्यंत पूर्ण होईल हे जाहिर करा अशी मागणी साटम यांनी केल्याने सभागृहात गदारोळ उडाला. ते म्हणाले,'मुंबई ही स्वप्ननगरी आहे. याठिकाणी देशभरातून अनेक तरुण-तरुणी करिअर घडवण्यासाठी येतात. कोणी पॉवरफुल व्यक्ती असेल किंवा कोणी तोंडात सोन्याचा



चमचा घेऊन जन्माला आले आहे, म्हणून अशी घटना दाबली जाणे चूक आहे. माझी शासनाला विनंती आहे की, डिसेंबर २०२२ मध्ये जी एसआयटी नेमली होती, त्यांनी काय चौकशी केली, काय निष्कर्ष समोर आला? दिशा सालियनच्या वडिलांनी चार मित्र, तत्कालीन मंत्री आणि मुंबईच्या महापौरांचे नाव घेतले. त्यामुळे याचे गांभीर्य वाढलेले आहे शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

त्यामुळे विधानसभेचे कामकाज अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पंधरा मिनिटांसाठी तहकूब केले.

विधान परिषदेतील हाच विषय चर्चेचा ठरला पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन अन्वये याप्रकरणी सत्ताधारी पक्षाचे आमदारांनी मुद्दा उपस्थित केला शिवसेनेच्या अँड .मनीषा कायदे यांनी याबाबत आमदार आदित्य ठाकरे यांच्या विरोधात ठराव मांडला. त्यावर शिवसेना ठाकरे गटाच्या सदस्यांनी त्यांची खडा जगी झाली विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी त्याला आक्षेप घेत प्रत्युत्तर दिले तर मंत्री गिरीश महाजन यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या बाचाबाची झाली. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी याबाबत म नीषा कायदे यांच्यावर टिकेची झोड उडवत त्यांनी दोन वर्षांपूर्वी केलेले ट्विट सभागृहात वाचून दाखवले. भाजपा व राणे गँगच्या बुरखा सीबीआयच्या निर्वाळ्यामुळे फाटला आहे. त्यांनी आता आदित्य ठाकरे यांचे नाक घासून माफी मागावी असे ट्विट केले होते, त्याचा आता आपल्या वरिष्ठांना खुश करण्यासाठी, उपसभापती पद मिळवण्यासाठी कारवाईचा प्रस्ताव आणत आहेत. त्या सरड्याप्रमाणे रंग बदलत असून त्यांच्या या पावित्र्यामुळे सरडाही लाजून गेला ,असे म्हणाले. त्यावर महिलांच्या बद्दल आक्षेपार्य विधान करू नका ,असे सांगत शिक्षक मंत्री दादा भुसे ,निरंजन डावखरे यांनी त्याला आक्षेप घेतला.

प्रचंड गोंधळ होऊ लागल्याने सभापती शिंदे यांनी दहा मिनिटांसाठी कामकाज तहकूब केले. त्यानंतर परब यांच्या आरोपामुळे संतप्त झालेल्या चित्रा वाघ यांनी प्रत्युत्तर दिले. राठोड हे उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या क्लीन चिटमुळे मंत्री झाले आहेत. तुमच्यात हिम्मत असेल तर त्याबाबत उद्धव ठाकरेंना जाब विचारा असे आव्हान देत आपल्यासारखे ५६ जण मी पायाला भिंगरी बांधून फिरवीत असते, असा इशारा दिला. त्याला गोंधळाबाबत संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी नाराजी व्यक्त करीत दोन्ही बाजूच्या सदस्यांना शांत राहण्याच्या सूचना केल्या. परब उत्तर देण्यासाठी उभे राहिले असता पुन्हा गदारोळ झाला त्यामुळे तालिका अध्यक्ष निरंजन डावखरे यांनी सभागृहाचे कामकाज अर्धा तास तहकूब केले.

### आरोप करणाऱ्यावर बुमरँग होईल : उद्धव ठाकरे

विशाल शालेय मृत्यूप्रकरणी आदित्य ठाकरे यांच्यावर बिनबुडाचे आरोप करण्यात येत असून त्यामध्ये काही मात्र ही तथ्य नाही मात्र जे राजकारण करत आहेत. त्यांच्यावर बुमरँग होईल ,असा इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला. ते म्हणाले,'केंद्र व राज्य सरकार त्यांच्या ताब्यात आहे. सर्व तपास यंत्रणा त्यांच्याकडे आहे.त मात्र ते अद्यापही तपास जनतेसमोर का आणत नाहीत, सत्ताधारी पक्षाचे आमदारच ठाण्यातील व नगर विकास पक्षाची विभागातील भ्रष्टाचार उघडकीस असतानाच नागपूरमध्ये दंगल कशी होते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे असे त्यांनी सांगितले.

### जे काय असेल ते कोर्टासमोर सांगेन : आदित्य ठाकरे

गेल्या पाच वर्षांपासून माझ्यावर या प्रकरणातून बदनामी करण्याचे प्रयत्न विरोधक करत आहेत मात्र त्यामध्ये काडीमात्र तथ्य नाही कोर्टाने मला जर काही विचारल्यास मी त्यांना त्याबाबत सर्व काही सांगेन, अशी प्रतिक्रिया आ.आदित्य ठाकरे यांनी दिली.

# आधार कार्ड नोंदणी करणाऱ्या सेंटरसाठी एक लाखांचे बक्षीस

### आशिष शेलार यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २० मार्च-**

राज्यात १२.८ कोटी नागरिकांची आधार नोंदणी झाली असून, ५ ते १८ वयोगटातील शंभर टक्के नोंदणी झाली आहे. तसेच ० ते ५ वयोगटातील नोंदणी ३९ टक्के आहे. त्यामुळे या वयोगटात एका महिन्यात सर्वात जास्त नोंदणी करणाऱ्या सेंटरला १ लाखांचे बक्षीस देण्यात येईल, अशी घोषणा माहिती तंत्रज्ञान मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी आज केली.

राज्यातील आधार कार्ड नोंदणी करणाऱ्या सेंटरना माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे नवीन संचाचे वाटप करण्यात येणार असून आज सह्याद्री अतिथीगृहावर या योजनेचा प्रारंभ ड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नोनोटीया आणि

AADHAAR
Mera Aadhaar, Meri Pehchaan
आधार सेवा केंद्र
AADHAAR SEVA KENDRA

संचालक अनिल भंडारी, उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षिरसागर आदी उपस्थित होते.

आज प्रातिनिधिक स्वरूपात मुंबई, शहर, उपनगर, ठाणे, पालघर विभागातील आधार कार्ड सेंटर चालकांना या संचाचे वाटप करण्यात आले. यावेळी पराग जैन यांनी सांगितले की, नवीन आधार कार्ड तयार करताना विशेषतः १८ वर्षावरील वयोगटातील नागरिकांमध्ये बांग्लादेशी घुसखोरी करु नये याची काळजी घ्या, अशा सूचना केल्या. यावेळी मंत्री ड. आशिष शेलार यांनी सांगितले की, आधार नोंदणी केंद्र ही सेवा केंद्र असून मंदिराचे पावित्र त्यांनी जपावे. अनावधानाने ही कुठली चूक झाली तर देशासाठी ही बाब घातक ठरेल. आता देशातील मतदार आणि आधार लिंक करण्याबाबत देश पातळीवर चर्चा जेव्हा सुरु झाली आहे. येणाऱ्या काळात अधिक संच उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असून केंद्र चालवणाऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात वाढ करता येईल का? याबाबत देखील सरकार सकारात्मक विचार करीत आहे असेही त्यांनी सांगितले.

# विधानसभा अध्यक्ष व सभापतीच्या पक्षपाती कामाबद्दल राज्यपालांकडे तक्रार

### मविआच्या शिष्टमंडळाने दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी,**
**मुंबई दि.२० मार्च-**

सत्ताधारी पक्षाला साथ देऊननियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या सभापती आणि अध्यक्षांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज राज भवन येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन तक्रार केली. त्याबाबत योग्य कार्यवाही करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

संसदीय प्रणालीमध्ये विरोधी पक्ष हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यांची भूमिका ही सरकार विरोधी नसून सरकारच्या निर्णयावर आणि धोरणांवर अंकुश ठेवणारी आहे. आवश्यक तेथे टीका करणे आणि पर्यायी धोरण सुचविणे आहे. मात्र महाराष्ट्र विधानपरिषद व विधानसभा सभागृहामध्ये सभापती व अध्यक्ष यांचेकडून सभागृहाच्या कामकाजात पक्षपाती व एकांगी भूमिकेचा अवलंब केला जात आहे. दोन्ही सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये संसदीय परंपरांचे पालन न करता नियम बाह्य सभागृहाचे कामकाज चालविले जात आहे.त्याला आळा घालण्यात यावा, विरोधी सदस्यांना बोलण्याची संधी देऊन त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधिमंडळ गटनेते व आ. आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अनिल परब, भास्कर जाधव, भाई जगताप,शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, सुनील राऊत,सचिन अहिर, आनंद बाळा नर, प्रवीण स्वामी, अभिजित वंजारी, अजय चौधरी, सुनील शिंदे, अरुण शेठ, ज. मो. अभ्यंकर, मनोज जाम सुतकर, सिद्धार्थ खरात, कैलास पाटील व वरुण सरदेसाई आदी उपस्थित होते.

# मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनकडून महाराष्ट्राच्या डिजिटल गव्हर्नन्स मॉडेलला सहकार्य

### बिल गेट्स व देवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २० मार्च :**

राज्यातील शासकीय कामामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास सुरूवात झाली आहे. या डिजिटल गव्हर्नन्स आणि राईट टू सर्विसम ध्ये महाराष्ट्राला देशात मॉडेल करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनकडून सहकार्य दिले जाईल. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महिला स्वयंरोजगाराच्या २५ लाख लखपती दिदींच्या उद्दिष्टपूर्तीसाठी या उपक्रमात सहभाग घेवून महिलांना उद्योजक बनविण्यात गेट्स फाऊंडेशनने भागीदारी घेण्याची तयारी दर्शवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि म ायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक, प्रख्यात उद्योजक आणि गेट्स फाऊंडेशनचे बिल गेट्स यांच्यात सकारात्मक चर्चा झाली.

मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स तसेच गेट्स फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री फडणवीस यांची आज सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांच्यात आरोग्य, कृषी आणि पायाभूत सुविधांम ध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत सकारात्मक चर्चा झाली.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री आणि बिल गेट्स यांची पहिल्यांदाच भेट होत असून याचा आनंद असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र परिवर्तन टप्प्यातून जात असल्याने पायाभूत सुविधा, कृषी, आरोग्यामध्ये मोठे प्रकल्प सुरू आहेत. ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता असल्याने दर्जेदार आरोग्य सेवा-सुविधा देण्यासाठी गेट्स फाऊंडेशने सहकार्य करावे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आरोग्य आणि कृषी क्षेत्रामध्ये करण्यासाठी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. पुणे जिल्ह्यात एआयच्या वापरातून ऊसाचे दुप्पट उत्पादन घेतल्याचे उदाहरणही मुख्यमंत्र्यांनी दिले.

**शाश्वत ऊर्जेसाठी भागीदारी घेणार**

महाराष्ट्रातविविध सामाजिक संस्था, शासकीय संस्था, कंपन्यांच्या सहकार्याने शाश्वत ऊर्जेसाठी भागीदारी घेणार असून याचा शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचेही श्री. गेट्स यांनी सांगितले. महाराष्ट्रात मोठी क्षमता असल्याने महाराष्ट्राचे विकासाचे म ॉडेल जगभर नेण्यास प्रयत्न करण्याची ग्वाही श्री. गेट्स यांनी दिली. बिलगेट्स यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सियाटल भेटीसाठी आमंत्रण दिले. या भेटीप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांना २४ तास वीज देण्यासाठी सोलरचा वापर

शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून यासाठी २०२२-२३ पासून सोलरचा वापर करण्यात येत आहे. ३० टक्के वीज निर्मितीमधून आता ५२ टक्क्यांपर्यंत सोलरमधून वीजनिर्मिती होत असल्याने शेतकऱ्यांना कमी खर्चात वीज उपलब्ध होत आहे. त्यांना २४ तास वीज देण्यासाठी विजेचे सर्व फिडर सोलरद्वारे करण्याचे नियोजन असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी गेट्स यांना दिली. नवी मुंबई येथे ३०० एकर परिसरात इनोव्हेशन सिटी करण्यात येत असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. यावर गेट्स यांनी इनोव्हेशन सिटी आणि इतर उपक्रमासाठी आर्थिक बाबीसोबत तांत्रिक मदतीत भागीदारी करण्याची ग्वाही दिली.

### मलेरियामुक्त महाराष्ट्रासाठी प्रयत्न

महाराष्ट्रात डासांमुळे मलेरिया आजाराच्या रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मलेरियामुक्त महाराष्ट्र करण्यासोबतच डेंग्यू नियंत्रणासाठी गेट्स फाऊंडेशन प्रयत्नशील आहे. यासाठीही तांत्रिक, आर्थिक मदत करण्यात येणार असून गडचिरोली जिल्ह्यापासून याची सुरूवात करण्यात येणार असल्याची ग्वाही गेट्स यांनी दिली.


### २५ लाख लखपती दीदींसाठीही भागीदारी

क्रिस्पर केस नाईन आणिदुग्ध उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मायक्रोसॉफ्ट प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र राज्यातील गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी भागीदारी करणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महिला सबलीकरण आणि स्वयंरोजगारासाठी २५ लाख महिला लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट निश्चित केल्याचे सांगितले, शिवाय गरीब आणि गरजू महिलांना राज्य शासन महिल्यांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून १५०० रूपये देत असल्याची माहिती दिली. या उपक्रमातही सहभाग घेण्यास मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशन तयार असल्याचेही श्री.गेट्स यांनी सांगितले. महिलांचे संपूर्ण आर्थिक व्यवहार डिजिटल करण्यासाठी सहकार्य करण्याची गेट्स यांनी तयारी दर्शवली.

# कुडल येथे नदीत तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू

**सोलापूर, दि. २० मार्च,**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुडल येथील नदीत व्यंकटेश सतीश शिंदे वय २६ वर्षे, रा. गणेश नगर, मडकी वस्ती, पुना नाका, सोलापूर याचा नदीत बुडून मृत्यू झाला. तो आपल्या मित्रांसोबत आंघोळीसाठी नदीवर गेला असताना ही घटना घडली. ही घटना बुधवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडली. आपल्या मित्रासह पोहायला गेलेला वेंकटेश बराच वेळ झाला तरी पाण्या बाहेर येत नसल्याने बाकी इतर तीन मित्रांनी त्याचा शोध घेतला. परंतु तो सापडला नाही. मंद्रूप पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी



शोधकार्य स्थानिकांच्या मदतीने सुरू केले. परंतु तरुणाचा मृतदेह रात्री उशिरापर्यंत सापडला नाही. पुन्हा गुरुवारी सकाळी आठ वाजल्यापासून शोध कार्य सुरू केले असता त्याचा मृतदेह सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास सापडला . मयत वेंकटेश हा मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह चठ होता. मयत वेंकटेशच्या पश्चात आई-वडील एक भाऊ व एक विवाहित बहीण असा परिवार आहे. सतीश दत्तू शिंदे वय ५२ वर्ष राहणार गणेश नगर पुना नाका सोलापूर यांनी मंद्रूप पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार संदीप काशीद तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# सुधारणेतून सुरक्षिततेची हमी!

जन्माला येणाऱ्या प्रत्येकास माणूस म्हणून ओळख मिळते. ते नैसर्गिकही आहे. पण नागरिक म्हणून किंवा कोणत्याही एका देश, प्रदेशातील समूहातील व्यक्ती म्हणून ओळख मिळण्यासाठी त्याच्या माणूसपणालाही नागरिकत्वाच्या कायदेशीर बाबींचे कवच असणे गरजेचे असते. ते तसे नसेल तर माणसाच्या नागरिकत्वाची ओळख पुसली जाते आणि नागरिकत्व नसलेल्या माणसास त्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी असलेल्या कायदेशीर हक्कांपासून वंचित राहावे लागते. म्हणूनच जन्माला आल्यानंतर होणारी पहिली कायदेशीर सरकारी नोंद म्हणजेच, जन्माचा दाखला हा माणसाच्या नागरिकत्वाचा पहिला पुरावा ठरतो आणि अशी नोंद असणे हा जन्माला येणाऱ्या बाळाचा नागरिक म्हणून पहिला हक्क असतो. पण या हक्काला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले. जेथे कायदे असतात तेथे त्यापासून बचाव करण्याच्या पळवाटही असतात. बनावटगिरी करणाऱ्या टोळ्या जागोजागी उगवत गेल्या आणि ज्यांना कायदेशीरपणे हा हक्क मिळविता येत नाही त्यांच्याकरिता बेकायदा जन्मदाखले देऊन त्याद्वारे पैसा कमावण्याचा भ्रष्ट मार्ग उदयास आला. हा भ्रष्टाचार आजचा नाही. गेल्या अनेक वर्षांपासून त्याची पाळेमुळे जागोजागी रुजत गेली. अशा घुसखोरांना आश्रय देण्यासाठी बनावटगिरीचा भ्रष्ट मार्ग अवलंबिणे हा खरे तर देशद्रोह आणि अधिकृत नागरिकांच्या हक्कांवरील घाला ठरतो. पण केवळ कोणत्याही मार्गाने पैसा कमावण्याच्या हावरट वृत्ती वाढत गेली की, भ्रष्टाचाराची लाज वाटणे बंद होते आणि भ्रष्टाचारात बुडालेल्या निर्ढावलेल्या मनाला देशद्रोहाच्या जाणिवा किंवा अन्यांच्या कायदेशीर हक्कांची पायमल्ली केल्याचे दुःखदेखील जाणवत नाही. असा निर्ढावलेपणा अनेकदा सरकारी कर्मचाऱ्यांत उघडकीस आला आहे. खरे तर सर्वसामान्य समाजास भ्रष्टाचाराचे वावडेच असते. भ्रष्ट मार्गाने कोणत्याही सवलती, लाभ प्राप्त करून घेणे किंवा व्यक्तिगत कामे करून घेणे कोणासही फारसे रुचणारे नसते. पण भ्रष्टाचाराची एक साखळी असल्याने, अशा साखळीत जखडल्या जाणाऱ्या व्यक्तीस अनिच्छेनेदेखील भ्रष्ट मार्गाचा अवलंब करावा लागतो. आपण कधीच कोणताही भ्रष्टाचार केला नाही किंवा भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून कोणतेही गैरफायदे उकळले नाहीत, असे छातीठोकपणे सांगणारी माणसे आज समाजात अभावानेच आढळतील, हे वास्तव असल्याने भ्रष्टाचार हाच शिष्टाचार समजण्याचा प्रवृत्ती उजळ माथ्याने वावरत असतात. म्हणूनच पहिल्या हक्कावर घाला घालणारा हा भ्रष्टाचार देशात बोकाळत गेला आणि नागरिकत्वाचे मूलभूत हक्क बहाल करणाऱ्या या सरकारी कागदास बनावटगिरीचा बेमालूम मुलामा देऊन तो विकण्याचा धंदा झाला. गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये अशाच धंद्याचा एक अड्डा उत्तर प्रदेशात रायबरेली जिल्ह्यातील सलोन या गावात उघडकीस आला होता. देशभरातील कोणत्याही राज्याच्या कोणत्याही गावात जन्म झाल्याचा पुरावा म्हणून जन्माचे दाखले देणाऱ्या या टोळीने जवळपास दीड वर्षाहून अधिक काळापासून अवैधपणे राहणाऱ्या अनेकांना जन्माचा दाखला देऊन जन्मतः मिळणारा पहिला हक्क बनावटगिरीने बहाल केला. उत्तर प्रदेशातील ४७ जिल्ह्यांतील नागरिकांचे जन्मदाखले याच गावातील या टोळीने तयार केल्याची धक्कादायक बातमी त्यावेळी उजेडात आली. सरकारी यंत्रणा सजग झाल्या आणि हाथरसमधील एका गावात व्हिडीओद्वारे बनावट ओळखपत्र तयार करून दाखले देणाऱ्या टोळ्यांचाही छडा लागला. या टोळ्यांनी बिहारबरोबरच हरयाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेशातील नागरिकांनाही जन्माचे बनावट दाखले विकल्याचेही स्पष्ट झाले.

देशभरातील अनेक ठिकाणी चालणारा हा धंदा अद्याप बंद झालेला नाही. महाराष्ट्रात मालेगाव, अमरावती, लातूर यांसारख्या शहरांत बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बनावट जन्मदाखले मिळविल्याचे काही धागेदोरे सरकारच्या हाती लागले आहेत. त्यामुळे केवळ माणूस असण्याचा गैरफायदा घेऊन नागरिकत्वाच्या कायदेशीर हक्कांवर गदा आणणाऱ्या या प्रकाराची सध्या महाराष्ट्रात चर्चा सुरू आहे. यापैकी काही उघडकीस आलेल्या प्रकरणांची चौकशी सुरू आहेच; पण तेवढी बाब पुरेशी नाही, हे ओळखून राज्य सरकारने आता कायद्याच्या चौकटी अधिक काटेकोर राहण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या आठवड्यात राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात याची घोषणा केली आणि जन्म-मृत्यूच्या बनावट दाखल्यांचा धंदा रोखण्यासाठी १९६९ च्या संबंधित कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती आखून देणारा निर्णयही जाहीर केला. आता त्याचा शासकीय आदेश जारी झाला असल्याने महाराष्ट्रात अवैधपणे घुसखोरी करून नागरिकत्वाचे लाभ मिळवत बेकायदा धंद्यांना खतपाणी घालणाऱ्या परकीय व्यक्तींच्या व बनावट दाखले तयार करून देणाऱ्या टोळ्यांच्या मुसक्या आवळण्याचा मार्ग सोपा झाला आहे. दीर्घकाळापासून या धंद्याची कुणकुण सरकारी यंत्रणांना लागली होती. अशी काही प्रकरणे आसपास असल्याची कुजबुजही कुठे ना कुठे कानावर येत होती, पण त्याचा बीमोड करण्याची इच्छाशक्ती मात्र महायुती सरकारने दाखविली, याबद्दल फडणवीस सरकारचे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या प्रकरणाचा पुरेपूर पाठपुरावा करून काही प्रकरणांची पाळेमुळे खणून काढली. एका राष्ट्रीय हक्काच्या लढ्यातील त्यांचा हा सहभाग अभिनंदनीय ठरतो.

केवळ नागरिकत्वाचे हक्क बेकायदेशीरपणे उकळणे एवढाच या धंद्यातून निर्माण झालेला धोका नाही. बेकायदेशीरपणे देशात घुसखोरी करून असे दाखले मिळवत राजरोसपणे नागरिक म्हणून वावरणाऱ्या बांगलादेशी किंवा रोहिंग्यांमुळे देशाच्या सुरक्षिततेसही गंभीर धोका संभवत असल्याने, घुसखोरी रोखण्याचे आव्हान स्वीकारण्याचे पहिले पाऊल म्हणून महायुती सरकारच्या या निर्णयाकडे पाहावयास हवे. बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना बनावट दाखले सहज प्राप्त करता येऊ नयेत आणि भारतीयांच्या नागरिकत्वाच्या हक्क प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी संबंधित बदल करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री बावनकुळे यांनी विधिमंडळात दिली. बनावट जन्मदाखले हा केवळ कागदोपत्री फेरफार करून होणारा भ्रष्टाचार नाही, तर त्यामागे घुसखोरी करून देश अस्थिर करणाऱ्या कारवाया करण्याचे एक मोठे षड्यंत्रदेखील आहे. दहशतवादी कारवायांना पोषक वातावरण निर्माण करण्याच्या हालचाली व समाजात भीतीचे वातावरण पसरविण्याच्या कारवायांमागे अशाच शक्तींचा हात असल्याचा संशय व्यक्त होत असतो. अवैधपणे घुसखोरी करून बनावट दाखल्यांच्या आधारे सरकारी योजनांचा लाभ मिळविल्याची काही प्रकरणे लाडकी बहीण योजनेच्या पडताळणीतही उघड झाली होती. त्यामुळे राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय एक मोठे षड्यंत्र उद्ध्वस्त करणारा ठरू शकेल. अर्थात, सरकारी यंत्रणेतील लोभीपणातून भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणारे झारीतील शुक्राचार्य ही या धंद्याची बीजे आहेत. सरकारी कार्यपद्धतीमधील या त्रुटी दूर करण्यासाठी असे प्रकार झाल्याचे सिद्ध होताच संबंधितांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचा निर्णयही सरकारने जाहीर केला असून त्याची कार्यवाही करण्याची इच्छाशक्ती दाखविण्याचे आव्हानही आता शासनास पेलावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या मालेगावसारख्या शहरात हजारो खोटे दाखले देण्यात आल्याच्या तक्रारी सुरू होताच सुमारे तीन हजार दाखले रद्द करण्यात आल्याने सरकारी यंत्रणेतील त्रुटींवर नेमके बोट ठेवले गेले आहे. याच दाखल्यांचा आधार घेऊन अनेक बांगलादेशी घुसखोरांनी भारतीय नागरिक असल्याचा पहिला हक्क प्राप्त केला होता, असेही स्पष्ट झाले आहे. या भ्रष्टाचारात हात असल्याच्या आरोपावरून दोषी सरकारी अधिकाऱ्यांना निलंबित करून राज्य सरकारने आपल्या इच्छाशक्तीचा पुरावा दिला आहेच; पण प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारीच्या जाणिवेची हमीदेखील दिली आहे. त्यामुळे कायद्यात केलेल्या या सुधारणा म्हणजे केवळ प्रशासकीय सुधारणा नाहीत, तर देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित असलेली एक यशस्वी रणनीती ठरली आहे. नागरिकत्वाचा हक्क मिळण्याची प्रक्रिया विश्वसार्ह अशीच असली पाहिजे. त्याची हमी आता प्रामाणिक नागरिकांना मिळेल, यासाठी सरकारच्या नव्या नीतीचे स्वागत करायलाच हवे!

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१५)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात, जग हे धकाधकीचा मामला आहे. संघर्ष, स्पर्धा, ईर्ष्या, प्रभुत्वाची आवड हे मानवी स्वभावाचे मानसशास्त्र आहे. मूलभूत प्रवृत्ती आहे. त्या प्रवृत्तीला अनुसरून विविध साधनांचा उपयोग करून वरील वृत्तीला तृप्त करण्याचा प्रयत्न सतत चालत असतो. त्यातूनच व्यक्तिगत स्तरापासून तो जागतिक स्तरापर्यंतच्या विविध स्पर्धायुक्त संघर्षाच्या ठिणग्या अखंडपणे उडत असतात. त्याच ठिणगीचा वणवा होऊन त्यातून 'महायुद्धे' निर्माण होतात. महाभारतातील कुरुक्षेत्रापासूनचा प्रारंभ झालेला हा प्रवास अद्यापही थांबलेला नाही. त्याचे साद-पडसाद जगातील अनेक भागात आजही उमटताना दिसतात. त्याचमुळे प्रत्येक राष्ट्राला सर्वप्रकारच्या अस्त्र सामर्थ्याने 'नित्यसिद्ध' राहणे, ही काळाची गरज आहे. महाभारताचा अधिकृत वारसदार असलेल्या आधुनिक भारताला तर आहेच आहे. महर्षी व्यासांचा आदेशही तोच आहे, संदेशही तोच आहे की, ''लक्षात ठेवा की, 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र.' त्यासाठी 'पार्था अस्त्रसिद्ध' हो.'' या आदेशाने जसे पांडव संघर्ष सिद्ध झाले त्याप्रमाणे देश, धर्म, समाज आणि संस्कृतीच्या संरक्षणार्थ आणि त्याचा विनाश करण्याचे स्वप्न जोपासणाऱ्या आधुनिक 'धृतराष्ट्री' मनोवृत्तीशी दोन हात करण्यासाठी चक्रवर्ती भरताचे वारसदार असलेल्या प्रत्येक भारतीयाला तयारच राहावे लागेल, ही काळाची चेतावणी आहे. आधुनिक भारताची अस्त्रसिद्धतेकडे त्या दृष्टीने वाटचाल चालू आहे. विविध प्रकारची अत्याधुनिक क्षेपणास्त्रे आणि मिसाईल्स आपल्या 'डी.आर.डी.ओ' आणि 'इस्रो'सारख्या संस्थांद्वारा संशोधित होताहेत; त्यांचे यशस्वी प्रक्षेपण होत आहे, हे भारताच्या भविष्यकालीन होणाऱ्या वाटचालीची हमी देणाऱ्या आणि स्वामी विवेकानंदांनी शंभर वर्षांपूर्वी 'आता केंद्र भारत वर्ष' या केलेल्या भविष्यवाणीची पूर्ततेकडे होणाऱ्या फलनिष्पत्तीचे दर्शक आहे, असे समजायला हरकत नाही.

अत्याधुनिक समजले जाणारे अणुविज्ञान आणि त्यावर आधारित असलेली विविध अस्त्र संपदा या गोष्टी भारतीय ज्ञानपरंपरेला नवीन नाहीत. प्राचीन काळापासून रामायण, महाभारत या महाकाव्यात त्याचे स्पष्ट उल्लेख सापडतात. महज विश्वामित्र हे विविध अस्त्रांचे ज्ञाते म्हणून आजच्या परिभाषेत संशोधक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी यज्ञ रक्षणासाठी राम आणि लक्ष्मण यांना सोबत घेतले. त्या प्रवासात त्यांनी एका मुक्कामात त्या दोघांना गायत्री मंत्रावर अधिष्ठित सुमारे ३०० महाअस्त्रांचे विधिवत दान केले. त्यांचे प्रयोग, प्रकटीकरण, स्तंभन, प्रक्षेपण, उपसंहार या विविध प्रक्रियांचे तंत्र (टेक्निक) त्यांना सांगितले. त्याचा उपयोग राम-लक्ष्मणांनी यज्ञ संरक्षणाच्या वेळी स्वर, दुपण, मारीच यांच्याशी झालेल्या युद्धात १६ हजार बलाढ्य राक्षसांचा विनाश करण्यात यशस्वीपणे केला. पुढे रावणाशी झालेल्या सर्वंकष युद्धातही त्यांना त्याचा उपयोग झाला, हे आपल्याला विदित आहेच.

अणुविज्ञानावर आधारित, मंत्र सामर्थ्यावर अधिष्ठित ही अस्त्र-परंपरा महाभारतात अतिशय विकसित स्वरूपात, बहुआयामी आणि अतिशय सूक्ष्म स्वरूपात (इन सटल फॉर्म) विद्यमान असलेली आढळते. आधुनिक अस्त्र निर्मितीमुळे त्यासंबंधात प्राप्त झालेल्या ज्ञानामुळे आता रामायण-महाभारतात वर्णन केलेल्या या गोष्टी वा युद्धाची वर्णने ही आधुनिक न्युक्लिअर सायंटिस्टला कविकल्पना वा 'पुराणातील वांगी' वाटत नाहीये तर त्यांना त्यात 'सम ग्लिमसेस ऑफ न्यूक्लिअर फ्युझन अँड कॉम्बिनेशन्स' जाणवत आहेत. (एक रशियन संशोधक). त्यामुळे ते भारताच्या प्राचीन युद्ध विज्ञान व त्यातील अस्त्र संपदेकडे आकर्षित झाले आहेत. त्याचे काही उल्लेख आपण मागील दोन लेखांमध्ये पाहिलेच आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील अणुविज्ञानाची शास्त्रशुद्ध परंपरा ही प्राचीन असली, तरी तिचे शास्त्रीय स्वरूप महर्षी कणाद यांच्या वैशेषिक दर्शनात आबद्ध असलेले आपल्याला दिसते. अणू-परमाणूच्या मूलभूत शास्त्रीय व्याख्या (डेफिनेशन्स) शिवपुराण, वायुपुराण यात आढळून येतात. या क्षेत्राशी संबंधितांनी मुळातून त्यांचा शोध घ्यावा. श्री समर्थांनी उपासनेसाठी रचलेले भीमरूपी स्तोत्रात 'अणुपासोनि ब्रह्मांडा एवढा होत जातसे...' त्याच्या पुढे 'मेरुमांदारही धाकुटे' वाटू लागतात. अशा अणूच्या सर्वव्यापी स्वरूपाचे व इतर पदार्थांशी असलेली त्याची सापेक्षता (रिलेटिव्हिटी) स्पष्ट केली आहे. अशा अनेक वैज्ञानिक संकल्पना आपल्या उपासना शास्त्रात दिसून येतात. त्या दृष्टीने आपण उपासना करीत असू तर! कोणत्याही ज्ञान परंपरेचा, शास्त्र परंपरेचा अधिकृत पुरावा हा त्या विषयाशी संबंधित ग्रंथसंपदा असते. भारतात नालंदा आणि तक्षशिला येथे या विविध शास्त्रांशी संबंधित सहस्रावधी ग्रंथांचा संग्रह होता. मानवतेचे, सुसंस्कृतीचे, विविध ज्ञानशाखांचे नष्टचर्य हेच ज्यांच्या धर्मांधतेचे एकमेव लक्षण असलेल्या बख्त्यार खिलजीने विश्वविद्यालयात शिकविणाऱ्या १६०० प्राध्यापकांची कत्तल आणि ६० हजार ग्रंथांना आग लावून भस्म करण्याचे नृशंस कृत्य केल्याची नोंद इतिहासाने केली आहे. त्यातून फार थोडे ग्रंथ परदेशी प्रवाशांनी त्यांच्या देशात नेले. बौद्ध भिक्षूंनी तिबेटमध्ये नेलेत. त्यावरूनही अणुविज्ञान, अस्त्रविज्ञान किती पराकोटीला गेले होते, याची कल्पना येऊ शकते. त्यातील काही प्रमुख ग्रंथांची नावे अशी-

१) **शक्ती तंत्र** : महर्षी अगस्ती- मूळ प्रकृतीपासून निर्माण होणाऱ्या ३२ विविध एनर्जीचे विश्लेषण.

२) **अंशुबोधिनी** : महर्षी भारद्वाज- अणू-परमाणू, त्यांची स्पंदने, गती त्यांचे संघनन (ॲसिमिलेशन), विघटन (अणूचे विच्छेदन) याचे तंत्र सूर्यकिरणातील विविध शक्तीचे मापन यांच्या साह्याने अस्त्रांचा वापर महाभारतातील द्रोणाचार्य हे भारद्वाज कुलोत्पन्न होते.

३) **सौदामिनी कला** : महर्षी मातंग- यात प्रकाशलहरी व नादलहरी यांच्या संशोधनातून अनेक अद्भुत प्रयोगांची क्षमता असणारी अस्त्रसंपदा निर्माण करणे.

४) **यंत्र सर्वस्व** : भारद्वाज- संकल्पानुसार टारगेट-ओरिएंटेड मिसाईल युक्त अनेक यंत्रांची, विमानांची निर्मिती कशी करायची, याचे समग्र विवेचन करणारा ग्रंथ. (स्वर्गदर्शन ग्रंथामधून १९५९)

या प्रकारच्या अनेक ग्रंथांची निर्मिती ऋषिमुनींनी केली होती. त्यावर आमचे युद्ध विज्ञान आधारित होते. उग्र तपस्येमुळे 'शापदग्ध' करण्याच्या मंत्रशक्तीचे मनोबल आमचे होते तर त्याच धारावरील अस्त्रविद्येने आम्ही युद्धात अजिंक्य असे होतो. 'शापादपि शरादपीचे' सामर्थ्य असलेल्या असंख्य अशा नरसिंहाचा हा भारत होता. त्याचमुळे 'कृण्वन्तो विश्वमार्यम्?' ही त्याची गर्वोन्नत मानेनी, आत्मविश्वास संपन्नतेची घोषणा होती. आव्हान होते.

...आज ते 'आव्हान' आम्ही देऊ शकू का?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# पोलिस दादा असे काय करता?

समाजात शांतता आणि सौहार्द राखणे, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना नियंत्रित करणे, वेळप्रसंगी त्यांना अटकही करण्याचे कर्तव्य पोलिसांना पार पाडावे लागते. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' म्हणजे चांगल्यांचे रक्षण करणे आणि वाईटांचा नाश करणे हे ब्रीद घेऊन पोलिस तुमच्या आमच्या सेवेत '२४ बाय ७' असतात. त्यांना उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्याची चिंता नसते. फक्त कायदा व सुव्यवस्था कायम राखणे हीच त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका. महाराष्ट्र पोलिस भारतातील सर्वात मोठ्या पोलिस दलांपैकी एक आहे. महाराष्ट्र पोलिस दल २ जानेवारी १९६१ रोजी स्थापन झाले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी महाराष्ट्र पोलिस दलाला ध्वज प्रदान केला; तोच पोलिस दलाचा स्थापना दिन समजला जातो. महाराष्ट्र पोलिस दलात १२ पोलिस आयुक्तालये व ३४ पोलिस अधीक्षक कार्यालयं आहेत. गंभीर परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अतिरेकी कारवायांना तोंड देण्यासाठी राज्य राखीव पोलिस दल, गुन्ह्यांच्या तपासासाठी गुन्हे शाखा, वाहतूक व्यवस्थापन आणि रस्ते सुरक्षेसाठी वाहतूक शाखा, सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सायबर गुन्हे शाखा, दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी दहशतवादविरोधी पथक तयार करण्यात आले आहे. सामान्य नागरिकांना थेट संपर्क करता यावा यासाठी पोलिस नियंत्रण कक्ष १००, महिला हेल्पलाईन १०३, ज्येष्ठ नागरिक हेल्पलाईन १०९०, सायबर हेल्पलाईन १९३० या क्रमांकावर डायल केल्यास पोलिस अवघ्या काही मिनिटांत म्हणजे शक्य होईल तेवढ्या कमी वेळात घटनास्थळी पोहोचतात, असा दावा केला जातो. पोलिस कर्मचाऱ्यांची नोकरी फारच जिकरीची आहे. दोन दिवसांपूर्वी नागपुरात झालेल्या दंग्यात पोलिसांवर दगडफेक झाली तर वरिष्ठ पोलिस अधिकारी कुऱ्हाडीचा घाव झेलत जखमी झाले. कमी वेतन असलेले पोलिस असे काहीसे चित्र आता पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी पोलिसांना पगारच काय मिळतो म्हणून ते चिरीमिरीच्या मागे लागतात, असे बोलले जात होते. आता मात्र त्यांची ती परिस्थिती राहिलेली नाही. (कोणत्याही पदावर, कोणत्याही शासकीय विभागात आणि वेतन कितीही रग्गड असले ते खिसा गरम करीत नाही, असे नाही. त्यामुळे त्यातून पोलिस तरी कसे सुटावे). पण, पोलिस प्रशासन हे सामान्य नागरिकांसोबत थेट संपर्कात येते. त्यामुळे त्यांनी दु:खी-कष्टी सामान्य नागरिकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजे. झाले असे की, वर्धा जिल्ह्यातील वडनेर येथील मूळ रहिवासी असलेल्या दर्शन मुंगळे या २५ वर्षांच्या तरुणाचा जालना जिल्ह्यातील देऊळगाव राजानजिक रस्त्यावर अपघात झाला. पोलिसांच्या नजरेत तो अपघात तर त्या मुलाच्या पालकाच्या भावनांतून तो घातपात! दोघांचेही आपआपल्या ठिकाणी सत्य असल्याचे आपण एकदा समजून घेऊ. पण, ज्यांच्याकडे समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली त्यांनी आपल्या पदाला न्याय देत आलेल्यांचे समाधान केलेच पाहिजे ना! त्याच कर्तव्याचे वेतन शासन आपल्या बँक खात्यात जमा करते, हे विसरता कामा नये! पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी त्या युवकाचे वडील घटनास्थळावर नव्हते. तरीही पंचनाम्यामध्ये चक्क घटनास्थळ मृतकाच्या वडिलांनी दाखवल्याचे लिहून मोकळे झाले. मृतकाचे शवविच्छेदन अहवाल पोलिसांनी आणणे अपेक्षित असताना जालना पोलिसांनी मृतकाच्या वडिलांना अहवाल आणण्याचा सल्ला दिला. आता सांगा, तो अहवाल वर्धेतून जालन्यात गेलेल्या मृतकाच्या पालकांना कसा दिला जाईल! विशेष म्हणजे ज्या मुलाला अपघात झाला त्या मुलाच्या मोबाईलचा सायबर विभागाकडून सीडीआर दिलाच गेला नाही. तरुण मुलगा गेल्यानंतर त्या बापाच्या वेदना समजू नये? आमचा अजूनही खाकीवर विश्वास आहे. तरीही पोलिस दादा तुम्ही असे का वागू शकता. हो, आहे तुमच्यावर कामांचा ताण. तुम्हाला अधिकार आहेत म्हणून काय, तुम्ही आलेल्यांना हेलपाटेच मारायला लावणार? काल-परवा वर्धा पोलिसातील एका सहायक पोलिस निरीक्षकाने वन विभागाच्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. हा मुद्दा आर्वीचे आ. सुमित वानखेडे यांनी अधिवेशनात उपस्थित केला. पोलिसावर निलंबनाची कारवाई झाली. म्हणून गावागावांत आ. वानखेडे थोडीच उभे होणार आहेत. याचा अर्थ पोलिस खातेच वाईट आहे असेही नाही. काही पोलिस कर्मचारी, अधिकारी अपवादही आहेत. पण, आपल्याकडे चांगल्यापेक्षा वांगल्याचीच चर्चा जास्त होते. विविध पुस्तके, चित्रपट, टीव्ही मालिकांमधून देशातील पोलिस दलाचे बरेवाईट चित्रणही झाले. फ. मुं. शिंदे यांची 'पोलिस नावाचा माणूस' ही बोलकी कविता आहे. त्यात पोलिसांची व्यथा त्यांनी मांडली असली, तरी सामान्यांच्या व्यथा पोलिस दादांनी समजून घेतल्या पाहिजे तेव्हाच खाकीवरचा विश्वास अजून दृढ होईल पोलिस दादा!

९८८१९०३७६५

## दखल

# धर्मयोद्धा देवेंद्र फडणवीस

**मोरेश्वर बडगे**

बऱ्याच वर्षांनंतर नागपूरने भयंकर दंगल अनुभवली. नागपूर शहर तसे पाहिले तर दंगलीचे गाव नाही. इथे साऱ्या जाती-धर्माचे लोक सलोख्याने राहत आले आहेत. नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस या दोन नेत्यांच्या गावात दंगल होते, जाळपोळ होते, लोकांपेक्षा पोलिस जास्त जखमी होतात हा प्रकार चिंतेचा विषय नक्कीच होतो. प्रभू श्रीरामाच्या शोभायात्रेवर फुले उधळणारा समाज अचानक असा का बिथरला? या दंगलीमागे सुनियोजित कट आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दंगेखोरांचे चेहरे चौकशीत फाटतील, पण गृहमंत्री या नात्याने फडणवीसांनी दंगल पसरू दिली नाही हे महत्त्वाचे. दुसरा एखादा असता तर बावचळून नको ते आदेश दिले असते. परिस्थिती चिघळली असती. गोळीबारात मेलेल्यांना दंगलखोरांनी 'हुतात्मा' म्हणून मिरवले असते. देशभर दंगे भडकले असते. फडणवीसांनी त्यांना ती संधी दिली नाही. पोलिसांनी दगड अंगावर झेलले. ३३ पोलिस रक्तबंबाळ झाले. पण एकही गोळी सुटली नाही. एका पोलिस उपायुक्तांच्या पायावर कुऱ्हाड चालली. त्याच्या कंबरेला पिस्तूल होती. तो पिस्तूल झाडू शकला असता. फडणवीसांची रणनीती हिट झाली. एकाच दंग्यात लाखो पोलिसांचे 'हिंदुत्व सेने'त रूपांतर झाले. फडणवीस एका अर्थाने 'धर्मयोद्धा' ठरले आहेत.

फडणवीस यांच्याकडे साईबाबाने सांगितलेले श्रद्धा आणि सबुरी हे दोन्ही गुण आहेत. औरंगजेबाच्या कबरीच्या बंदोबस्ताला ते आपले पोलिस देतात तेवढ्याच खंबीरपणे कबरीचे महिमामंडन होऊ देणार नाही हेही सांगतात. गुणांचा हा संगम बाळगणारे असे नेते अलिकडे दुर्मिळ झाले आहेत. म्हणूनच फडणवीसांचे वेगळेपण ठळकपणे नजरेत भरते. हिंदू धर्म संकटात आहे असे ज्यांना ज्यांना वाटते त्या त्या सर्वांनी फडणवीस यांचे अभिनंदन केले पाहिजे. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. गुढीपाडव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात येत आहेत. दंगलीचे वातावरण टिकले असते तर मोदींचा दौरा रद्द होण्याची शक्यता होती. फडणवीसांच्या प्रयत्नाने मोठी विदेशी गुंतवणूक राज्यात येऊ घातली आहे. तिला ब्रेक लागायचीही भीती होती. दंग्याच्या गावात कुठला उद्योगपती कशाला पैसे लावणार? तरीपण नागपुरात दंगल होते हा विषय सर्वांनाच चिंतन करायला भाग पाडणारा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म जिथे झाला त्या नागपुरातच हिंदू मार खात असतील तर जगातल्या हिंदूंनी कोणाकडे आशेने पाहायचे, असा प्रश्न सर्वसाधारण हिंदूंना पडणे स्वाभाविक आहे. पण म्हणून डोक्यात राख घालून चालणार नाही. कायद्यानेच चालावे लागेल. फडणवीस शांत डोक्याने तेच करीत आहेत. काट्याने काटा. सामान्य मुसलमान शांतताप्रिय आहे. या दंगलीमागे धर्मांध माणसं आहेत. त्यांना कसे हाताळायचे ते फडणवीस यांना छान ठाऊक आहे. नरेंद्र मोदींचा 'गुजरात पॅटर्न' फडणवीस चालवतील. सध्या रात्री वैऱ्याच्या आहेत. समाज ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. साध्या साध्या गोष्टीही हवा



पेटवू शकतात. त्यासाठी बुलडोझर घेऊन फिरण्याची गरज नाही. कडक प्रशासन दिले तर दंगेखोरांची हिंमत होणार नाही. फडणवीस यांचा हाच फॉर्म्युला आहे. खऱ्या अर्थाने फडणवीस हे धर्मयोद्धा आहेत.

तरीही नागपुरातच दंगल का व्हावी हा प्रश्न छळतो. औरंगजेबाची कबर तिकडे मराठवाड्यात आहे. तिकडे काही होत नाही आणि इकडेच मूठभर मुसलमान दंगा करतात, याचे कोडे अनेकांना सुटत नाही. सोपे आहे. नागपुरात संघाचे मुख्यालय आहे. दुसरे म्हणजे सध्या राज्यातल्या हिंदूंचा चेहरा देवेंद्र फडणवीस नागपूरचा आहे. त्यामुळे त्यांचे टार्गेट नागपूर झाले. विरोधकांच्या निशाण्यावरही फडणवीसच आहेत. गेल्या पाच वर्षांत फडणवीसांनी विरोधी पक्षांना अस्वस्थ करून सोडले आहे. त्यांनी उद्धव ठाकरेंची शिवसेना फोडली. शरद पवार राष्ट्रवादी पक्ष फोडला. छळकपटाने आलेले उद्धव ठाकरेंचे महाविकास आघाडीचे सरकार पाडले. फोडाफोडी करून आलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार भाजपाच्या सरकारसोबत आहेत तर उद्धव ठाकरे आणि शरद पवार रस्त्यावर आहेत. जळफळाट आहे तो हा. कसेही करून देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करायची संधी विरोधी पक्ष शोधत आहेत. त्यांच्या हाती काही लागत नव्हते. औरंग्या नावाचा फटाका त्यांनी फोडून पाहिला. पण तो चक्क लवंगी फटका निघाला. विरोधकांची फजिती सुरू आहे. फडणवीसांना कसे रोखावे हेच त्यांना कळेनासे झाले आहे. नाना पटोले यांच्या जागी राहुलबाबाने पाठवलेले हर्षवर्धन सपकाळ तर नमुना निघाले. सपकाळांनी फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केली. मुख्यमंत्री फडणवीस हे औरंगजेबापेक्षाही क्रूर प्रशासक आहेत, असे बोलून सपकाळांनी काँग्रेसचीच गोची केली. पुढे त्यांनी सारवासारव केली तो भाग वेगळा. नाना पटोले काँग्रेस बुडवायला निघाले म्हणून त्यांना बदलायचे ठरले. पण आणायचे कोणाला? काँग्रेसकडे लायक माणसं कुठे आहेत? जी येतात तो मोठी व्हायला येतात. काँग्रेस मात्र बुटकी होत जाते. शेवटी राहुलबाबाने चिट्ठी काढली असणार. पहिल्या चिट्ठीत हे सपकाळ काँग्रेसच्या पदरी आले. आतापर्यंत काँग्रेस हा मुस्लिमांचा पक्ष अशी प्रतिमा होती. सपकाळांनी काँग्रेसला हिंदुविरोधी पक्ष बनवून टाकले. म्हणजे घाट्यात घाटा. एक लक्षात घ्या. सामान्य मतदार आता हुशार झाला आहे. हिंदुविरोधी भूमिका घेऊन यापुढे कोणी सत्तेत येऊ शकत नाही. औरंगजेबाच्या कबरीच्या काय व्हायचे ते होईल. मात्र इकडे काँग्रेसचे नेतेच काँग्रेसची कबर खोदायला निघाले आहेत. तुम्ही लिहून घ्या. पुढची निवडणूक काँग्रेस पाहत नाही. पाच वर्षांपूर्वी काँग्रेसचे ४४ आमदार निवडून आले होते. यावर्षी काँग्रेस पाचव्या नंबरला आहे. फक्त १६ आमदार. शिवसेना फुटली तरीही उद्धव ठाकरेंनी २० आमदार आणून चौथा नंबर पटकावला. मात्र, काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाच्या तब्बल २८ जागा कमी होतात, या तब्येतीला काय म्हणायचे?

आता तर कहर झाला. विधान परिषदेची निवडणूकही काँग्रेस लढवू शकत नाही. केविलवाणी स्थिती आहे. काँग्रेस काय, उबाठा आणि शरद पवारांची राष्ट्रवादीही लढवू शकत नाही. कारण महाआघाडी म्हणूनही पुरेसे संख्याबळ नाही. विधान परिषदेच्या पाच आमदारांची विधानसभेवर निवड झाल्याने रिकाम्या झालेल्या या जागांसाठी पोटनिवडणूक लागली आहे. महायुतीचे २३७ आमदार आहेत. एवढे प्रचंड बहुमत असल्याने पाचही जागी महायुतीचे आमदार अविरोध निवडून येतील. तीन जागी भाजपा आणि एकेक जागेवर शिंदे सेना आणि अजितदादांचा माणूस निवडून येणार आहे. भाजपाच्या उमेदवारांना अवघ्या १४ महिन्यांची आमदारकी मिळणार आहे. या १४ महिन्यांसाठीही भाजपामध्ये उड्या होत्या. नागपुरात प्रवीण दटके यांच्या जागी कोणाला संधी मिळते, याची उत्सुकता होती. यावेळी तिकिटं देताना भाजपाने मूळ कार्यकर्त्यांना संधी दिली हे विशेष. त्यातला एक चक्क ब्राह्मण आहे. सध्याच्या तिकिटाच्या गणितात अशक्यप्राय वाटणारी गोष्ट झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांचे लंगोटीमित्र नागपूरचे माजी महापौर संदीप जोशी यांना लॉटरी लागली. संदीप जोशी यांना या आधीही भाजपाने पदवीधर मतदारसंघातून संधी दिली होती. तेव्हा तर फडणवीस मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी त्यांना तेव्हा मात दिली होती. तो वार फडणवीसांच्या जिव्हारी लागला असावा. सामाजिक तसेच क्रीडा क्षेत्रात जीव झोकून काम करणाऱ्या एका मूळ कार्यकर्त्याच्या पाठीवर भाजपाने हात ठेवला आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## अद्भुत, अचाट, अविश्वसनीय...

आपण काही वेळाकरिता लिफ्टमध्ये अडकतो, तर आपल्या अंगाला घामाच्या धारा लागतात, भीतीने अर्धमेले होतो, तरी बरं लिफ्टच्या बाहेरचे लोकं धीर देत असतात. काही मिनिटात लिफ्टचा लाईट लागतो, जणू जीवनात नवा प्रकाश आला, फॅन सुरू होतो, वाऱ्याची झुळूक अंगात गेलेले प्राण आणते, शेवटी लिफ्ट योग्य मजल्यावर थांबते आणि हुश्श...

आता विचार करा नऊ दिवसांसाठी गेलेल्या सुनीता विलियम्स एक नाही, दोन नाही तब्बल नऊ महिने अंतराळातील स्पेस क्राफ्टमध्ये अडकतात. काय असेल आतली परिस्थिती, गुरुत्वाकर्षण नाही, आपल्यासकट सगळं तरंगतंय. अवकाशात समाधीच घ्यावी लागणार असे वाटते आहे. पण स्वतःचा आत्मविश्वास, मनोबल, शारीरिक बळ कायम ठेवायचं, केवढं अचाट, अद्भुत, अविश्वसनीय. या भयावह, धोकादायक, असह्य, तणावपूर्ण, आधारहीन अवस्थेत सुनीता आणि तिचा सहकर्मी पृथ्वीला ४५७६ प्रदक्षिणा घालतात. हे अंतर मोजले तर एकूण १२ कोटीपेक्षा जास्त मैल प्रवास करतात. यानंतर कितीतरी शास्त्रज्ञ आपले ज्ञान पणाला लावतात, असफल होतात, पण प्रयत्न सोडत नाही. धरतीवर हे तमाम शास्त्रज्ञ आणि अंतराळात सुनीता आणि विल्मर बूच प्रयत्नांची शिकस्त करतात. अखेर त्यांचा पृथ्वीवर वापस येण्याचा, सुटकेचा मार्ग शोधला जातो. पृथ्वीवर परत यायला जवळपास १९५ दशलक्ष किलोमीटर प्रवास करायचा असतो. (आधीचे पृथ्वी प्रदक्षिणेचे १२ कोटींपेक्षा जास्त आणि हे १९५ दशलक्ष किलोमीटर व जातानाचे १९५ दशलक्ष किलोमीटर, गणित कर्णमाने ज.ज.) ६२ तास ६ मिनिटे विक्रमी स्काय वॉक करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. केवळ अद्भुत, अचाट, अविश्वसनीय...

**रवी वाघमारे**/नागपूर

## वाचक पत्रे

### औरंग्याची कबर उखडून फेका

क्रूरकर्मा, मोगल शासक औरंगजेबाची कबर महाराष्ट्रात आहे, ही आपल्याकरिता दुर्दैवी बाब आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे अनन्वित हाल करून मारणारा, क्रूरकर्मा, दुष्ट राक्षस औरंग्याचे थडगे संभाजीनगरमधून उखडून फेकणे हे अतिशय आवश्यक झाले आहे. संभाजीनगर शहरात औरंग्याची कबर छत्रपती संभाजी महाराजांच्या अपमानाच्या वेदनेची सल बोचणारी आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहासातील पराक्रम व बलिदान हे देव, देश आणि धर्मासाठी अर्पण केलेले ओजस्वी पुष्प आहे. औरंग्या, अफजल्यासारख्या राक्षसावर प्रेम करणारे, अभिमान बाळगणारे जहरी हिरव्या सापांची पिलावळ या कबरीमधून बाहेर येत आहे. देशविघातक जंत रोज निर्माण होत आहे. त्यातूनच जेहादी समस्या आपल्या देशापुढे तोंड फाडून उभ्या आहेत. अशा जेहादी जंतांना ठेचण्याची हीच वेळ आहे. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात औरंग्याचा उदो उदो कसा होतो. क्रूरकर्म्याचे महिमामंडन कसे केले जाते. थडग्याचे त्या पर्यटन कसे केले जाते. अफजल्याच्या थडग्याभोवती मोठे बांधकाम करण्यात आले होते. काही राजकीय नेत्यांना मतपेटी काळजीपोटी राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आजच्या घडीला ही कबर बुलडोझरने उद्ध्वस्त करणे आवश्यक झाले आहे. औरंग्याच्या औलादींनी हिंदुस्थानातला भारतीय विचार नेस्तनाबूत करण्यासाठी, सनातन प्राचीन मंदिरे उद्ध्वस्त करून मशिदी उभारण्यासाठी, देशातील निरपराध नागरिकांना ठार मारणे ही क्रूर वर्तने कित्येक शतकांपासून सुरू आहे. या जेहादी वृत्तीला गाडण्यासाठी औरंग्याला गाडलेली कबर उखडून फेकण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. हीच वर्तमानातील छत्रपती शिवरायांना अभिप्रेत असलेली स्वराज्य रक्षणाची वीरवृत्ती आहे. छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज सकल भारतीय समाजाचे मानबिंदू आहे. पवित्र मानबिंदूचे रक्षण करणे सकल भारतीयांचे आद्यकर्तव्य आहे. नागपुरात जेहादी हिंसाचाराचा सैतानी भेकड आगडोंब हा पद्धत काही नवीन नाही. ही तीच पद्धत मोगलांची होती. जाळपोळ, दगडफेक हिंदूंच्या घरांना आगी लावणे, महिलांवर अत्याचार करणे या जेहादी हिंसाचारात औरंग्याची पिलावळ वळवळत होती. हिंदू समाज निद्रिस्त झाला तर जेहादी मानसिकतेची बांडगुळे सळसळतात. तेव्हा हिंदू समाजाने आपली संघटित शक्ती जागृत केली पाहिजे. संघटित शक्तीने औरंग्याची कबर नेस्तनाबूत करावी लागेल. जेहादी दंगेखोर ज्या ज्या बिळात लपलेले असेल त्यांना शोधून ठेचले पाहिजे.

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

### फूटपाथवरील अतिक्रमण

नरेंद्रनगर चौकात महानगर पालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी दुकानांसमोर फूटपाथ बांधले आहेत. लोकांना या मार्गावरून ये-जा करता येते. मात्र सद्यस्थितीत श्रीनगर परिसरात येणाऱ्या रिंगरोडवरील दुकानांसमोर अनेक फुटकळ दुकानदारांनी आपली दुकानदारी उघडली असून नागरिकांना आणि विशेषतः एम्प्रेस मिलच्या फ्लॅटधारकांना अडचण निर्माण होत आहे. महापालिकेने दखल घ्यावी, ही विनंती.

**हरीश चौधरी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# शहरातील स्वच्छता मोहीम अंतिम टप्प्यात

**आतापर्यंत ५१० ठिकाणे केली स्वच्छ-सुंदर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**

महापालिकेच्या वतीने कचरा उघड्यावर टाकण्यात येणारी अशी ठिकाणे स्वच्छ करण्याच्या विशेष मोहिम अंतिम टप्प्यात आली आहे. गेल्या १६ दिवसात ५१० ठिकाणे स्वच्छ अन् सुंदर करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी रांगोळी घालण्यात आली. यामुळे त्या ठिकाणाचे चित्र बदलल्याचे पाहायला मिळाले. माजी नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून याबाबत समाधान व्यक्त होत आहे.

सोलापूर शहर स्वच्छ व सुंदर असावे, शहरात उत्तम व आरोग्यदायी वातावरण राहावे. शहराचे सौंदर्य अबाधित राहावे तसेच नागरिकांचे आरोग्यविषयक जीवनमान उत्तम राहावे याकरिता सोलापूर महानगरपालिकेकडून दैनदिन स्वच्छतेचे काम



काजाशिवाय महानगरपालिकेकडून दोन वेळा विशेष शहर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दरम्यान, शहरात नागरिक मोठ्या प्रमाणावर कचरा टाकतात अशी आणखी सुमारे ५९३ ठिकाणे आढळून आली. अशा ठिकाणच्या भागात घंटागाड्या या घरोघरी नियमित जात नाहीत अथवा घंटागाडीमध्ये कचरा न टाकता नागरिक बेजबाबदारपणे कचरा उघड्यावर टाकतात. याबाबत संबंधित मुख्य आरोग्य निरीक्षक अथवा आरोग्य निरीक्षक यांचे योग्य नियंत्रण नाही असे दिसून येते. त्यामुळे पुनश्चः कचऱ्याचे ढीग हटविण्यासंदर्भात विशेष स्वच्छता मोहीम ३.० राबविणेत येत आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. ५ मार्चपासून ही मोहीम सुरू झाली. या १६ दिवसाच्या कार्यकाळात ५९३ पैकी ५१० ठिकाणे चकाचक करण्यात आली. ही कार्यवाही झाल्या नंतर मात्र पुनश्चः अशा ठिकाणी कचऱ्याचे ठिकाण निर्माण होणार नाही याची खबरदारी मुख्य आरोग्य निरीक्षक तसेच आरोग्य निरीक्षक हे घेणार आहेत. कचऱ्याची ठिकाणाच्या आजूबाजूचे भागामध्ये असलेल्या नागरी/व्यापारी क्षेत्रामधील दुकानातील कचरा रोज उचलण्यासाठी घंटागाडी प्रत्येक घरोघरी व दुकानी कचरा संकलनासाठी पोहोचणार आहे.

## क्राईम वृत्त...

### सायकल चोरीनंतर सीसीटीव्ही बघण्यास सांगितल्याने मारहाण

**सोलापूर, दि.२० मार्च-**

सायकल चोरी गेल्यानंतर त्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरा तपासून सांगा असे सांगितल्याच्या कारणातून दोन मुलींनी तसेच इतर अनोळखी एकाने मारहाण करून महिलेस जखमी केले. हा प्रकार १८ मार्च रोजी रात्री ८.३० वाजता घडला. याबाबत सुनंदा राजू गोतसुर्वे (वय ४५, रा. सर्वसुखी नगर, निर्मिती विहार, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्वेता व निता यांच्यासह अनोळखी व्यक्तीविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादीचा भाचा शिकवणीकरीता जातो. तेथून त्याची सायकल चोरी झाली. तेव्हा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात पाहून सांगा असे फिर्यादीने चिवरीकर सर यांना सांगितले. यावरून श्वेता आणि निता या त्यांच्या मुलींनी सिमा गायकवाड यांना शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. त्यावेळी अनोळखी व्यक्तीने पाठीमागून डोक्यात लाकडाने मारून फिर्यादीस जखमी केले. या गुन्ह्याचा तपास हवालदार सोनार करत आहेत.




### पार्टीत जेवला नाही म्हणून तरुणाला बेदम मारहाण

**सोलापूर, दि.२० मार्च-**

'तू आमच्या पार्टीमध्ये न जेवता का गेला?' असे म्हणत चौघांनी मिळून तरुणाला लाकडाने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्याचा प्रकार धनाळी (ता. द. सोलापूर) येथे बुधवारी रात्री ९:३० च्या सुमारास घडला. सोमनाथ लक्ष्मण कोळी (वय २४, रा. धनाळी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. या मारहाणीत सोमनाथच्या डोक्यास व सर्वांगास मुका मार लागला. त्याच्यावर वळसंग येथील सरकारी दवाखान्यात उपचार करून डॉक्टरांच्या सल्ल्याने जखमीची बहीण सुरेखा जमादार यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.



### सिद्धेश्वर नगरात पत्नीवर कुऱ्हाडीने वार

**सोलापूर, दि.२० मार्च-**

घरगुती वादातून रागाच्या भरात नवऱ्याने पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचा प्रकार नई जिंदगी, सिद्धेश्वर नगरात गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास घडला. शबाना मैनुद्दीन पिरजादे (वय ३३, रा. सिद्धेश्वर नगर, नई जिंदगी, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. यातील जखमी शबाना व तिच्या पतीचे भांडण झाले होते. मारहाणीत तिच्या डोक्याला जखम झाली असून, सर्वांगास मुका मार लागला आहे. दुपारी पावणेएकच्या सुमारास तिचा दीर सनाउल्ला पिरजादे याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. जखमी बेशुद्ध असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सिव्हिल पोलिस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर तालुका उ. सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालीकेच्या हद्दीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नंबर ७४४/२, नविन सर्व्हे नंबर १०/२, दुकान गाळा नंबर ०९, तळमजला, याचे बिल्टअप क्षेत्र १९.९८ चौ. मीटर, कारपेट क्षेत्र १८.५८ चौ. मीटर, मंगल कॉम्प्लेक्स (निलकंठ आर्केड), होटगी रोड, सोलापूर असे आहे. सदर गाळयाचे बाबतीत मे. कृष्णा असोसिएस व राहुल बाळासाहेब अनंतपुरकर यांचेत झालेल्या खरेदी व्यवहाराचे मुळ रजिस्टर खरेदीखत नं. २२१२/२००१ दिनांक ३०/०४/२००१ हा मुळदस्त दिनांक १४/०३/२०२५ रोजी जुना देगाव नाका ते बी.एम.आय.टी कॉलेज सोलापूर येथे पडून गहाळ झाला आहे. याबाबत सदर गाळयाचे विद्यमान मालक राहुल बाळासाहेब अनंतपुरकर यांनी सलगर वस्ती पोलीस स्टेशन सोलापूर येथे गहाळ रजि ३९/२०२५ दिनांक १४/०३/२०२५ रोजी तक्रार दिली आहे. म्हणुन दिनांक १५/०३/२०२५ रोजी सलगर वस्ती पोलीसांनी त्यांना दाखला दिला आहे. सदर मुळदस्त कोणास मिळाल्यास त्यांनी त्याचा गैरवापर करू नये व खालील पत्यावर आणून दयावेत. म्हणून ही जाहीर नोटीस दिली, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : १८/०३/२०२५.

सही/-
एस.पी. सपार. ॲडव्होकेट.
४बी-१/३बी, 'वैष्णवी' रूबी नगर,
जुळे सोलापूर - ४१३ ००८.
मोः ९८२३२३०२०३/९०२८३३३९९८.
अशिलातर्फे ॲडव्होकेट



**DR. BHAI GANPATRAO DESHMUKH SHETKARI SAHAKARI SOOT GIRNI LDT.**
Sangole, Dist Solapur (413307) Maharashtra
Ph No 8262915456, 94523065608
Mail - shecospin@gmail.com

**WANTED**

Application are invited for the post of **"FAINANCCIAL CONTROLLER"** for reputed Spinning Mill working with 41616 spindles.

**EDUCATIONAL Qualification : M.Com / B.Com GDC&A**
**Experience Required : Minimum 10 years in spinning mill.**

Please apply within 07 days with full details of qualifications, Experience, salary drawn and expected:

sd/-
**The Chairman Vic. Chairman**
Dr. Bhai Ganpatrao Deshmukh
Shetkari Sahkari Soot girni Ltd, Sangole.

**Place : Sangola**
**Date : 20/03/2025**



## सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक निय. सोलापूर (विसर्जित)
२९/३० रविवार पेठ, सोलापूर Email - solapurudyogbank@gmail.com

जा.क्र.प्रशासन/३७४/२०२४-२५ — दि. २१/०३/२०२५

**अंतिम सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरीता)**

सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक निय., सोलापूर (विसर्जित) २९/३०, रविवार पेठ, सोलापूर-४१३००५ या बँकेच्या सर्व सभासदांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरची बँक दिनांक ०७/०२/२००४ रोजी अंतिम अवसायनात घेण्यात आल्यानंतर बँकेचा अवसायन कालावधी २० वर्षे संपून गेलेला आहे. त्यामुळे अवसायक यांनी अवसायनाचा अंतिम अहवाल मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांना सादर केलेला असून त्यांनी दिनांक ०७/०३/२०२५ रोजीच्या आदेशान्वये बँकेची अंतिम सर्वसाधारण सभा घेण्यास कळविलेले आहे.

त्यानुसार या अवसायन बँकेच्या सर्व सभासदांची अंतिम सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ०५/०४/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता बँकेचे अवसायक यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करणेसाठी बँकेचे कार्यालय २९/३०, रविवार पेठ, सोलापूर येथे आयोजित केले आहे.

तरी सर्व सभासदांनी आपले ओळखपत्र व बँकेच्या प्रतिनिधी निवडीच्या ठरावासह वेळेत उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) अवसायक यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा घेणे.
२) अवसायन कामकाज आटोपल्यानंतर शिल्लक राहिलेल्या येणे व देणी रक्कमेचा विचार करणे.
३) बँकेची नोंदणी रद्द करणेसंबंधी निबंधकास अहवाल सादर करणेबाबत विचार करणे.
४) अवसायक यांच्या पूर्व परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ : सोलापूर
दिनांक : २१/०३/२०२५

(ए.ए.गावडे)-अवसायक
सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक निय., सोलापूर (विसर्जित)

**विशेष सुचना**

१) ज्या सभासदांना बँकेच्या अंतिम सर्वसाधारण सभेमध्ये काही सूचना व प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. २९/०३/२०२५ रोजीपर्यंत बँकेच्या कामकाजाच्या वेळेत लेखी स्वरुपात आणून द्यावेत. २) अवसायक कामकाजाचा अहवाल बँकेच्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल. ३) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.



## जाहीर समन्स/नोटीस

रे. मु. नं. १२३९/२०१४
नि.नं. ७६

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

**भगवान लिमणा संकपाळ मयत वारस**
**दत्तात्रय भगवान संकपाळ, वगैरे - ३ - वादी**
**विरुध्द**
**बाबू विश्वनाथ भोंग, वगैरे - १६ - प्रतिवादी**

ज्या अर्थी, यातील वादींनी, प्रतिवादींविरुध्द या मे. कोर्टात, डिक्लेरेशन व निरंतर मनाई मिळणेचा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी, खालील प्रमाणे नियोजीत प्रतिवादी नं. १७ व १८ यांना अर्जात दिलेल्या पत्त्यावर, वेळोवेळी समन्स काढूनही, बजावणी झालेली नाही. सदर प्रतिवादी नेमके कोठे राहत आहेत हे माहित नाही. तसा बेलीफ रिपोर्ट नि.नं. ७० वर हजर आहे. तेव्हा सदर प्रतिवादी हे वारंवार राहणेचे पत्ते बदल असल्याने, त्यांचा सध्याचा पत्ता, ठाव ठिकाणा माहित नसलेने, त्यांना वादीस माहित असलेल्या खालील नमूद पत्त्यावर सदरचे जाहीर समन्स काढले आहे.

**प्र.वादी नं. १७ - अर्चना हेमंत भोंग, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरगांव (झाडी), ता. बार्शी, जि. सोलापूर**
**प्र.वादी नं. १८ - हर्षवर्धन हेमंत भोंग, वय १० वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. आई प्रतिवादी नं. १७**

त्यामुळे या जाहीर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की,

त्या अर्थी, सदर जाहीर समन्स / नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता.१५/०४/२०२५ रोजी, सदरकामी हजर राहून, आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत तुमची हरकत वा म्हणणे आले नाही तर, तुम्हांस कांही सांगणे नाही, असे समजून, तुमचे गैरहजेरीत पुढील चौकशी होऊन न्यायनिर्णय होईल.

कळावे हे जाहीर समन्स / नोटीस मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिली असे, ता.१८/०३/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. सि.ज.ज्यु.डि. सो. बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅक्स् को-ऑप असोसिएशन लि. सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर-०१

**कविता अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर - अर्जदार**
विरूध्द
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ११५७ | १८१६५१ | १ | **लक्ष्मी विश्वनाथ चौधरी** ३७८, शुक्रवार पेठ, माणिक चौक, सोलापूर |
| | | | ३ | **गायकवाड समिंदर शेटेप्पा** न्यु बुधवार पेठ, झोन नं ७, घर नं. ७११९, मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर |
| | | | ४ | **शुभम विश्नाथ चौधरी** ३७८, शुक्रवार पेठ, माणिक चौक, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखाल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहेत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार दि.०४.०४.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.२०/३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स
को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर



## SRM E-Tender call Notice

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000035788 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 19/2024-2025**, **Particulars: -** Work of height extension of 132kV Kurkumbh-Daund & 132 kV Kurkumbh-Janai EHV lines at one location due to crossing of NH Pune Hydrabad near 220 kV Kurkumbh substation **Estimated cost:** Rs. 73,85,650/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 73,856/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 14.03.2025 to 30.03.2025 **Last Date of Submission:** 30.03.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 31.03.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**



## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी ४१३४०१

E-mail ID:- am_barshi@msamb.com फोन-०२१८४-२२२९७६

जा.क्र. जाहिरात/८६३ — दि. २१/०३/२०२५

**छपाई व लेखन साहित्य टेंडर सूचना**

उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी, जि. सोलापूर या संस्थेस सन २०२५-२६ करिता छपाई व लेखन साहित्य घ्यावयाचे आहे. छपाई करुन देऊ इच्छिणाऱ्या मुद्रकांनी व लेखन साहित्य देऊ इच्छिणाऱ्यांनी आपल्या लेटरहेडवर सिलबंद पाकीट दि. २८/०३/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावीत. टेंडर पाकीटावर बाजार वर्ष २०२५-२६ च्या छपाई/स्टेशनरी टेंडर असे नमूद करावे निविदा देतेवेळी ऑफीसमधील छपाई नमुने व स्टेशनरी साहित्याचे नावे व नग पाहूनच निविदा द्याव्यात ही माहिती कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

शिक्का

सही/-
कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी



## ई-निविदा सुचना क्र. २५/२०२४-२५

महावितरण

महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदारांकडून कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| T-०१०६/२०२४-२५ | सं व सु विभाग बार्शी अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र जामगाव(अअ) येथे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता. बार्शी, जि.सोलापूर. (कालावधी ३ महिने) | ६.३९ लाख |
| T-०१०७/२०२४-२५ | सं व सु विभाग बार्शी अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र निमगाव आणि जामगाव येथे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता. बार्शी, जि.सोलापूर. (कालावधी ३ महिने) | ८.४१ लाख |
| T-०१०८/२०२४-२५ | सं व सु विभाग बार्शी अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र गौडगाव येथे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता. बार्शी, जि.सोलापूर. (कालावधी २ महिने) | ७.०५ लाख |
| T-०१०९/२०२४-२५ | सं व सु विभाग बार्शी अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र शेंद्रि येथे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता. बार्शी, जि.सोलापूर. (कालावधी २ महिने) | ५.५८ लाख |
| T-०११०/२०२४-२५ | सं व सु विभाग बार्शी अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र सालसे येथे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता. बार्शी, जि.सोलापूर. (कालावधी २ महिने) | ५.१४ लाख |
| T-०१११/२०२४-२५ | सं व सु विभाग अकलूज अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र खडूस येथे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता.माळशिरस, जि.सोलापूर. (कालावधी ३ महिने) | ९.९९ लाख |
| T-०११२/२०२४-२५ | सं व सु विभाग पंढरपूर अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र पंढरपूर लिक रोड येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता.पंढरपूर जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ९.९९ लाख |
| T-०११३/२०२४-२५ | सं व सु विभाग पंढरपूर अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र शिरढोण येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे ता.पंढरपूर जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ९.७५ लाख |
| T-०११४/२०२४-२५ | सं व सु विभाग सोलापूर(ग्रा) अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र बेगमपूर येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ४.७५ लाख |
| T-०११५/२०२४-२५ | सं व सु विभाग सोलापूर(ग्रा) अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र अहेरवाडी येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ४.६५ लाख |
| T-०११६/२०२४-२५ | सं व सु विभाग सोलापूर(ग्रा) अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र कोरसेगाव येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ८.८४ लाख |
| T-०११७/२०२४-२५ | सं व सु विभाग सोलापूर(ग्रा) अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र गोटेवाडी येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे जि.सोलापूर (कालावधी २ महिने) | ३.१७ लाख |
| T-०११८/२०२४-२५ | सं व सु विभाग सोलापूर अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद आदित्यनगर येथे कंट्रोल रूम व शाखा कार्यालयाचे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ९.२५ लाख |
| T-०११९/२०२४-२५ | सं व सु विभाग बार्शी अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्र सपाटणे आणि उपळाई (बु) येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | ७.९० लाख |

ई-निविदा विक्रीचा कालावधी दि. २०.०३.२०२५ ते दि. २५.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २५.०३.२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८५५५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे.मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द् करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीदारांनी राखुन ठेवलेले आहेत.

जनसंपर्क अधिकारी बारामती परिमंडळ बारामती २२१/२०२४-२५

सही/-
**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, बारामती**


### बेरोजगारांनी प्रधानमंत्री इंटर्नशीप योजनेचा फायदा घ्यावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१९ मार्च-**

प्रधानमंत्री इंटर्नशीप योजनेद्वारे सुशिक्षित बेरोजगारांना इंटर्नशीपची संधी दिली जाणार आहे. ही योजना ही सुशिक्षित बेरोजगारांना कौशल्य वृध्दीसाठी व रोजगाराच्या संधीसाठी ३१ मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे दुरध्वनी क्र.०२१७-२९९२९५६ या क्रमांकावर संपर्क साधावा. अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी इंटर्नशिप संधीसाठी http://pminternship.mca.gov.in/ पोर्टलवर नोंदणी करावी. वेबसाईटवर प्रोफाईल तयार करून विविध क्षेत्रातील इंटर्नशिपसाठी अर्ज करावा, या अंतर्गत युवकांना १२ महिन्यांसाठी इंटर्नशिप मिळेल या सोबतच त्यांना दरमहा ५००० रुपये ही मिळतील या शिवाय इंटर्नशिप पुर्ण झाल्यानंतर ६००० रुपये एकरकमी अनुदान दिले जाईल.


## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० व नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम - २०१४ मधील तरतुदीनुसार खालील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे. (तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था बार्शी यांचे कार्यालय)

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव | नामनिर्देशन पत्र विक्री / स्वीकृती करणेचा दिनांक | नामनिर्देशन छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र माघार दिनांक | मतदान दिनांक | मतमोजणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिवप्रभा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी | **सौ. एस.के. मुंडे,** स.अ. श्रेणी-२, अधिन सहा. निबंधक सह. संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २७/०४/२०२५ | २७/०४/२०२५ |
| २ | सहारा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., खामगाव ता. बार्शी | **श्रीमती एम.एम. गुप्ता,** मुलि. अधिन सहाय्यक निबंधक, सह. संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ |
| ३ | साध्वी अहिल्यादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., बार्शी | **श्री. ए.आर. जाधव,** कलि. अधिन सहा. निबंधक, सह. संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ |
| ४ | जनसेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., भालगाव, ता. बार्शी | **सौ. एस.के. मुंडे,** स.अ. श्रेणी-२, अधिन सहा. निबंधक सह. संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ |
| ५ | जयभवानी शेतीमाल भाजीपाला व फळे प्रक्रिया खरेदी-विक्री सह. संस्था मर्या., धामणगाव (बु.) | **अनिस सय्यद,** सहा. निबंधक सहकारी संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ | २६/०४/२०२५ |
| ६ | कै. शोभाताई सोपल प्राथमिक शिक्षक सह. पतसंस्था, मर्या., वैराग | **श्रीमती एम.एम. गुप्ता,** मुलि. अधिन सहाय्यक निबंधक, सह. संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २७/०४/२०२५ | २७/०४/२०२५ |
| ७ | श्री खंडोबा शेतीमाल भाजीपाला व फळे प्रक्रिया खरेदी-विक्री सह. संस्था मर्या., भालगाव | **अनिस सय्यद,** सहा. निबंधक सहकारी संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २७/०४/२०२५ | २७/०४/२०२५ |
| ८ | श्री. गणेश शेतीमाल भाजीपाला व फळे प्रक्रिया खरेदी-विक्री सह. संस्था मर्या., कासारी | **अनिस सय्यद,** सहा. निबंधक सहकारी संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २८/०४/२०२५ | २८/०४/२०२५ |
| ९ | दिलीप सोपल ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. पांगरी | **सौ. एस.के. मुंडे,** स.अ. श्रेणी-२, अधिन सहा. निबंधक सह. संस्था, बार्शी | २४/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ | १/४/२०२५ | २/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ | २८/०४/२०२५ | २८/०४/२०२५ |

टीप :- उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे कार्यालय व संस्थेचे कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. याची नोंद घेण्यात यावी.

सही/-
**तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### थॉमस बाक आयओसीचे आजीवन मानद अध्यक्ष



**ऑलिम्पिया** : थॉमस बाक यांची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) आजीवन मानद अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. २३ जून नंतर आयओसी अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ते हे पद स्वीकारतील. ग्रीसमधील ऑलिम्पिया (कोस्टा नॅव्हरिनो) येथे आयओसी कार्यकारी मंडळाच्या वतीने आयओसीच्या पहिल्या उपाध्यक्ष निकोल होव्हट्र्झ यांनी १४४ व्या आयओसी अधिवेशनात प्रस्ताव सादर केल्यानंतर आयओसी सदस्यांनी उभे राहून टाळ्यांमध्ये उभे राहून हा प्रस्ताव एकमताने स्वीकारला. त्याआधीच, आयओसी सत्रात ऑलिम्पिक एजेंडा सुधारणा करण्यात आली. यात थॉमस बाक यांच्या अध्यक्षतेची व्याख्या केली, असे आयओसीने एका निवेदनात म्हटले आहे. अध्यक्ष बाक यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली गत काही वर्षांत ऑलिम्पिक एजेंडा यशस्वीरित्या अंमलात आणला गेला व तो निश्चितच छोटासा पराक्रम नव्हता.'' असे होव्हट्र्झ प्रस्ताव सादर करताना म्हणाले. आयओसीचे मानद अध्यक्ष म्हणून अध्यक्ष थॉमस बाक यांची आजीवन नियुक्ती करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचा हा योग्य क्षण आहे व कृपया मला परवानगी द्या, असे ते म्हणाले. ■

### जपान फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरणारा पहिला संघ

**सैतामा** : येथे गुरुवारी रात्री खेळल्या गेलेल्या पात्रता फुटबॉल सामन्यात उत्तरार्धात दाईची कामदा आणि ताकेफुसा कुबोने नोंफ्लदविलेल्या गोलच्या जोरावर जपानने बहरीनवर २-० असा विजय मिळविला. या विजयाबरोबरच जपान २०२६ च्या फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरलेला पहिला संघ ठरला. क्रिस्टल पॅलेसच्या आक्रमक खेळाडू कामदाने ६६ व्या मिनिटाला जपानसलाठी पहिला गोल केला. ८७ व्या मिनिटाला कुबोने आणखी एक गोल केला. जपानने पुढील वर्षी अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी आपले तिकीट निश्चित केले. हा त्यांचा सलग आठवा विश्वचषक असेल. सायंकाळी ऑस्ट्रेलियाने इंडोनेशियावर ५-१ असा घरच्या मैदानावर विजय मिळवला होता, त्यामुळे जपानने बरोबरी साधली असती तरीही जपानने आपले स्थान निश्चित केले असते. परंतु कामदाने ६० हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत जपानचा विश्वचषकातील प्रवेश निश्चित केला. शेवटच्या शिट्टी वाजताच जपानचे खेळाडू मैदानावर धावले आणि घरच्या समर्थकांसोबत आनंद साजरा केला. आशियाई तिसऱ्या पात्रता फेरीत जपान अजिंक्य फॉर्ममध्ये आहे. त्यांनी आतापर्यंत पाच सामने जिंकले व एक सामना अनिर्णीत ठेवला.

### केकेआर-एलएसजी सामना कोलकात्याहून गुवाहाटीला हलवला

**कोलकाता** : इंडियन प्रीमियर लीग २०२५च्या हंगामात ६ एप्रिल रोजी होणारा कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) व लखनौ सुपर जायण्ट्स (एलएसजी ) यांच्या दरम्यानचा सामना कोलकात्याहून गुवाहाटीला हलवण्यात येणार आहे. रामनवमी उत्सव असल्यामुळे कोलकातामध्ये आयपीएल सामन्यासाठी पुरेशी सुरक्षा देऊ शकणार नाही असे कोलकाता पोलिसांनी बंगाल क्रिकेट संघटनेला (कॅब) कळविले. त्यामुळे ६ एप्रिल रोजी होणारा केकेआर व एलएसजी यांच्यातील आयपीएल सामना कोलकाताहून गुवाहाटी येथे हलवण्यात येणार आहे. राजस्थान रॉयल्सच्या दोन गृह सामन्यांशिवाय गुवाहाटी येथे एक अतिरिक्त सामना आयोजित करेल.बंगाल क्रिकेट संघटनेने प्रशासकीय मंडळासमोर हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर बीसीसीआयने स्थळ बदलाला मान्यता दिली. रामनवमीच्या निमित्ताने कोलकातामध्ये होणाऱ्या आयपीएल सामन्यांचे वेळापत्रक बदलण्याची ही पहिलीच वेळ नाही. गत वर्षी, कोलकाता पोलिसांच्या अशाच विनंतीवरून केकेआरचा राजस्थान रॉयल्स विरुद्धचा सामना १७ एप्रिल ऐवजी १६ एप्रिल रोजी खेळवण्यात आला होता. ■

# चेन्नई सुपर किंग्ज सहाव्यांदा बाजी मारणार का?

◆ **चेन्नई, २० मार्च**

पाच वेळचा विजेता असलेला चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) इंडियन प्रीमियर लीगच्या १८ व्या आवृत्तीत प्रवेश करणार आहेत आणि सहाव्यांदा आयपीएलचे विजेतेपद जिंकण्याचा प्रयत्न करणार आहे.

सीएसकेच्या संघातील प्रत्येक खेळाडूची वैयक्तिक क्षमता तसेच संघाच्या बाकावरील बसलेल्या खेळाडूंच्या ताकदीचे मूल्यांकन केले तर हे स्पष्ट होते की त्यांच्याकडे आयपीएल २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रतिभेची कमतरता नाही.

सीएसके २०२४ मध्ये दहा संघांच्या लीगमध्ये पाचव्या स्थानावर राहिले होते. तरीही, सीएसकेने या वर्षी काहीही संधी सोडली नाही, कारण आयपीएल २०२५ साठी त्यांचे अधिग्रहण रोमांचक राहिले आहे. त्यांनी मेगा लिलावात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून नूर अहमद, डेव्हॉन कॉनवे व रचिन रवींद्रला सुरक्षित केले. फ्रॅन्चायझीने ९.७५



महेंद्र सिंह धोनी व ऋतुराज गायकवाड

कोटी रुपये खर्च करून घरगुती मुलगा रविचंद्रन अश्विनला परत आणण्यात चांगली कामगिरी केली. त्यांनी कर्णधार ऋतुराज गायकवाड, रवींद्र जडेजा, मथिशा पाथिराणा, शिवम दुबे व महेंद्र सिंह धोनीला कायम ठेवले आहे.

गत काही वर्षांत त्यांच्या गाभ्याला टिकवून ठेवण्याची आणि त्याभोवती संघ उभारण्याची क्षमता ही सीएसकेच्या यशाची गुरुकिल्ली आहे. सीएसकेची सर्वात मोठी ताकद म्हणजे धोनीची यष्टींमागे उपस्थिती असेल आणि ४३ व्या वर्षी तो एका प्रकारच्या संसर्गजन्य जोशाने खेळतो जो किशोरांना लाजवेल.

गायकवाड व रचिन सलामीची शक्यता असल्यामुळे सीएसके पहिल्या सहा षटकांत सावधगिरीने खेळत राहू शकते, जेणेकरून एकाच वेळी विकेट गमावू नयेत. एक नाविन्यपूर्ण फटकेबाजी करणारा खेळाडू म्हणून ओळखला जाणारा राहुल त्रिपाठी तिसऱ्या क्रमांकावर खेळण्यास सज्ज आहेत.

सीएसके सॅम करन, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, अश्विन, विजय शंकर, दीपक हुडा, रचिन आणि जेमी ओव्हरटन यासारख्या काही सिद्ध अष्टपैलू खेळाडूंना संधी देते, त्यामुळे संघ व्यवस्थापनाला निवडण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध होतात. तथापि, डावावर नियंत्रण मिळवण्याची क्षमता असलेला मधल्या फळीतील फलंदाज नसल्यामुळे अव्वल फळी कोसळल्यास त्यांना नुकसान होऊ शकते.

चेन्नईच्या खेळपट्टीवर फिरकी गोलंदाज पुन्हा एकदा आक्रमक भूमिका बजावतील अशी अपेक्षा आहे. अश्विन व जडेजा या शानदार जोडीला अफगाण डावखुरा मनगट फिरकी गोलंदाज नूर अहमद हा एक सक्षम साथीदार मिळेल.?

◀ *(वृत्तसंस्था)*

# आयपीएलमध्ये एका सामन्यात ३ चेंडू वापरणार

◆ **मुंबई, २० मार्च**

आयपीएल २०२५ पूर्वी बीसीसीआयने आणखी काही मोठे निर्णय घेतले असून आता आयपीएलमध्ये एका सामन्यात ३ चेंडू वापरणार आहे. या संदर्भात भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने मागणी केली होती व त्याच्या मागणीला हिरवा कंदिल मिळाला आहे.

मुंबईमध्ये आयपीएल संघांच्या कर्णधारांसोबत बीसीसीआयने बैठक घेतली. या बैठकीत गोलंदाजांना फायदेशीर ठरणारे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. इंडियन प्रीमियर लीगमध्ये चेंडूवर लाळ लावण्यावरील बंदी हटवण्यात आली आहे. त्याचबरोबर एका सामन्यात तीन चेंडूंचा वापर करण्यात येणार आहे.

आयपीएल मधील सामन्यात आता एकूण ३ नवीन चेंडूंचा वापर होणार आहे. या आधी सामन्यातील २ डावांसाठी २ नवे चेंडू मिळायचे. पण आता धावांचा पाठलाग करणाऱ्या संघाला २ चेंडूसह खेळावे लागणार आहे. नवीन नियमानुसार दुसऱ्या डावासाठी २ चेंडू देण्यात येणार आहे, ज्यापैकी दुसरा चेंडू ११ व्या षटकांनंतर चेंडू वापरण्यात येईल.

हा नियम रात्रीच्या सामन्यांमध्ये दवामुळे होणारा परिणाम टाळण्याच्या उद्देशाने बनवण्यात आला आहे. या नवीन नियमामुळे दव घटकामुळे नाणेफेक जिंकणाऱ्या संघाला होणारा फायदा मिळणार नाही. ◀ *(वृत्तसंस्था)*

### चेंडू चमकवण्यासाठी लाळेच्या वापरावरील बंदी उठवली

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) गुरुवारी आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये चेंडू चमकवण्यासाठी लाळेच्या वापरावरील बंदी उठवली. मुंबईतील कर्णधारांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



लाळेची बंदी उठवण्यात आली आहे. बहुतेक कर्णधार या निर्णयाच्या बाजूने होते, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) कोरोना काळात सावधगिरीचा उपाय म्हणून चेंडू चमकवण्यासाठी लाळेचा वापर करण्याच्या जुन्या पद्धतीवर बंदी घातली होती. २०२२ मध्ये जागतिक संघटनेने ही बंदी कायमची केली. साथीच्या आजारानंतर आयपीएलनेही आयसीसीच्या खेळण्याच्या परिस्थितीत बंदी घालण्याचा समावेश केला होता, परंतु त्याची मार्गदर्शक तत्त्वे खेळाच्या प्रशासकीय मंडळाच्या कक्षेबाहेर आहेत.


गुरुवारी झालेल्या या घडामोडीसह, कोरोना या साथीच्या आजारानंतर लाळेचा वापर पुन्हा सुरू करणारी आयपीएल ही पहिली मोठी क्रिकेट स्पर्धा ठरली आहे.

# काहीतरी खास कामगिरी करायचीय् : व्यंकटेश अय्यर

◆ **कोलकाता, २० मार्च**

अभिनेता शाहरुख खान हा एका फ्रॅन्चायझी मालकापेक्षा बरेच काही आहे. तो मोठ्या भावासारखा भाव देतो. तो नेहमीच तुमच्यासाठी आहे असे वाटायला लावतो. फ्रॅन्चायझी मालकाला इतके मैत्रीपूर्ण व नम्र असण्याची गरज नाही, विशेषतः त्याच्यासारख्या व्यक्तीला, एक जागतिक सुपरस्टार. पण तो खूप साधेपणाने वागतो. त्यामुळेच मला त्याच्यासाठी काहीतरी खास कामगिरी करायची आहे, अशा भावना व्यंकटेश अय्यरने व्यक्त केल्या.

केकेआरने व्यंकटेश अय्यरला २३.७५ कोटी रुपयांत परत विकत घेतले. विशेष म्हणजे व्यंकटेशला शाहरुख खानचा अढळ पाठिंबा आहे. त्यामुळे तो आयपीएलमधील सर्वात महागड्या खेळाडूंपैकी एक ठरला. केकेआर आपल्या आयपीएल विजेतेपदाच्या बचावाची सुरुवात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्धच्या



व्यंकटेश अय्यर व शाहरूख खान

सामन्याने करणार आहे.

२०२१ मध्ये पदार्पण केल्यापासून अय्यर केकेआरचा एक महत्त्वाचा खेळाडू झाला आहे. आता तो कर्णधार अजिंक्य रहाणेचा उपकर्णधार म्हणून कर्तव्य बजावणार आहे. अर्थात तो उच्च अपेक्षांसह नेतृत्वाच्या भूमिकेत प्रवेश करतो.

आयपीएल २०२५ चा लिलाव माझ्यासाठी आयुष्य बदलून टाकणारा क्षण होता. माझ्यातील मध्यमवर्गीय खेळाडू पैशाने खूप आनंदित झालो. यासोबतच जबाबदारीही वाढली व दबाव सुद्धा.दबाव असायलाच हवा. मी २० लाख रुपयांचा खेळाडू असो किंवा २० कोटी रुपयांचा खेळाडू, माझे काम तेच असेल, असे तो म्हणाला.

ईडन गार्डन्स स्टेडियम हे प्रत्येक केकेआर खेळाडूच्या स्वप्नांना चालना देणारे आदर्श स्टेडियम आहे व व्यंकटेश अय्यरसाठी ते पवित्र मैदान आहे.

◀ *(वृत्तसंस्था)*

# राजावत, मुथुस्वामी दुसऱ्या फेरीत, सिंधू बाहेर

### स्विस ओपन बॅडमिंटन

◆ **बासेल,२० मार्च**

येथे सुरू असलेल्या स्विस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत भारताच्या प्रियांशु राजावतने स्थानिक खेळाडू टोबियास कुएन्झीवर सरळ गेममध्ये विजय मिळवला. राजावतसह एस. शंकर मुथुस्वामीनेही दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. तथापि, किरण जॉर्ज व दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.

जगात ३५ व्या क्रमांकावर असलेल्या राजावतने पहिल्या फेरीच्या सामन्यात अध्या २९ मिनिटांत कुएन्झीवर २१-१०, २१-११ असा विजय मिळवला आणि आता त्याची गाठ फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हशी पडणार आहे.



प्रियांशू राजावत

एस. शंकर मुथुस्वामी सुब्रमण्यमनेही डेन्मार्कच्या मॅग्नस जोहानेसेनला २१-५, २१-१६ असा पराभव करून पुढील फेरीत प्रवेश केला. त्याचा सामना दुसऱ्या मानांकित डेन्मार्कच्या अँडर्स अँन्टोनसेनशी होईल.

पण पुरुष एकेरीत किरण जॉर्जचे आव्हान संपुष्टात आले. त्याला पहिल्या फेरीतच डेन्मार्कच्या रासमुस गेमकेविरुद्ध २१-१८, १७-२१, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.

जुलीची सिंधूवर मात

दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती व सातव्या मानांकित पी. व्ही. सिंधूची वाईट कामगिरी सुरूच राहिली. महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत तिला डेन्मार्कच्या तळाच्या मानांकित जूली जेकोबसेनकडून १७-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

दुसऱ्या एका अखिल भारतीय महिला एकेरीच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात अनुपमा उपाध्यायने अनमोल खरबेला २१-१४, २१-१३ असे हरविले. आता अनुपमाची गाठ इंडोनेशियाच्या चौथ्या मानांकित पुत्री कुसुमा वर्दानीशी पडणार आहे.

सतीश कुमार करुणाकरण व आद्या वरियथ या जोडीने मिश्र दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. त्यांनी तानिना व्हायोलेट मम्मेरी व कोसेइला मम्मेरी या अल्जेरियन जोडीवर २१-१५, २२-२० असा विजय संपादन केला. आता भारतीय जोडी पुढील सामना चिनी तैपेईच्या कुआंग हेंग लिऊ व यू चिएह झेंग यांच्याविरुद्ध खेळेल. ◀ *(वृत्तसंस्था)*

# चॅम्पियन्स चषक विजेत्या भारतीय संघाला बीसीसीआयकडून ५८ कोटी रुपयांचे बक्षीस

◆ **नवी दिल्ली, २० मार्च**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) गुरुवारी दुबई येथे आयसीसी चॅम्पियन्स चषक जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला ५८ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारताने अंतिम सामन्यात न्यूझीलंडला ४ गड्यांनी हरवून तिसऱ्यांदा चॅम्पियन्स चषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

या आर्थिक लाभात खेळाडू, प्रशिक्षक, सहायक कर्मचारी आणि अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील पुरुष निवड



समितीचे सदस्य यांचा समावेश असेल. बीसीसीआयने आपल्या निवेदनात बक्षीसाचा तपशील दिलेला नाही.

सलग दोन आयसीसी जेतेपदे जिंकणे विशेष आहे आणि हे बक्षीस जागतिक स्तरावर भारतीय संघाच्या समर्पणाची व उत्कृष्टतेची ओळख पटवते, असे बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

दरम्यान, भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना चॅम्पियन्स चषक जिंकल्याबद्दल बीसीसीआयकडून खेळाडूंइतकीच रक्कम (३ कोटी रुपये) मिळेल, तर सहकारी कर्मचारी चमूमधील प्रत्येक सदस्याला ५० लाख रुपये मिळतील.

भारताचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांना ३० लाख रुपये मिळतील, तर इतर चार राष्ट्रीय निवडकर्त्यांना २५ लाख रुपये मिळतील. दुबईमध्ये भारतीय संघाच्या पथकाचा भाग असलेल्या बीसीसीआयच्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २५ लाख रुपये मिळतील. ◀ *(वृत्तसंस्था)*

# मुष्टियुद्धाचा लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये समावेश

### मुष्टियुद्धाला चालना

◆ **कोपेनहेगन, २० मार्च**

डेन्मार्कच्या कोपेनहेगन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) ४४ व्या सत्रात गुरुवारी मतदानानंतर एकमताने मुष्टियुद्धाचा लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकमध्ये समावेश करण्यात आला. यामुळे मुष्टियुद्धाच्या ऑलिम्पिक भविष्याबद्दल वर्षनुवर्षे असलेल्या शंका-कुशंका संपुष्टात आल्या आहेत.

गत महिन्यात आयओसीने जागतिक बॉक्सिंगला तात्पुरती मान्यता दिली. ही मान्यता लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये या खेळाच्या समावेशाच्या दिशेने एक मोठे पाऊल होते व गुरुवारी झालेल्या निर्णयामुळे या खेळाचे ऑलिम्पिक अस्तित्व कायम राहील याची खात्री झाली.

मुष्टियुद्ध परत आणण्याच्या मंजुरीबद्दल मी तुमचे आभार मानतो. आपण एका उत्तम मुष्टियुद्ध स्पर्धेची अपेक्षा करू शकतो, असे आयओसीचे अध्यक्ष थॉमस बाक म्हणाले.

२०२३ मध्ये प्रशासन आणि वित्त सुधारणा लागू करण्यात अपयशी ठरल्यामुळे आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध संघटनेची मान्यता काढून घेतल्यानंतर पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमधील मुष्टियुद्ध स्पर्धा आयओसीने आयोजित केली होती.

आयओसीने सुरुवातीला लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकमध्ये या खेळाचा समावेश केला नव्हता. राष्ट्रीय मुष्टियुद्ध महासंघांना आयबीएच्या जागी एक नवीन जागतिक मुष्टियुद्ध संस्था तयार करण्याचे आवाहन केले होते. सध्या ८० हून अधिक राष्ट्रीय मुष्टियुद्ध महासंघ सदस्य असलेल्या जागतिक मुष्टियुद्धाची स्थापना २०२३ मध्ये झाली.

२०२८च्या ऑलिम्पिकसाठी पात्रता स्पर्धा सुरू होईपर्यंत, ज्या खेळाडूंचे राष्ट्रीय महासंघ जागतिक मुष्टियुद्धाचे सदस्य होते तेच खेळाडू लॉस एंजेलिसमध्ये भाग घेऊ शकतील असे आयओसीने म्हटले आहे.

२०१९ मध्ये आयओसीने क्रेमलिनशी जवळचे संबंध असलेले रशियन उद्योगपती उमर क्रेमलेव्ह यांच्याकडून चालवले जाणारे आयबीए प्रशासन, वित्त, पंच आणि नैतिक मुद्द्यांवरून निलंबित केले.

२०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये मुष्टियुद्ध स्पर्धा आयोजित करण्यात आयबीएचा समावेश नव्हता आणि दोन वर्षांनंतर एका दुर्मिळ कृतीत त्याची मान्यता काढून घेण्यात आली. ◀ *(वृत्तसंस्था)*

# पहिल्या ३ सामन्यात रियान पराग राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करणार

◆ **नवी दिल्ली, २० मार्च**

आयपीएलच्या पहिल्या तीन सामन्यांमध्ये उदयोन्मुख स्टार रियान पराग राजस्थान रॉयल्स संघाचे नेतृत्व करणार आहे. नियमित कर्णधार संजू सॅमसन तज्ज्ञ फलंदाज व इम्पॅक्ट बदली खेळाडू म्हणून खेळणार आहे. कारण त्याला बोटाच्या शस्त्रक्रियेनंतर यष्टिरक्षण करण्याची परवानगी अद्याप मिळालेली नाही.

मुंबईत इंग्लंडविरुद्धच्या टी-२० सामन्यात जोफ्रा आर्चरच्या चेंडूमुळे सॅमसनच्या बोटाला फ्रॅक्चर झाले होते, त्यानंतर त्याला किरकोळ शस्त्रक्रिया करावी लागली.

संजू सॅमसनला फलंदाजीसाठी परवानगी देण्यात आली असली तरी, बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समधील वैद्यकीय व क्रीडा विज्ञान संघ त्याला यष्टिरक्षण सुरू करण्यापूर्वी त्याच्या



बोटांना आणखी विश्रांती देण्याची इच्छा असल्याचे समजते. म्हणूनच, २३ वर्षीय परागला विराट कोहलीनंतर आयपीएलमधील सर्वात तरुण कर्णधारांपैकी एक होण्याचा मान मिळेल. आयपीएल २०२५ हंगामाच्या पहिल्या तीन सामन्यांसाठी रियान पराग राजस्थान रॉयल्स संघाचे नेतृत्व करेल, असे आरआरने एका निवेदनात म्हटले आहे.

हा तरुण अष्टपैलू खेळाडू २३ मार्च रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या पहिल्या सामन्यात जबाबदारी स्वीकारेल, त्यानंतर २६ मार्च रोजी गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि ३० मार्च रोजी पाच वेळा विजेत्या चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध (सीएसके) घरच्या मैदानावर सामना खेळेल, असे फ्रॅन्चायझीने म्हटले आहे.

रॉयल्स संघाचा अविभाज्य भाग असलेला सॅमसन यष्टिरक्षक व क्षेत्ररक्षणासाठी परवानगी मिळेपर्यंत फलंदाजीत महत्त्वाचा वाटा उचलेल. तो पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यानंतर कर्णधार म्हणून परत येईल. आसामच्या रियान परागला त्यांच्या संघातील प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय फलंदाज यशस्वी जयस्वाल याच्यापेक्षा पुढे का निवडण्यात आले याबाबत स्पष्टीकरण देताना आरआरच्या व्यवस्थापनाने सांगितले की, रियानला कर्णधारपद देण्याचा राजस्थान रॉयल्सचा निर्णय फ्रॅन्चायझीचा त्याच्या नेतृत्वावरील विश्वास अधोरेखित करतो. ◀ *(वृत्तसंस्था)*

# जिल्हा खो-खो संघाचे सराव शिबिर सुरू

### राज्य स्पर्धेसाठी जिल्ह्याचे पुरुष, महिला किशोरी हे तीन संघ पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० मार्च-**

सोलापूर जिल्हा किशोर व महिला खो-खो संघाच्या सराव शिबिरास जुळे सोलापूर येथील वसुंधरा महाविद्यालयाच्या मैदानावर तर पुरुष संघाच्या सराव शिबिरास ह. दे. प्रशालेच्या मैदानावर सुरवात झाली.

या सराव शिबिरात निवडलेले अंतिम संघ इचलकरंजी (कोल्हापूर) येथे २३ ते २७ मार्च दरम्यान होणाऱ्या राज्य शासनाच्या भाई नेरूरकर खो-खो स्पर्धेत भाग घेणार आहेत. जिल्ह्याचे पुरुष व महिला आणि किशोरी हे तीन संघ या स्पर्धेसाठी पात्र झाले. या सराव शिबिराचे उद्घाटन स्वामी विवेकानंद



प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे यांच्या हस्ते झाले. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन सचिव ए. बी. संगवे, सहसचिव मोहन रजपूत, राजाराम शितोळे, खजिनदार श्रीरंग बनसोडे, निवड समिती सदस्य प्रथमेश हिरापुरे, अतुल जाधव, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, सदस्य अजित शिंदे, शेखलाल शेख, पुंडलिक कलखांबकर, राजशेखर जोडमोटे, आनंद जगताप, यशोदीप आठवले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीकृष्ण कोळी यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### युवकांमधील डायबेटिसचे वाढते प्रमाण चिंताजनक : डॉ. राजीव गांधी

**श्रीपूर, दि. २० मार्च-**

मनुष्याची बदलती जीवनशैली, यात फास्ट फूड , उशिरा झोपणे , शोशल मिडीयाचा अतिवापर या सर्व कारणांचा परिणाम मानवी शरिरावर होत असून यातूनच तरुण युवकां मध्ये डायबेटिसचे प्रमाण प्रचंड वाढत आहे हे फार चिंतेची बाब असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध नेत्र तज्ञ डॉ . राजीव गांधी यांनी केले. २१० व्या जागतिक स्पर्धेत ईरोपियन व्हिगोरेशिनियल सोसायटी लंडन या संस्थेचा ईमेंजिंग कॉम्पिटिशन (डोळ्यातील फोटोग्राफी)बुडापेस्ट येथे झालेल्या कार्यक्रमात प्रथम पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले होते त्या निमित्त त्यांच्या सत्कार अकलुजचे प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. एम. के. ईनामदार यांचे हस्ते कामगार संघटनेचे माजी खजिनदार विठ्ठल देशपांडे मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीपूरचे डॉ. सुधीर पोफळे, डॉ. पिसाळ, डॉ. पताळे पाटील, उद्योजक महावीर शहा, स्वप्नील नाटकळे, श्रीपाद देऊसकर, डीसीसी बॅन्केचे अभिनंदन गायकवाड, संतोष जोशी, अभय परांडकर, गणपत बसके, धनश्री देशपांडे, अंजली परांडकर, अमृता देशपांडे, सुरज देशपांडे उपस्थित होते. विठ्ठल देशपांडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी गणेश सूर्यवंशी

**अणदूर, दि.२० मार्च -**

अणदूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ग्रामपंचायत सदस्य गणेश सूर्यवंशी यांची, उपाध्यक्षपदी मारुती बागडे तर खजिनदारपदी शाहूराज कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली.यासंदर्भात नुकतीच बैठक झाली त्यामध्ये सर्व पादधिकारी एकमताने निवडण्यात आले. मिरवणूक प्रमुख श्रीकांत गायकवाड, राजेंद्र कांबळे ,दत्ता कांबळे ,राम कांबळे, प्रशांत कांबळे, सल्लागार महेश सूर्यवंशी, काकासाहेब चंदनशिवे ,प्रदीप कांबळे यांचीही एकमताने निवड करण्यात आली, यंदाचे हे १३४ वे वर्ष असून महिलांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत, या निवडीचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



### फॉरेन्सिक सायन्स विषयात करिअर करण्याची विपुल संधी उपलब्ध : डॉ. चैतन्य चव्हाण

**बार्शी, दि. २० मार्च-**

श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये 'सायन्स फॉर जस्टीस' या विषयावर एकदिवशीय कार्यशाळेचे रसायनशास्त्र विभागातर्फे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगरचे तज्ज्ञ प्रा. डॉ. चैतन्य चव्हाण आणि डॉ. चैतन्य भासखेत्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. डॉ. चैतन्य चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना फॉरेन्सिक सायन्समधील विविध शाखा आणि त्यामधील करियर संधी याबाबत मार्गदर्शन केले. गुन्हाचा तपास लवकरात लवकर होण्यासाठी देशांमध्ये फॉरेन्सिक सायन्समधील तज्ज्ञ लोकांची संख्या वाढवण्याची गरज आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच फॉरेन्सिक सायन्स प्रयोगशाळा वाढविण्याची सुद्धा आवश्यकता आहे, असे ते म्हणाले. डॉ. चैतन्य बासखेत्रे यांनी सायबर क्राईम या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यातून कसे वाचवावे? आणि विद्यार्थ्याकडून कोणताही सायबर गुन्हा होणार नाही याची दक्षता कशी घ्यावी याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये वरिष्ठ विज्ञान विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड यांनी केले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदमध्ये संशोधन सादर करुन पारितोषिक मिळवल्याबद्दल डॉ. प्रतिभा ढाले व श्रीमती शीतल ठोंगे तसेच उजळणी वर्ग यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल डॉ. प्रदीप काटे यांचा सन्मानही यानिमित्ताने करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब सोनवणे आणि डॉ. राजश्री गव्हाणे यांनी केले तर आभार डॉ. व्ही.एम. गुरमे यांनी मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. दत्तात्रय जमाले, प्रा.संजय पाटील, प्रा. रोहिणी जंगले, डॉ. उमेश बरचे यांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### शोभाराणी चवडेकर



**सोलापूर, दि. २० मार्च-**

निलगार ज्ञाती संस्था सोलापूरचे अध्यक्ष रवींद्र राम कृष्ण चवडेकर यांची पत्नी शोभाराणी रवींद्र चवडेकर (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुली एक मुलगा जावई व नातवंडे असा परिवार आहे. आज शुक्रवारी सकाळी ९ वाजता त्यांच्या राहत्या घरातून अंत्ययात्रा निघणार आहे.

### निर्मला पागे



**सोलापूर, दि. २० मार्च-**

उत्तर सदर बाजार येथील पत्रकार नगरच्या रहिवासी निर्मला रामकृष्ण पागे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. नीता अविनाश कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवाचे शासकीय रुग्णालयात देहदान करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# थकीत कर वसुलीसाठी जेऊर ग्रामपंचायतीचा नविन फंडा

## विविध बक्षिसांमुळे भरला जातोय कर; आठ दिवसात पाच लाखाची झाली वसुली

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.२० मार्च**

जेऊर (ता. अक्कलकोट) ग्रामपंचायतीने थकीत कर वसुलीसाठी नविन फंडा वापरत विविध बक्षिसांचे आमिष दाखवल्याने चक्क आठ दिवसात पाच लाख रूपयांची वसुली झाल्याची माहिती उपसरपंच काशिराया काका पाटील यांनी दिली.



जिल्ह्यात सर्वत्र ग्रामपंचायतीची घरपट्टी थकीत आहे. या थकीत घरपट्टीधारकांकडून कर वसूल करण्यासाठी ग्रामपंचायतीला कसरत करावी लागते. प्रसंगी न्यायालयाची नोटीस पाठवूनही कर वसूल होत नसल्याचे लक्षात येताच जेऊर ग्रामपंचायतीने थकीत घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीसाठी बक्षीस योजना राबवली आहे. या बक्षीस योजनेत प्रत्येकाला हमखास बक्षीस ठेवण्यात आले आहे.

यात कमीत कमी कर भरणाऱ्यालाही बक्षीस देण्यात येत असल्याने उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सदरील बक्षीस योजना १ मार्च ते ३० एप्रिलपर्यंत असून, यात थकबाकीदारांनी लवकरात लवकर कर भरून बक्षीस घेऊन जाण्याचे आवाहन जेऊर ग्रामपंचायतचे सरपंच व ग्रामसेवक यांनी केले आहे.

### कर वसुलीवरच सुविधा शक्य

कर वेळेवर भरला तरच गावचा कारभार व्यवस्थित चालू शकतो. कर थकीत राहिल्यास विकास खुंटतो. लाईट बिल, पाणी पट्टी, आरोग्य सुविधा, गटारी साफ करणे, आरोग्य फवारणी आदी कामे ग्रामपंचायतीच्या वसुलीवर अवलंबून असतात. त्यामुळे कर वेळेवर भरत गेल्यावर सुविधा ही वेळेवर मिळतात.

**- सुरेश कोळी, ग्रामविकास अधिकारी**

### गोड बोलून वसुली मोहीम राबवावी लागते

गावात घरपट्टी, पाणीपट्टी वसूल करताना खूप त्रास होतो. स्थानिक पातळीवर वसुलीसाठी कठोर पावले उचलू शकत नाही. गोड बोलून वसुली मोहीम राबवावी लागते. कर वसुली झाली तरच ग्रामस्थांना सुविधा देता येतात.

**- काशिराया पाटील, उपसरपंच, जेऊर**

# कट्टर हिंदुत्व अन विवेकाचा अनोखा संगम म्हणजे अभयसिंह

### ह.भ.प.चैतन्यमहाराज देगलुरकर यांचे प्रतिपादन

### एकषष्ठीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० मार्च -**

अभयसिंह यांच्याकडे कट्टर हिंदुत्वाबरोबरच विवेक यांचा अनोखा संगम आहे. त्यांचा व्यासंग व अभ्यास मोठा असल्याने ते हिंदु समाजासाठी अधिक सक्षमपणे काम करु शकले असे प्रतिपादन निरुपणकार ह.भ.प.चैतन्यमहाराज देगलुकर यांनी केले.



हिंदुसभेचे नेते अभयसिंह इचगावकर यांच्या एकसष्ठीनिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते. श्री. इचगावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्र्यंबकेश्वरचे महामंडलेश्वर देवबाप्पा तथा फरशी महाराज, जेष्ठ गोरक्षक मिलींद एकबोटे, हिंदु एकता आंदोलनाचे हिरामणअप्पा गवळी, हृदयरोगतज्ञ डॉ.गुरुनाथ परळे, मराठा महासंघाचे दास शेळके, प्राचार्य आशाताई शिंदे, प्रदेश हिंदुमहासभेचे अध्यक्ष अनिलराव पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

महामंडलेश्वर फरशीमहाराज यांनी आशिर्वादपर शुभेच्छा दिल्या. या वेळी अनेक संस्था व व्यक्तींनी गर्दी केली होती. महाराष्ट्र प्रदेश हिंदुमहासभेच्या वतीने अध्यक्ष अनिल पवार, तिरुपती रेड्डी यांनी तलवार भेट देत अभयसिंह यांचा गौरव केला. नाथषष्ठीनिमित्त अभयसिंह यांची सावरकर चरित्र ग्रंथाने ग्रंथतुला करण्यात आली. श्रध्दा कुलकर्णी यांनी संपादित केलेल्या गौरव स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी रश्मी कुलकर्णी-गंधे यांनी सावरकरांचे अनादी मी अवध्य मी अनंत मी भला हे गीत सादर केले. ह.भ.प. शंकर महारज बडवे यांनी प्रास्ताविक केले. महेश खिस्ते यांनी स्वागत केले. मंदार कुलकर्णी यांनी आभार मानले. विद्यावाचस्पती मैत्रैयी केसकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अभयसिंह प्रेमी मंडळी व पंढरपूरातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विवेक बेणारे, विकास मोरे, प्रशांत खंडागळे, गणेश कुलकर्णी, गणेश उंडाळे, सतिश बेणारे, रसिका कुलकर्णी हवालदार, डॉ.अमृता कुलकर्णी, मधुरा कुलकर्णी, ऋषिका कुलकर्णी, डॉ.दुर्गेश कुलकर्णी, ॲड.चैतन्य कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

## पंढरपूरात मंगळवारी आरोग्य शिबिराचे आयोजन

**पंढरपूर,दि.२० मार्च -**

येथील हृदयस्पंदन हार्ट केयर हॉस्पिटलच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त सर्वसामान्य रुग्णांना अत्यल्प दरात उत्तम दर्जाची आरोग्य सुविधा निर्माण व्हावी या हेतूने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबीराचे उद्घाटन युटोपियन शुगर चेअरमन उमेश परिचारक यांच्या हस्ते व डॉ. वि.अ. वोहरा यांच्या अध्यक्षतेखाली हृदयस्पंदन हार्ट केयर, राहीरकर बिल्डिंग, सावरकर चौक येथे होणार आहे. शिबीरात हृदयाच्या सर्व टेस्ट अत्यल्प दरात केल्या जाणार आहेत. रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ. बसवराज सुतार यानी केले आहे. शिबीरासाठी ७७७७९८३०४३ या नंबरवर संपर्क साधावा.

# महाबँकेच्या आडमुठे धोरणाविरोधात बेमुदत संपाचा इशारा

### सर्व संवर्गात नोकर भरतीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि मार्च**

मागील तीन ते चार वर्षापासून सातत्याने निवेदने, धरणे आंदोलने, निदर्शने तसेच अनेकवेळा संप करुनही बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये सर्व संवर्गात नोकर भरती होत नाही. बँकचे वरिष्ठ व्यवस्थापन ग्राहकांचे होणारे हाल, अपुऱ्या कर्मचारी, अधिकारी वर्गामुळे त्यांच्या वरील तणाव याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे या पुढील काळात संघटनेस बेमुदत संप सुद्धा करावा लागला तर त्यास जबाबदार बँकेचे व्यवस्थापन जबाबदार असेल, असा इशारा महाबँक कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी दिला.



आज बार्शी शहरात दोन्ही शाखांतील तसेच आसपासच्या शाखांतील कर्मचारी निदर्शने करण्यासाठी शिवाजीनगर शाखेसमोर जमले होते. त्यावेळी ते बोलत होते.

ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र फेडरेशन या ए आय बी ई ए शी संलग्न असलेल्या संघटनेने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये नोकर भरती या प्रमुख मागणी साठी दि. २० मार्च रोजी संपाची हाक दिली होती. व्यवस्थापनाचे विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी कॉ. बळी बोकेफोडे, संजय ढाणके, वर्षा गवळी, विशाल तांबडे, शुभम मोरे, जयेश सोनकुसरे, गौतम गव्हाणे, पुरंदरे, औरंगाबाद युनिटच्या जॉईंट सेक्रेटरी कॉ. सरिता कुलकर्णी उपस्थित होते.

## सोलापुरात शिवसेना उबाठा युवासेनेला खिंडार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च,**

शिवसेनेच्या युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य सुजित खुर्द यांच्या माध्यमातून पंढरपूर, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर येथील ठाकरे सेनेच्या युवासेनेच्या पंढरपूर तालुकाप्रमुखांसह १५ जणांनी शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश केला.

सोलापुरातील युवा विजय महाराष्ट्र दौऱ्यांतर्गत रंगभवन येथील युवासेनेच्या मेळाव्यात हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेच्या युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर, पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक वरिंद्र मंडलीक, कार्यकारणी सदस्य शिवाजी जाधव, प्रियांका परांडे, सोलापूरचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, ऋतुराज सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य सुजित खुर्द यांनी आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये युवासेनेसाठी जास्तीत जास्त जागा देण्याबाबत विचार करावा, अशी मागणी प्रा. शिवाजी सावंत यांच्याकडे केली.

# दशक्रियेसाठी गणपती घाट परिसर सकाळी तीन तास सुरू ठेवा

### नागरिकांसह पुरोहितांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.२० मार्च -**

सोलापूरात बर्डफ्लू सदृश आजाराच्या फैलावावर प्रतिबंध करण्याच्या हेतूने गेल्या रविवारपासून प्रतिबंधित म्हणून घोषीत केलेला गणपती घाट परिसर दशक्रिया विधीसाठी सकाळी दोन तास खुला करावा अशी मागणी नागरिकांसह पुरोहितांतून होत आहे.

शहरातील गणपती घाटांसह छत्रपती संभाजी तलाव परिसर खबरदारीचा उपाय म्हणून प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे. गणपती घाटावर गेली अनेक वर्षांपासून दशक्रिया विधी केला जातो, परंतु गेल्या आठवड्यापासून हे सगळे विधी स्मशानभूमीत करण्यात येत आहेत. तेथे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे निदान सकाळी ७ ते १० या वेळेपुरता हा परिसर लोकभावनेचा विचार करून पुन्हा सुरू करावा अशी मागणी वे. मू. योगेश खेडकर यांनी केली आहे.

बर्ड फ्लू सदृश बाधित परिसरात शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नाही, असे निदर्शनास आले आहे. येणा-या काही दिवसांत दशक्रिया विधी सुरू झाल्यास खबरदारीचा उपाय म्हणून मर्यादित लोकांच्या संख्येत, मास्कचा वापर, शासकीय नियमांचे पालन करून विधी केले जातील अशी ग्वाही वे. मू. योगेश खेडकर यांनी दिली.

## ॲड. यादव यांना समाजरत्न पुरस्कार

**पंढरपूर, दि. २० मार्च -**

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ॲड. बादल यादव यांना ब्ल्यू स्टार सामाजिक व बहुउद्देशीय संस्था, पंढरपूर यांच्यातर्फे 'राज्यस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे. विधी क्षेत्रात सामान्य नागरिक तसेच रुग्णांना मदत व सहकार्य करीत असलेल्या ॲड. बादल यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात येत आहे. येत्या २२ तारखेला पंढरपुरात होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल पंढरपूर तसेच सोलापूर जिल्ह्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



# आ. सुभाष देशमुख यांची उद्योगमत्र्यांसह बैठक

### मंद्रुप एमआयडीसी पुनर्स्थापनेबाबत सकारात्मक चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.२० मार्च -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उद्योग विभागाच्या संलग्नित प्रलंबित विषयांसंदर्भात आ. सुभाष देशमुख यांच्या पुढाकाराने उद्योग मंत्री कार्यालयात बैठक पार पडली. यामध्ये मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) एमआयडीसीची पुनर्स्थापना करण्याबाबत अधिकारी आणि शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली.

आ. देशमुख हे सहकारमंत्री असताना मंद्रुप एमआयडीसी मंजूर करून घेतली होती. मात्र अनेकांनी पाचपट दर देण्याची मागणी केल्याने भूसंपादन रखडले तरीही आ. देशमुख यांचे प्रयत्न सुरूच आहेत. गुरूवारी उद्योग मंत्री कार्यालयात बैठक पार पडली. यात जमिनीचे दर जाहीर करण्याची मागणी केली. यावर अधिकाऱ्यानी जमिनीचे व्हेरीफेकीशन झाल्यानंतर दर जाहीर करू असे सांगितले. याशिवाय होटगी येथे लॉजिस्टिक पार्क करणे, अक्कलकोट आणि चिंचोळी एमआयडीसी येथील सोयीबाबतही चर्चा झाली. यावेळी सहा मुख्य कार्यकारी अधिकारी विजय राठोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवाजी पाटील आदी उपस्थित होते.



### हत्तरसंग कुडल पुस्तक गाव करण्याचा मानस

हत्तरसंग कुडल हे गाव पुस्तक गाव म्हणून करण्याचा आ. देशमुख यांचा मानस आहे. त्यासाठी त्यांनी मराठी भाषा विभागात बैठक घेतली. यावेळी आ. देशमुख यांनी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यालाही सकारत्मक प्रतिसाद मिळाला.

# अक्कलकोटमध्ये रविवारी धर्मसभेचे आयोजन

### रंभापुरी जगद्गुरु, डॉ. वीरसोमेश्वर शिवाचार्य यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२० मार्च**

माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महाराज शिवाचार्य यांच्या अक्कलकोट जेऊर रोड वरील संस्थान हिरेमठ शिवगिरी समर्थ नगर येथे २३ मार्च रोजी श्रीमद रंभापुरी वीरसिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ जगदुरु प्रसन्नरेणुक डॉ. वीरसोमेश्वर राजदेशीकेंद्र शिवाचार्य यांची धर्मसभा, दर्शन सोहळा, पुस्तक प्रकाशन आदींसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची




माहिती शिवाचार्य रत्न श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी संस्थान हिरेमठ गौडगाव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यानिमित्त सायंकाळी साडेपाच वाजता श्रीमद रंभापुरी वीरसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ जगदुरु प्रसन्नरेणुक डॉ. वीरसोमेश्वर राजदेशीकेंद्र शिवाचार्य यांचे सुवासिनींच्या १०८ कुंभ कळसाने स्वागत करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता जगद्गुरूंच्या उपस्थितीत धर्मसभा होईल. या कार्यक्रमांचे नेतृत्व शिवाचार्यरत्न डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी करतील. यावेळी नाविदगी मठाचे श्री.ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य स्वामीजी हिरेमठ यांची उपस्थिती असेल. या कार्यक्रमास ष. ब्र.श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी हिरेमठ, अभिनव चन्नमल्ल शिवाचार्य स्वामीजी तेरीनमठ,जयशांतलिंगाराध्य स्वामीजी हिरेमठ, शिवाचार्य स्वामीजी सिद्धेश्वर हिरेमठ, स्वामीजी अभिनव शिवाचार्य शांतवीर हिरेमठ, शिवाचार्य स्वामीजी म.नि. प्र. शिवानंद विरक्त मठ करजगी, शिवलिंग स्वामीजी, म.नि.प्र. बसवलिंगस्वामीजी, अक्कलकोट, डॉ. शांतलींग स्वामीजी, प्रभू प्रशांत स्वामीजी, धुळी महाराज शिरवळ आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याशिवाय या धर्मसभेस आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासह माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार दत्तात्रय पाटील, राजशेखर शिवदारे, डॉ. मिलिंद थोबडे, अरुण पाटील, लक्ष्मीकांत पाटील, नितीन गुत्तेदार, महेश हिंडोळे, शिवानंद पाटील, संजय देशमुख, महादेव कोगनुरे, मल्लिकार्जुन पाटील, मल्लिनाथ स्वामी, दिलीप सिद्धे, आनंद तानवडे, ईश्वर झुंजा, एस.बी. पाटील आदींची उपस्थिती राहणार आहे. या धर्मसभेमध्ये डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी लिखित सत्यम शिवम सुंदरम या लेखाच्या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमासाठी वीरशैव महिला मंडळ, ज. रेणुकाचार्य अक्कनबळग, सखी मंच आणि निसर्ग फाउंडेशनचे विशेष सहकार्य मिळत आहे. यावेळी उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांनी पत्रकार परिषदेत केले. पत्रकार परिषदेस डॉ. अनिल मंगरूळे, योगीराज हिरेमठ, गिरीश पट्टद, शिवशंकर चनशेट्टी, आनंद खजुरगीकर, मोनेश्वर नरेगल, ईश्वर माशाळकर, एम.बी. पाटील, चंद्रकांत स्वामी, लक्ष्मण समाणे आदी उपस्थित होते.

## सक्षमीकरण कामातील पुरुषांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मार्च,**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण प्रकल्प अंतर्गत महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार घेणाऱ्या पुरूषांचा सत्कार कार्यक्रम आज मळसिद्ध देवालय येथे दुपारी तीन वाजता होणार आहे. यासाठी मंद्रुपचे तहसीलदार सुजित नरहरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तरी बचत गटातील महिलांनी उपस्थित राहण्याचे आवाहन निसर्ग लोक संचलित साधन केंद्राच्या व्यवस्थापिका रेखा कदम यांनी केले आहे.

## शहरातील रंगोत्सव



सोलापूर : मनोरमा रेसिडेन्सी माशाळ वस्ती परिसरातील लहान मुलांनी इको फ्रेंडली रंगपंचमी साजरी केली. यावेळी धैर्यशील पाटील, आरोही पाटील, ऐश्वर्या हिप्परगे, कुणाल जाधव, गुरु हिप्परगे, कुणाल चाबुकस्वार.



सोलापूर : चौपाड येथील दर्शना हाईटसमधील महिला रंगोत्सवाचा आनंद घेताना.



सोलापूर : रंगपंचमीदिवशी रंग खेळत अनोख्या पद्धतीने पोज देताना मल्लिनाथ माई व अप्पा बोराडे

# शंभर वर्षांपूर्वीचा 'तो' रेल्वेपूल होणार जमीनदोस्त

**राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने गोयल इन्फ्रा कंपनीला दिला ३५ कोटींचा कार्यारंभ आदेश**

**उन्हाळा आणि पावसाळा लक्षात घेता लवकरच रेल्वे पुलाच्या आराखड्यास मिळणार अंतिम मंजुरी**




**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

सोलापूर शहरातील भैय्या चौक ते दमानी नगर जोडणारा ब्रिटिश कालीन शंभर वर्षांपूर्वीचा पूल पाडून नवा बांधण्यात येणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या कामासाठी दिल्ली येथील गोयल इन्फ्रा कंपनीला ३५ कोटींचा मक्ता दिला आहे. गेल्या दोन महिन्यांपूर्वी सदरच्या कामाचा कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर ) देण्यात आला होता. मात्र मध्य रेल्वे विभागाकडून पूल पाडण्याच्या आराखड्याला मंजुरी मिळाली नव्हती. त्यामुळे पाडकाम सुरू झाले नाही. मात्र गेल्या काही दिवसांपासून या पाडकामाबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुढाकार घेतला आहे. मध्य रेल्वे आणि महापालिका प्रशासनासोबत वारंवार बैठकांचे सत्र सुरू केले आहे.

आगामी उन्हाळी हंगाम तसेच त्यानंतर येणारा पावसाळा लक्षात घेता कामकाज लवकरात लवकर सुरू करण्याचा सूचना यावेळी बैठकीत मांडण्यात आल्या होत्या. या सूचनांवर लवकरच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा अंतिम आराखडा रेल्वे तसेच महापालिका प्रशासनाने मागवला असून, या आराखड्यानुसार कामकाज केले जाणार आहे. पूल पाडण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सहा महिन्यांपूर्वी रेल्वेच्या विभागीय कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला होता. परंतु तेव्हा त्याला रेल्वे विभागाकडून ग्रीन सिग्नल मिळाला नव्हता. त्यामुळे पुलाचे पाडकाम रखडलेले होते. आता रेल्वे प्रशासनाने या आराखड्यास अंतिम मंजुरी दिल्यानंतर तातडीने याचे काम सुरू होईल.

* मध्य रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग आणि महापालिकेच्या सहमतीने लवकरच प्रत्यक्षपणे आराखड्यावर कामकाज होणार सुरू
* दिल्ली येथील गोयल इन्फ्रा कंपनीला दोन वर्षांसाठी कालावधीसाठी दिला ३५ कोटींचा मक्ता
* उन्हाळ्यातील वाढती रेल्वे प्रवासी संख्या लक्षात घेता रेल्वे करणार पर्यायी मार्गाची व्यवस्था
* रेल्वेसह महापालिका प्रशासनासोबत बैठकांचे सत्र सुरू रेल्वे आणि महापालिका प्रशासन सकारात्मक
* रस्ते वाहतुकीसाठी महापालिका प्रशासन पर्यायी मार्ग उपलब्ध करणार

### रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर कामास सुरुवात

दमाणीनगर रेल्वे पुलाचे काम तत्काळ सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तो पूल पाडण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर लगेच कामास सुरुवात केली जाईल. याबाबत लातूरमध्ये झालेल्या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. सध्याचा जुना पूल पाडून पावसाळ्यापूर्वीच नवा पूल उभारणीचे फाउंडेशन तयार करण्याचा प्रयत्न आहे. तसे नियोजन केले आहे. यासाठी गोयल इन्फ्रा कंपनीला मक्ता दिला आहे. मक्ता देऊन दोन महिने झाले आहेत. यासंबंधी महापालिका प्रशासन आणि रेल्वे प्रशासन यांच्यात समन्वय साधला जात आहे. प्रशासनाच्या समन्वयानंतर कामकाजात सुरुवात होईल. रेल्वे आणि महापालिका प्रशासन देखील या कार्यासाठी सकारात्मक आहे.

**- राकेश जवादे, प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण**

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २० मार्च-**

भरधाव कारने दुचाकी चालकाला धडक दिली. यामध्ये दुचाकी चालक गंभीर जखमी झाला. ही घटना रविवार मुळे हॉस्पिटल येथील कॉर्नर जवळ घडली. याप्रकरणी राम मल्लेश करगुळे (वय-३४, रा. रेल्वे लाईन,कोनापुरे चाळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून गुरूप्पा बिराजदार (रा. कुंभारी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी राम करगुळे हे मोटरसायकल (क्रमांक एम एच १२ ६९५४) वरून कामासाठी जात होते. यावेळी आंबेडकर चौकाकडून येणारी ग्रे कलरची ईरटीका गाडी (क्रमांक एम एच १३ ई सी ११०८) यातील चालक गुरुप्पा बिराजदार यांनी भरधाव वेगाने चालवून धडक दिली. यात फिर्यादी राम करगुळे यांना गंभीर जखमी करून उपचारास घेऊन न जाता पळून गेला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग, एकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. २० मार्च-**

मार्केटमध्ये गेलेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी दुचाकी स्वाराविरुद्ध पुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार बुधवारी रात्री नऊ वाजता घडला. याप्रकरणी पिडीतेच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून जुबेर मौलासाब सगरी ( वय ३२, रा. सोलापूर) विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील पीडिता ही बुधवारी रात्री तिच्या नातेवाईकांसोबत मार्केटमध्ये फळे आणण्यासाठी गेली होती. त्यावेळी पाठीमागून आलेल्या जुबेर याने अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. याप्रकरणी पोलीस तपास करत आहेत.

## मोहन निंबाळकरांनी घेतला बाजार समितीच्या प्रशासकाचा पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक रखडल्याने प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. प्रशासक मोहन निंबाळकर यांच्या विरोधात तक्रार केल्याने त्यांची उचलबांगडी करण्यात आली होती. नाट्यमय घडामोडी होऊन ते पुन्हा १२ दिवसांतच प्रशासकाच्या खुर्चीवर ते गुरुवारी विराजमान झाले आणि पदभार घेतला.



प्रशासन मोहन निंबाळकर यांनी पदभार घेताच तात्काळ निवडणूक कार्यक्रमही जाहीर झाला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गट ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष बसवराज बगले यांनी प्रशासक मोहन निंबाळकर यांच्या विरोधात तक्रार केली होती. हा विषय त्यांनी लावून धरला होता. अनियमित व बेकायदेशीर कामांचा उल्लेख तक्रारीत केली होती. याची दखल घेऊन त्यांची उचलबांगडी करण्यात आली होती. त्यांच्या जागी बागल यांची नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान नाट्यमय घडामोडी होऊन एका विद्यमान आमदाराच्या शिफारस पत्राने पुन्हा त्यांनी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक पद पटकविण्यात यश मिळविले. त्यानंतर तात्काळ त्यांनी पदभार घेऊन कामकाजालाही सुरुवात केली.

## त्वरित नोकर भरती करा अन्यथा आंदोलन तीव्र करणार

**महाबँक कर्मचारी नेते कुलकर्णी यांचा इशारा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

कर्मचारी भरती करण्याकरिता बँकेचे प्रशासन नेहमीच दुर्लक्ष करत आले आहेत. संघटनेच्या माध्यमातून आम्ही वारंवार धरणे आंदोलन केले, निवेदनं दिली अन् निदर्शनेही केली. तरी सुद्धा बँक ऑफ महाराष्ट्राचे धीम्म प्रशासन नोकर भरती करत नाही. भविष्यामध्ये जर का बँक प्रशासनाने त्वरित नोकर भरतीचा निर्णय घेतला नाही तर यापेक्षाही तीव्र आंदोलने करण्याचा इशारा महाबँक कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय नेते कॉ .धनंजय कुलकर्णी यांनी दिला आहे.

जुळे सोलापूर येथील बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखेसमोर १०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना कॉम्रेड कुलकर्णी हे बोलत होते. हातामध्ये आपल्या मागण्यांचे फलक घेऊन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या या संपामुळे बँक ऑफ महाराष्ट्राच्या जिल्ह्यातील सर्व ५२ शाखांचे कामकाज ठप्प झाले होते.

यावेळी इतर बँकेतील कर्मचारी संघटनांनी प्रत्यक्ष येऊन या संपास पाठिंबा जाहीर केला. याचबरोबर राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हा समन्वयक कॉ अशोक इंदापुरे, युनायटेड फॉर्म बँक युनियनचे कन्व्हेनर कॉ. सुहास माडेकर, महाबँक सेवा निवृत्ती संघटनेचे कॉ. प्रसाद आतनुरकर, ग्रामीण बँक कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी कॉम्रेड कुसगल, पंजाब नॅशनल बँकेचे निवृत्त कर्मचारी कॉ. वीरभद्र माळगे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

### बँक नफ्यात; मग ग्राहकांना निकृष्ट सेवा का?

बँक ऑफ महाराष्ट्राच्या प्रत्येक शाखेमध्ये कर्मचारी अधिकारी यांची संख्या अत्यल्प आहे. कर्मचारी नसल्यामुळे ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देता येत नाही; कामास उशीर होतो त्यामुळे प्रत्येक वेळेला कर्मचाऱ्यांना ग्राहकांची नाराजी ओढवून घ्यावी लागते. ग्राहकांना अनेक वेळ ताटकळत रांगेत उभारावे लागते, एटीएम सारखी बंद पडतात; बँक गेली अनेक वर्षे प्रचंड नफा कमावून उत्कृष्ट कामगिरी करीत आहे, मग या नफ्याच्या बदल्यात ज्या ग्राहकांच्या जीवावर हा नफा कमावला जातो, त्या ग्राहकांना निकृष्ट सेवा का दिली जाते.?

**सुनील खैरे, ग्राहक**

## अखेर सोलापूर बाजार समितीची लागली निवडणूक

**मंगळवारपासून प्रक्रिया होणार सुरु**

**२७ एप्रिलला मतदान, २८ रोजी मतमोजणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

विविध कारणांमुळे लांबत चाललेल्या सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर झाली असून मंगळवारी २५ मार्चपासून ही प्रक्रिया सुरु होणार आहे. २७ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार असून,



मतमोजणी २८ एप्रिल रोजी होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी जाहीर केले आहे. बाजार समितीच्या निवडणुकीसाठी विविध टप्पे ठरविण्यात आले आहेत. मंगळवारी २५ मार्चपासून नामनिर्देशन पत्रांची विक्री, सादर करण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. नामनिर्देशन पत्र निवडणूक कार्यालयात उपलब्ध असणार आहेत. २५ ते २८ मार्च या कालावधीत नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करण्यात येणार अहे. १ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून नामनिर्देशन पत्रांची छाननी होणार आहे. २ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वा. निवडणूक कार्यालय व बाजार समितीच्या नोटीस बोर्डावर वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. २ ते १६ एप्रिल या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येणार आहे. १२ एप्रिल रोजी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. २४ एप्रिलला सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. २८ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

### मतदानाचे स्थळ नंतर जाहीर होणार

अनेक कारणांमुळे सतत लांबणीवर पडत असलेल्या बाजार समितीची निवडणूक लागल्याने इच्छुकांच्या रणनितीला वेग आला आहे. मतदानाचा सर्व कार्यक्रम जाहीर झाला असला तरी मतदानाचे ठिकाण अद्याप जाहीर करण्यात आले नाही. निवडणूक कार्यक्रमामध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदानाचे स्थळ नंतर जाहीर करण्यात येईल, असे सांगितले आहे.

## जिल्ह्यातील नगरपालिकांकडून मालमत्ता कर ४० टक्के तर पाणीपट्टीची ३३ टक्के वसुली

**प्रशासनाधिकारी विणा पवार यांची माहिती**

**नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

जिल्ह्यातील १७ नगरपालिकांकडून चालू आर्थिक वर्षात थकीत आणि चालू बाकीतून ४० टक्के मालमत्ता कर आणि पाणीपट्टी ३३ टक्केच वसुली झाली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांनी आपला मालमत्ता कर अन् पाणीपट्टी भरून पालिकांना सहकार्य करावे, असे आवाहन नगरपालिका प्रशासनाधिकारी विणा पवार यांनी केले आहे.

मालमत्ता करामध्ये जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांची थकीत मालमत्ता कराची मागणी ३७ कोटी २७ लाखाची होती. चालू मागणी ३६ कोटी ८७ लाख होती. तर एकूण मागणी ७४ कोटी १४ लाख इतकी होती. तर थकीत वसुली ९ कोटी ४५ लाख, चालू वसुली २० कोटी २१ लाख तर एकूण वसुली २९ कोटी ६६ लाख इतकी होती. यातील ४०.०१ टक्के वसुली झाली आहे. तर शासकीय कार्यालयाकडील




आजअखेर थकबाकी ४७३ कोटी इतकी होती. या कार्यालयाकडील एकूण वसुली झाल्यास ३४ कोटी ३९ लाख इतकी वसुली होवून ४६.३९ टक्के इतकी वसुली होईल.

जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांच्या पाणीपट्टीमध्ये थकीत मागणी २९ कोटी ७१ लाख इतकी होती. चालू मागणी १६ कोटी ९९ लाख तर एकूण मागणी ४६ कोटी ७० लाख इतकी होती. तर थकीत वसुली ५ कोटी ६८ लाख, चालू वसुली ९ कोटी ६३ लाख अशी एकूण वसुली १५ कोटी ३२ लाखाची आहे. तर जिल्ह्यातून ३२.८१ टक्के इतकीच वसुली झाली आहे. तर आजअखेर शासकीय कार्यालयाकडील थकबाकी ५६.९२ कोटी, शासकीय कार्यालयांची थकबाकी वसुल झाल्यास १५ कोटी ८९ लाखाची वसुली होवून ३४.०२ टक्के वसुली होईल.

### अनगर अन् कुर्डुवाडीची सर्वाधिक वसुली

जिल्ह्यातील अनगर येथील मालमत्ता कराची वसुली सर्वाधिक असून, या वसुलीची टक्केवारी ६४.१७ टक्के आहे. तर कुर्डुवाडी येथील ५७.१६ टक्के वसुली करून त्या प्रशासनाने जिल्ह्यात द्वितीय स्थान मिळविले आहे. तर पाणीपट्टीच्या वसुलीमध्येही अनगरच्या प्रशासनाने चांगली कामगिरी करून ६१.२९ टक्के इतकी वसुली केली आहे. दरम्यान, ज्या नगरपालिकांची वसुली चांगली आहे; त्यांना १५ व्या वित्त आयोगातून केंद्रीय स्तरावरील प्रोत्साहन निधी प्राप्त होतो. यामुळे सर्वच नगरपालिका प्रशासनाने मालमत्ता कर आणि पाणीपट्टी वसुलीवर भर देवून आपली नगरपालिका वसुलीमध्ये जिल्ह्यात कशी अव्वल राहील, याबाबत प्रयत्न करावा.

**- विणा पवार, नगरपालिका प्रशासनाधिकारी, सोलापूर**

## कांद्याचा वांदा... उत्पादकांच्या डोळ्यात पाणी

**खर्चही भागेना; ऐन उन्हाच्या झळांमध्ये शेतकरी मेटाकुटीला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

कमी पर्जन्यामान, घटलेली पाण्याची पातळी, पाण्याचा काटकसरीने वापर करुन पिकविलेला कांदा, वाढती मजुरी, खत, बी-बियाण्याला बसलेली महागाईची झळ अशात उन्हाळी कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांद्याने वांदा केला आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले.

सोलापूरच्या बाजार समितीमध्ये गत आडवड्यापासून कांद्याच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण होत आहे. सरासरी एक ते दीड हजार रुपयांपर्यंत दर खाली आल्याने खर्चही भागेना झाला आहे. आर्थिक ताळमेळ बसत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी मेटाकुटीला आला आहे. सोलापूर बाजार समितीमध्ये अलीकडे दररोज ५०० ते ८०० कांद्याची आवक असते. ही आवक हंगामात



अधिक असते. एरव्ही कमी असते. यंदा मात्र दिवाळीनंतर कांद्याची आवक फार मोठ्या प्रमाणात झाली नाही. मार्चमध्ये अचानक कांद्याची आवक वाढली आणि त्याचा दरावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. उन्हाळी कांद्यामुळे तीन हजार रुपयांनी विकणारा कांदा निम्म्यावर येत प्रतिक्विंटल १ हजार ५०० रुपयांवर आला. उन्हाळी कांद्याला चांगला दर मिळत असल्याच्या आशेने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन घेतले. आता पडलेल्या दरामुळे शेतकऱ्यांची डोकदुखी वाढली आहे.

### खराब होण्याचे प्रमाण अधिक

सोलापुरात कांदा चाळ नसल्याने बाजार समिती किंवा इतर ठिकाणी साठा करुन ठेवलेला कांदा सडून खराब होण्याची शक्यता फारच अधिक आहे. यामुळेही साठवणूक करु पाहणारे शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसानच होत आहे. यासाठी सोलापुरात कांदा चाळ निर्माण करण्याची अधिक गरज आहे.



आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन वाणांमुळे कांद्याचे बारमाही उत्पादन घेता येते. कमी कलावधीत अधिक उत्पन्न देणारे पीक म्हणून कांद्याकडे पाहिले जाते. यामुळे आवक अचानक वाढते. दर कोसळून उत्पादकांना फटका बसू शकतो. उत्पादकांनी उत्पादनात सातत्य ठेवल्यास त्यांना कांद्यामधून चांगले उत्पन्न मिळू शकते.

**-गजानन होनराव, कांदा व्यापारी,**
**श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राजमाता जिजाऊ रथयात्रेचे मंगळवारी सोलापुरात आगमन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

मराठा जोडो अभियानांतर्गत निघालेल्या जिजाऊ रथयात्रेचे दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता सोलापुरात आगमन होत आहे.



मराठा सेवा संघ आयोजित ही रथयात्रा दि. १८ मार्च रोजी भोसले गढी वेरुळ येथून निघालेली आहे. या यात्रेचा १ मे रोजी पुण्यात समारोप होणार आहे. सोलापुरात छत्रपती संभाजी महाराज चौक येथे रथयात्रेचे स्वागत होणार असून ही यात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, सरस्वती चौक, हुतात्मा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अशी जाणार आहे.

चार हुतात्म्या पुतळा चौकात समारोप सभा होणार आहे. यामध्ये मराठा बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सोलापूरच्या मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### रविवारी देशव्यापी संवेदना २.० रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि. २० मार्च-**

निमा आणि निफा यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या शहीद दिनी रविवार दि. २३ मार्च रोजी देशभरात संवेदना २.० या नावे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रीय प्रवर्तक डॉ. विनायक टेंभुर्णीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. निमा ही सर्वात मोठी वैद्यकीय संघटना असून चार लाखाहून अधिक डॉक्टर सदस्य आहेत. निमा सोलापूर शाखेकडून रविवार दि. २३ मार्च रोजी बाराहून अधिक ठिकाणी रक्त संकलन केंद्रे उपलब्ध करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील विविध हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात येत आहेत. सोलापूर परिसरातून एक हजाराहून अधिक बॉटल रक्त संकलन करण्याचा प्रयत्न आहे, असे अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी, मुख्य समन्वयक डॉ. नितीन बलदवा यांनी सांगितले. नागरिकांनी या शिबिरात रक्तदान करून राष्ट्र कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी यांनी केले आहे. यावेळी डॉ. नितीन बलदवा, डॉ. रवी गायकवाड, डॉ. अभिजीत पुजारी, डॉ. प्रवीण ननवरे, डॉ. रमाकांत अयाचित उपस्थित होते.

### शेतकऱ्यास मारहाणप्रकरणी कारवाईची मागणी

**सोलापूर, दि. २० मार्च-**

शेत जमीन सोडण्याबाबत पाच जणांनी दमदाटी व मारहाण केल्याप्रकरणी तत्काळ संबंधितांवर चौकशी अंती फौजदारी करवाई करावी, अशी मागणी औज आहेरवाडी येथील शेतकरी प्रकाश कोकरे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील हिपळे येथे असलेली शेत जमीन सोडण्यासाठी पाच जणांनी दमदाटी व बेदम मारहाण केली. त्यानंतर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये औषध उपचार घेतले. याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा दाखल केला. तरी संबंधितांवर दखलपात्र गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी कोकरे यांनी केली आहे.

### मीना बाजारनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल

**सोलापूर, दि. २० मार्च-**

३१ मार्च रोजी होणाऱ्या रमजान सणानिमित्त विजापूरवेस येथे भरण्यात येणा-या मीना बाजारनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. तसे आदेश पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी काढले आहेत. त्याची अंमलबजावणी २२ ते ३१ मार्च यादरम्यान राहणार आहे.



शहरातील बेगम पेठ पोलीस चौकी, विजापूर वेस, बाराईमाम चौक, बाकळे प्रेस, पेंटर चौक, रंगरेज बोळ या परिसरात खरेदीसाठी येणा-यांची संख्या मोठी आहे. या भागात वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होण्याची शक्यता असल्याने वाहतूकीत बदल करण्यात आले आहेत. वाहतुकीस बंद करण्यात आलेले मार्ग बेगम पेठ पोलीस चौकी ते विजापूर वेस, बाराईमाम चौक ते विजापूर वेस बाकळे प्रेस ते विजापूर वेस, लक्ष्मी मार्केट ते विजापूर वेस पंचकट्टा ते विजापूर वेस, पेंटर चौक ते विजापूर वेस रंगरेज बाळे ते विजापूर वेस, माणिक चौक ते विजापूर वेस वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग माणिक चौक येथून समाचा चौक, भावसार पथ मार्गे बाराईमाम चौक, किडवाई चौक, हवाई चप्पल मार्ट चौक, ट्रेझरी बँक कॉर्नर ते पंचकट्टा ते लक्ष्मी मार्केट मार्गे दत्त चौक.

# अबब...रोहयोच्या कामावर १० हजार मजूर

- जिल्ह्यात कडक उन्हाळा सुरु
- एकूण १५७१ कामे प्रगतीपथावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत जिल्ह्यातील १५७१ कामे प्रगतीपथावर असुन १० हजार ३८२ मजूर काम करीत आहेत. ऊन्हाळ्यात शेतीमधील सुगीची कामे संपल्याने मजूरांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात ग्रामपंचायत, कृषी व इतर यंत्रणांमार्फत मजूरांसाठी रोजगार उपलब्ध कयून दिली जात आहे.


संग्रहित छायाचित्र

रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्हा परिषद कृषी विभागाकडून ७८६, ग्राम पंचायत विभागाकडून ७६३, सामाजिक वनीकरण विभागाकडून ९, रेशीम विभागाकडून १३ अशी एकूण १ हजार ५७१ कामे जिल्ह्यात सुरु आहेत. मात्र, त्या कामांचा मोबदला वेळेवर मिळत नसल्याने मजुरांकडून ओरड सुरु आहे.मजुरी थकल्याने रोजगार हमीवरील जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणची कामे ठप्प झाली आहेत. वर्षातील किमान १०० दिवस मजुरांना रोजगाराची हमी देणारा महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना कायदा केंद्र सरकारने केला आहे. यात मजुरांची ऑनलाईन हजेरी घेऊन दर आठवड्याला केंद्राकडून मजुरांच्या कामाची रक्कम थेट त्यांच्या खात्यांमध्ये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.शिवाय कामाच्या ठिकाणी विविध सोईसुविधा उपलब्ध करून दिले जातात. योजनेच्या कामाची २९७ रूपये मजूरी परवडत नसल्याने अनेक मजूरांनी या कामाकडे पाठ फिरविली आहे. त्यामुळे अनेक गावातील कामे खोळंबली आहेत. शेतीच्या कामासाठी ५०० रूपयांपर्यंत दिली जाते. त्यामुळे मजूरी कमी व वेळेवर मिळत नसल्याने प्रतिसाद मिळत नाही.

#### मजूर स्थलांतर रोखण्याचे उद्देश

ग्रामीण भागातील रोजगारांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सरकारकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली. यामध्ये रोजगारांना केंद्र सरकारकडून १०० दिवस तर राज्य सरकारकडून २६५ दिवस कामाची हमी देण्यात येते. मागेल त्याला काम याअंतर्गत सरकार कडून रोजगार हमी योजनेची कामे सुरू करते. या योजनेमुळे रोजगारासाठी स्थलांतर होण्याचे प्रमाण कमी करणे हा सरकारचा उद्देश्य आहे. त्यामुळे स्त्री अथवा पुरूष असा भेदभाव न करता एका मजुराला एका दिवसासाठी २९७ रूपये पगार देण्यात येते.
तालुकानिहाय कामे व मजूर

#### जिल्ह्यातील १०३८२ हजार मजुरांचा समावेश

अक्कलकोट १३२ कामे १११३ मजूर , बार्शी २२२ कामे १३६५ मजूर, करमाळा - २४७ कामे १८६२ मजूर , माढा २०४ कामे १३५२ मजूर , माळशिरस - १६४ कामे ९३९ मजूर , मंगळवेढा - ६४ कामे ३९४ मजूर , मोहोळ - २४६ कामे १४९१ मजूर, , सांगोला १६२ कामे १०८६ मजूर , उत्तर सोलापूर ५१ कामे ४१२ मजूर , दक्षिण सोलापूर - ७९ कामे ३६८ मजूर असे एकूण १५७१ कामांवर १०३८२ मजूर काम करीत आहेत .

#### मनरेगामध्ये १०० दिवस रोजगार गॅरंटी

केंद्र सरकारने सुरू केलेली मनरेगा योजना ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्वाचे आहे. यामुळे सर्व सोईसुविधांसह मजूरांना १०० दिवसांची रोजगाराची गॅरंटी मिळते. शिवाय गावाच्या विकासालाही हातभार लागते. म्हणून मजूरांनी मनरेगा योजनेचे लाभ घ्यावे.

**- अरूण वाघमोडे, गटविकास अधिकारी, मनरेगा जिल्हा परिषद**

# नोकरीच्या आमिषाने १९ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

पुणे महापालिका येथे विविध पदासाठी भरती निघाल्याचे सांगून संघटनेच्या नावाने प्रत्येकी २ लाख घेऊन नोकरीच्या आमिषाने १९ लाखांची फसवणूक करणा-याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार डिसेंबर २०२३ ते तीन मार्च २०२४ पर्यंत सुरू होता.

याबाबत सविता भगवान खरात (वय ३३, रा. बाज ता. जत, जि, सांगली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजय बोंडवे (मु. पो. निडळ ता.खटाव जि, सातारा) विरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी या उच्चशिक्षित आहेत. त्या नोकरीच्या शोधात होत्या. त्याचबरोबर इतरही तरुण तरुणी नोकरीच्या शोधात होत्या. सन २०२३ मध्ये यातील फिर्यादी आणि आरोपी यांची भेट झाली. त्यावेळी त्याने पुण्यात भारतीय काँग्रेस नावाची संघटना पुणे येथे आहे. पुणे महापालिका येथे लिपिक तसेच परिचारिका अशा विविध पदासाठी भरती करण्याचे काम होत असल्याचे सांगितले.

त्यासाठी त्याने सोशल मिडियाचा वापर केला. त्यानंतर विना सही शिक्क्याची निवड यादीचे कार्यालयीन आदेश पाठवून विश्वास संपादन करून संघटनेच्या नावावर देणगी म्हणून प्रत्यकी २ लाख रुपये घेतले. आरोपीने टप्प्याटप्प्याने सहा जणांकडून पत्नी आणि मुलाच्या नावाने रोख तसेच ऑनलाईन असे १९ लाख रुपये घेवून फसवणूक केली. हा प्रकार सोलापुरातील सामाजिक कार्यकर्ते विनोद वाघमारे यांच्या औसे वस्ती येथील कार्यालयात उघड झाला. या गुन्ह्याचा तपास पोनि दराडे करत आहेत.

# चोरट्यांनी २८ लाखांच्या साहित्यावर मारला डल्ला

**आठ लाख ८८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल केला हस्तगत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**

मध्य रेल्वेचा प्रवास सुरक्षित सुखकर आणि स्वस्त मानला जातो. मात्र गत दोन महिन्यात प्रवाशांचे मोबाईल, बॅगा आणि इतर साहित्य असे एकूण २७ लाख २५ हजार १७९ रुपयांचे साहित्य चोरीला गेले आहे. लोहमार्ग पोलिसांनी यातील काही चोरट्यांच्या मुसक्या आवळून नऊ गुन्ह्यांचा तपास करून आठ लाख ८८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सोलापूर रेल्वे स्टेशन वरील चोरीच्या वाढत्या घटना लक्षात घेता, रेल्वे प्रवाशांना सुविधा देण्याबरोबरच सुरक्षा पुरवण्याचे आव्हान देखील सोलापूर रेल्वे प्रशासनासमोर असणार आहे.

संबंध भारतामधून रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे, वाढत्या प्रवाशांसह चोऱ्यांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे सुरक्षेची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न यानिमित्ताने प्रवासी उपस्थित करीत आहेत. रेल्वे प्रवास करताना मोबाइल, दागिने, पर्स चोरी, बॅग चोरी, चेन ओढणे, पाकीट लांबविण्याच्या घटना वारंवार घडत असतात. रेल्वेच्या विशेषतः आरक्षित, एसी डब्यात चोर्या होतात. या चोर्या मोबाइल, चेन ओढून पळून जाणाऱ्या नसतात, तर मौल्यवान दागिन्यांच्या असतात. धावत्या रेल्वेगाड्यांमध्ये चोरी करणाऱ्या टोळ्या सक्रिय असतात. या टोळ्या किरकोळ चोऱ्या करण्याऐवजी एकदाच मोठी चोरी करतात. यात विशेषतः दागिने, रोकड, मोबाइलचा समावेश असतो. तसेच प्रवाशांच्या बॅगादेखील चोरून नेल्या जातात. गर्दीचा फायदा घेत चोरटे चोरी करतात. मात्र, लोहमार्ग पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेत त्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम केले जात जात आहे.

#### रेल्वे प्रशासनाने चोरट्यांच्या बंदोबस्तासाठी गस्त वाढवावेत

प्रवाशांसोबत इतर साहित्य मौल्यवान वस्तू दागिने असतात. अशा वस्तू नाईलाजाने प्रवाशांना स्वतःजवळ घ्याव्या लागतात. तेव्हा चोऱ्याचे प्रमाण वाढते. या वाढत्या चोऱ्यांवर आळा घालण्यासाठी रेल्वे प्रशासनाने चोरट्यांच्या बंदोबस्तासाठी गस्त पथक वाढवावेत.

**- राजा जाधव, अध्यक्ष सोलापूर रेल्वे प्रवासी संघटना**

#### चोरीच्या प्रकरणावर आळा घालण्यासाठी प्रयत्न करा

सोलापूर रेल्वे स्टेशनवर चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. स्टेशन परिसरात इतरत्र फिरणाऱ्या संशयित व्यक्तींना ताब्यात घ्यावेत. जेणेकरून होणाऱ्या चोरीच्या प्रकरणावर आळा घालण्यात येईल.

**- अभिजित बनसोडे, प्रवासी**

# वाढत्या उन्हामुळे अंगणवाडीच्या वेळेत बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

उन्हाची तीव्रता वाढल्याने अंगणवाडीची वेळ बदलण्याच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेवर धडकलेल्या अंगणवाडी ताईंच्या मोर्चाची जिल्हा परिषद प्रशासनाने दखल घेतली आहे. आता सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत चिमुकल्यांना शैक्षणिक धड्यांसह नाश्ता, पोषण आहार मिळणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अंगणवाडी वेळेत बदल करण्याबाबत आदेश काढला आहे. ३१ मे पर्यंत नवा आदेश लागू राहणार असून १ जूनपासून आदेशानुसार पूर्वीचे वेळापत्रक लागू होणार आहे.

प्रशासनाने दुपारी चारपर्यंत कर्मचार्यांनी अंगणवाडीत थांबण्याचे आदेश काढला होता. त्या विरोधात राज्यभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त करत ३ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन केले होते. सोमवारी जिल्हा परिषद पुनम गेटसमोर महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली लाल साडी परिधान करून उन्हात हाती छत्री धरलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद प्रशासनासह राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारीकुलदीप जंगम यांना निवेदन देऊन वेळेत बदल करण्याची मागणी केली होती.

#### सकाळी साडेसातला अंगणवाडी सुरू

१३ फेब्रुवारीच्या आदेशानुसार सकाळी ९.३० ला अंगणवाडीची पूर्वतयारी करावयाची होती. ती आता सकाळी ७.१५ ला उघडणार आहे. तर पूर्वी ९.४५ ते १.१५ ही वेळ पूर्व शालेय शिक्षणासह बालकांना नाश्ता, पोषण आहार देण्याची वेळ होती. ती आता ७.३० ते १०.३० केली आहे. नोंदी व संदर्भ सेवेसाठी कर्मचाऱ्यांना दुपारी ४ पर्यंत अंगणवाडीत थांबावे लागत होते. आता दुपारी १.१५ पर्यंत थांबावे लागणार आहे. एकूण ३९० मिनिटांचा कालावधी कायम ठेवण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी संघटनांच्या प्रतिनिधींच्या मागणींची दखल घेतली आहे. सीईओ अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत दक्ष असल्याचे दिसून येते. त्यांनी आमच्या प्रश्नाची दखल घेऊन उत्कृष्ट निर्णय घेतला आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे.

**- सूर्यमणी गायकवाड,**
महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटना, सोलापूर

# पोलीस निरीक्षकांना धक्काबुक्की

### तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

पोलीस ठाण्याच्या आवारात पोलीस निरीक्षकांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार गुरुवारी दुपारी ४.३० वाजता घडला. याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस अंमलदार दिनेश घंटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नाईन्ट्या उर्फ ओंकार संतोष नलावडे (रा. सुंदराबाई डागा प्रशालेजवळ, सोलापूर) विरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी ओंकार याची रामलाल चौकातील प्रजा मटण स्टॉलजवळ तीन व्यक्तींबरोबर तक्रार सुरु होती. त्यावेळी आरोपी तेथील फूटपाथवर स्वत: डोके व चेहरा आपटून घेत होता. हा प्रकार दिसल्याने फिर्यादी घंटे हे त्यास रिक्षातून पोलीस ठाण्यात नेत होते. रिक्षात असताना आरोपी ओंकार हा फिर्यादीच्या शर्टाला ओढाओढी करून त्यांच्या अंगावर थुंकला. त्याच अवस्थेत त्यास पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्याला वैद्यकीय उपचाराकरीता यादी देण्यात येत होती. यावेळी पोलीस निरीक्षक अरविंद माने हे त्यास समजावून सांगण्याचा प्रयत्न करत असतानाच, आरोपीने डाव्या हाताने त्यांच्या छातीवर बुक्की मारली. माने हे त्यास अडवत असताना आरोपीने पुन्हा उजव्या हाताच्या मनगटाजवळ मारल्याने पोलीस निरीक्षक माने यांना मुकामार लागला. सरकारी काम करताना अडथळा आणून फिर्यादी तसेच पोलीस निरीक्षक माने यांना छातीवर मारून दुखापत केल्याप्रकरणी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास सपोनि जाधव करत आहेत.

# ठोक अंशदान मिळणाऱ्या ग्रामपंचायतींची चौकशी करणार

### सीईओ जंगम यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

औद्योगिक वसाहत, कारखाना व इतर कंपन्यांकडून करापोटी व विकासासाठी ठोस अनुदान देण्यात येते. ठोस अंशदान मिळणाऱ्या जिल्ह्यातील मोठ्या ग्राम पंचायतींच्या कामकाजाची चौकशी सुरू आहे. लेखासंहिता नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करणार असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी सादर केल्यानंतर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. दक्षिण सोलापूर तालुक्यातील फताटेवाडी येथील ग्राम पंचायतीच्या विविध विकासकामांत चार कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशीत उघड झाले आहे. सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांनी वरीष्ठ कार्यालयाची मंजूरी न घेता परस्पर रक्कम खर्च केल्याने भ्रष्टाचार झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर अनुदान खर्चावर व व्यवहारांवर जिल्हा परिषद व पंचायत समितीचे नियंत्रण बंधनकारक आहे. ग्रामपंचायतीने विकास आराखडा, त्याची माहीती व लेखा परिक्षण अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे देणे आवश्यक आहे. त्यामुळे अनेक ग्रामपंचायतींचे ठोस अनुदानाची चौकशी सुरू आहे. फताटेवाडी येथील ग्रामपंचायमध्ये सरपंच, उपसरपंच व ग्राम सेवक यांनी ४ कोटी ४३ लाखांचे भ्रष्टाचार करून विकासकामांना खीळ घातला आहे. फताटेवाडी येथील एनटीपीसी कंपनीकडून आलेल्या करातील रक्कममध्ये भ्रष्टाचार करण्यात आला आहे. याप्रमाणेच अन्य ग्रामपंचायतीं मध्येही गैरव्यवहार झाला आहे काय? याबाबत चौकशी आवश्यक आहे.

# सव्वानऊ लाखांपैकी फक्त साडेसात हजार वाहनांनी बसवली HSRP नंबरप्लेट




**● कारवाईचे आरटीओंचे संकेत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

राज्य शासनाने २०१९ पूर्वी नोंदणीकृत गर्व वाहनांना हायसिक्यूरिटी नंबरप्लेट (एचएसआरपी) बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी (दि.३०) एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे. मात्र, या नियमाकडे सोलापूर आरटीओ अंतर्गत येणाऱ्या वाहनचालकांनी पाठ फिरवली आहे. आत्तापर्यंत केवळ सात हजार ५५१ वाहनचालकांनी ही नंबर प्लेट बसविली असल्याचे कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, सोलापूर प्रादेशिक परिवहन (कार्यालय) आरटीओ प्रशासनाच्या आकडेवारीनुसार, सोलापूरमध्ये तब्बल ९ लाख २६ हजार ८३९ इतकी वाहने सन २०१९ तारखे पूर्वीची नोंदणी आहेत. आशा वाहनधारकांना नवीन नियमानुसार हायसिक्युरिटी नंबर प्लेट बसवणे बंधनकारक असणार आहे. मात्र, (दि. १८) मार्चपर्यंत केवळ सात हजार ५५१ वाहनधारकांनीच ही नंबरप्लेट बसवून घेतली आहे. यामुळे प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. मोहिमेला अधिक वेग देण्याचा निर्णय घेतला आहे.

**मुदत ३० एप्रिलपर्यंतच**

२०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसविणे अनिवार्य आहे. त्यासाठी (दि. ३०) एप्रिलची मुदत दिली आहे. या मुदतीत जे वाहनमालक ही नंबरप्लेट बसवणार नाहीत, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. (दि. ३०) एप्रिलनंतर एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर कारवाई केली जाईल. तसेच पोलिस आणि आरटीओच्या संयुक्त पथकांद्वारे तपासणी मोहीम राबविली जाईल.

**प्रशिक्षित कारागीरांचा अभाव**

ऑनलाइन पद्धतीने नंबर प्लेट बुकिंग केल्यानंतर, नंबर प्लेट बसवण्यासाठी विशिष्ट तारीख वाहनधारकांना दिली जाते. त्या तारखेला वाहनधारकांनी नंबर प्लेट बसवण्याच्या ठिकाणी जाणे बंधनकारक आहे. त्या दिवशीची नोंदणी तारीख असल्याने त्याच दिवशी नंबर प्लेट बसवण्यात येते. मात्र जेथे ही नंबर प्लेट बसवण्यात येते. तेथे प्रशिक्षित कारागीर नसल्यामुळे नंबर प्लेट बसवताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. अशा अवस्थेत वाहनधारकांच्या वाहनाचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ज्या खाजगी कंपनीकडे या नव्या नंबर प्लेटचा मक्ता (टेंडर) देण्यात आला आहे. त्या कंपनीने सुरक्षित कारागीर ठेवावेत अशी मागणी आता वाहनधारकांमधून होत आहे.

#### नवीन नियमानुसार नंबर प्लेट नसल्यास दंडात्मक कारवाई

शासनाने २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना हायसिक्यूरिटी नंबरप्लेट बसवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत आहे. हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसवली नाही, तर दंडात्मक कारवाई होईल.

**- असिफ मुलाणी,**
सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर

# बर्ड फ्लूबाबत सरसकट आदेश देण्याची मनसेची आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

बर्ड फ्लूच्या पार्श्वभूमीवर महापालिका आणि जिल्हा प्रशासनाने किल्ला खंदक बाग परिसरातील दोन्ही चौपाट्यावरील पदार्थांच्या गाड्या बंद ठेवण्याचे आदेश दिले. मात्र, याच परिसरातील मोठी रेस्टॉरंट सुरू आहेत. हे अन्यायकारक असून सरसकट आदेश देण्यात यावा, अशी मागणी मनसेच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



चौपाटीवरील अनेक कामगार हे रोजी रोटीवर अवलंबून आहेत. यांच्या उदरनिर्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रतिबंधित क्षेत्रातील केवळ पदार्थांच्या गाड्यांवर निर्बंध लादले आहेत. याच परिसरातील मोठी हॉटेल्स रेस्टॉरंट सुरू आहेत. हा दुजाभाव कशासाठी असा सवाल उपस्थित करत निर्णयामध्ये बंद करण्यात आलेल्या परिसरामध्ये विसंगती आहे, असा आरोप मनसेने केला आहे.त्याच परिसरातील खाद्यपदार्थ विक्री करणारे दुकाने चालू आहेत.

मात्र लहान व्यापाऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे. सरसकट सर्व दुकानांना उघडण्याची परवानगी द्यावी अन्यथा सर्व दुकाने बंद करण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले.यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर , लोकसभा विभाग अध्यक्ष प्रशांत इंगळे, मनविसे जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिक्षक सेना राज्य उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, प्रसाद कुमठेकर, जितेंद्र टेंभुर्णीकर, विश्वास गजभार, परिमल पुदाले, अभिषेक इरकल उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६२

**आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थ कलाकामिनी ।**
**ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिली मियां ।।**

कोणत्याही चांगल्या कार्याच्या सुरुवातीस, भारतीय संस्कृतीत प्रथम देव देवतांना, गुरुजनांना, आई वडिलांना, वडिलधाऱ्यांना नमन करण्याची पध्दत आहे. याप्रमाणे ज्ञानेश्वरीतील प्रारंभीच्या वीस ओव्यात माऊलींनी ऊँकाररुप गणेशाला नमन केले आहे. ऊँकाररुप गणेशाचे नमन झाल्यानंतर माऊली एकविसाव्या ओवीत आतां या शब्दाने शारदेला नमन करण्यास प्रारंभ करतात. आतां म्हणजे श्री गणेशाचे अर्थात आदय देवतचे नमन झाल्यानंतर शारदेचे नमन करतात. गणेशाच्या अग्रपुजेचा मान ज्ञानदेवांनी अत्युत्कृष्ट प्रकारे प्रारंभीच्या वीस ओव्यात राखला आहे. परंपरेप्रमाणे शारदेला नमन करण्यास माऊली विसरले नाहीत. माऊलीच्या दृष्टीकोणातील ही शारदा म्हणजे सरस्वती जी विद्येची देवता आहे, ती वाणीचे अपूर्व नित्य नवे वैभव दाखवते. ही शारदा चातुर्यार्थ, शब्दकलाश्री, सर्व विदया व कला यांचे शिखर आहे. अशा या विश्वमोहिनीला नम्रपणे माऊलींनी नमस्कार केला आहे. आपणही ज्याच्यावर आपली श्रध्दा आहे, त्यास कार्यप्रारंभी नमन करणे योग्य होईल. शारदेचे नमन अनेक शाळा, महाविद्यालयातून किंवा चांगल्या, महत्वाच्या कार्यक्रमाच्या प्रारंभी केले जाते. मात्र येथे खेदाने नमूद करावेसे वाटते की, जेव्हा शाळा, महाविद्यालयातून विदयार्थ्यांच्या परिक्षा घेतल्या जातात. तेव्हा अनेक विद्यार्थी विदयेला, ज्ञानदेवतेला म्हणजे पुस्तकांना अनेक ठिकाणी फाडुन तिच्या चिठया करतात. ही विदया नको त्या ठिकाणी म्हणजे मुतारी, बाथरुम अशा ठिकाणी फेकली जाते. अनेक परिक्षार्थी या चिठ्ठयारुपी विद्येला बुटा, चपलात, सॉक्सम ध्ये किंवा शरीराच्या नको त्या भागाजवळ ठेवतात. तेव्हा अशा परिक्षार्थ्यांना माऊलींच्या दृष्टीकोनातील शारदेचे, विदया देवतेचे महत्व पटवून देण्याची गरज आहे असे वाटते.



ज्ञानीयांचा राजा असणा-या ज्ञानदेवांनी जर विदया देवतेला एवढे महत्त्व दिले आहे तर आपण असे महत्व दयायला नको का ? पालक, वाचकांनी, गुरुजनांनी विदयार्थ्यांना या विदया देवतेचे महत्व पटवून देऊन तिचा मान राखायला हवा असे नमूद करावेसे वाटते. एका कवींनी असे म्हटलें आहे की,

**आगे लिख, पिछे दे । भुल पडे तो कागजसे ले ।।**

याप्रमाणे विसर पडल्यास कागदाकडून घेण्याऐवजी बरेचजण कागदच घेतात, पुस्तके फाडतात, नको तसा चुकीचा वापर करतात हे चुकीचे आहे. आपल्याकडून असे चुकीचे कांही घडणार नाही, याची काळजी आपण घ्यावी. विद्यादेवतेचा मान सन्मान आपल्याकडून होईल असे आपण पाहात जावे. प्रसंगानुरुप इतरांनाही हे महत्त्व पटवून देत जावे. यामुळे विदयेचे महत्त्वही लक्षात येईल आणि आपल्याबरोबर इतरांनाही विदयादेवतेचा आशीर्वाद मिळून सर्वांच्या जीवनात आनंद वाढेल, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार**
**दि. २१ मार्च २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**कृ. सप्तमी (२८.२३)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - ज्येष्ठा (२५.४५)**
**योग - सिध्दी (१८.४०)**
**करण - विष्टि (१५.३८)**

**दिनविशेष - चांगला दिवस, जागतिक वनीकरण दिन, जमशेदी नवरोज**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल. मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल.

**वृषभ** : लोभ - लालचे पासून दूर रहा. अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन**: व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क**: वहान चालविताना सावधानीने चालवा. अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह** : प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या** : कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे.

**तुळ** : आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक** : व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर** : सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन**: आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत.

# सोन्याने ओलांडला ९० हजारांचा टप्पा

**पाच वर्षात सोन्याची झळाळी वाढली ४९ हजारांनी**

**सोन्यातील गुंतवणुकीतील वाढ कायम**

**सोन्याच्या दरवाढीमुळे महागाईला मिळतेय चालना**

**सराफ व्यापाऱ्यांना मात्र ग्राहक तुटण्याची सतावतेय भीती**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या बाजारात तेजीचे वातावरण आहे. काही काळ स्थिर असलेली बाजारपेठ, आता इजराइल हामास युद्ध परिस्थितीमुळे पुन्हा एकदा तेजीकडे वळत आहे. याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे स्थानिक बाजारपेठेत आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम जाणवत आहे. युद्ध व युद्धजन्य परिस्थिती यामुळेच



सोन्याची झळाळी दिवसेंदिवस वाढतच आहे. गेल्या पाच वर्षांत कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती, रशिया-युक्रेन युद्ध आणि काही देशांत निर्माण झालेली आर्थिक मंदी, अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प सरकारने घेतलेले काही निर्णय, यामुळे सोन्यावर असलेला विश्वास अधिकच गडद झाला आहे. त्यामुळे सोन्यातील गुंतवणूक वाढतच असून, त्याची मागणी भाववाढीनंतरही कायम आहे. या व अशा अनेक कारणांमुळे सोने गेल्या पाच वर्षात झपाट्याने वाढले असून, प्रति दहा ग्रॅम सोन्याचा भाव आता ९० हजार ९०० रुपये झाला आहे. गेल्या पाच वर्षांत २४ कॅरेट सोने (प्रती दहा ग्रॅम) ४९ हजार ९०० रुपयांनी महागले आहे.

**सोन्याचे (२४ कॅरेट व २२ कॅरेट ) नुसार रुपयात दर आणि पंचवार्षिक तक्ता**

| वर्ष | २४ कॅरेट | २२ कॅरेट |
|---|---|---|
| २०२५ | ९०,९०० | ८४,५०० |
| २०२४ | ६५,८१२ | ६१,२५० |
| २०२३ | ५८,५८० | ५४,५२० |
| २०२२ | ५१,७६३ | ४९,४५६ |
| २०२१ | ४५,१९८ | ४३,१८४ |
| २०२० | ४०,५०० | ३८,८९० |

**भाववाढीची कारणे**

- इजराइल हामास युद्ध परिस्थिती
- ट्रम्प सरकारचे विविध निर्णय
- रशिया-युत्क्रेन युद्धाचे परिणाम
- अमेरिकी व युरोपीय बाजारपेठेतील मंदी
- अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांकडून वाढलेली खरेदी
- अपरिहार्य कारणांमुळे वाढलेली खरेदी

दरम्यान, प्रतिदहा ग्रॅम २४ कॅरेट सोने १७ मार्च २०२० ला ४० हजार ७०० रुपये होते; तर २२ कॅरेटचा भाव ३९ हजार रुपये होता. आता तेवढ्याच सोन्याचा भाव अनुक्रमे ९० हजार ९०० आणि ८४ हजार ५०० रुपये झाला आहे. ऐन लग्नसराईच्या तोंडावर सोने ९० हजारांचा टप्पा ओलांडून गेले आहेत. भाववाढीमुळे खरेदीवर परिणाम होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, प्रत्यक्षात त्या विरुद्ध परिस्थिती असून, भाव वाढल्यानंतरही खरेदी कायम आहे. त्यामुळे सराफ बाजारात उत्साह दिसून येत आहे. सर्व परिस्थिती सुरळीत झाली; तरी सोन्याचा भाव लगेच कमी होण्याची शक्यता नाही. दोन वर्षांत झालेली वाढ लक्षात घेता, यापुढेही भाव तेजीत राहू शकतो, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

**सोन्याच्या दरवाढीमुळे महागाईला मिळतेय चालना**

सोन्याच्या सातत्याने दरामध्ये झालेली वाढ महागाईला आमंत्रण देणारी ठरत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे सोन्याचे दर हे एक लाखाच्या घरामध्ये जातील अशी शक्यता वर्तवली जात आहे. सततच्या भाववाढीमुळे महागाईला आमंत्रण मिळत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठा सोन्याच्या व्यापारावर अवलंबून असल्याने, अप्रत्यक्षपणे महागाई वाढण्यासाठी सोन्याचे दर कारणीभूत ठरत आहेत.

**- अविनाश पंडित, सराफ व्यापारी**

**गेल्या वर्षभरात २४ हजारांची वाढ**

गेल्या पाच वर्षांचा विचार केला असता मार्च २०२४ ते मार्च २०२५ दरम्यान सोने सर्वाधिक महागले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत २४ कॅरेट सोने प्रति दहा ग्रॅम २४ हजार ५०० रुपयांनी महागले आहे. एक फेब्रुवारीला ८२ हजार ८२० रुपये असलेला २४ कॅरेट सोन्याचा भाव १० फेब्रुवारीला ८५ हजार ७७९ रुपये झाला होता. याच दिवशी सोन्याने ८५ हजारांचा टप्पा पार केला. भविष्यात आणखीन सोन्याचे दर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## ऑर्किड स्कूलमध्ये नेत्र तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये संस्थेचे प्रेरणास्थान स्व.नागेश करजगी यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरात जवळपास ५०० हुन अधिक नागरिकांनी भेट देऊन शिबीराचा लाभ घेतला.

या शिबिराचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संस्थेचे विश्वस्त नंदिनी करजगी, सोमनाथ करजगी, राजेश करजगी, संस्थेच्या सचिवा वर्षाताई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, प्रि.प्रायमरी इन्चार्ज अनिता अनगोंडा, डॉ. गौस मुजावर, डॉ.मंजिरी पाटील, डॉ.आशिष चौधरी उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये पुणे येथील एच. व्ही देसाई रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टर्सनी शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली. तसेच सोलापूर शहरातील नागरिक या शिबिरात मोठ्या प्रमाणात आले होते. त्यांची देखील नेत्र तपासणी करण्यात आली.

# उन्हाळी हंगामात जादा रेल्वे गाड्या सोडण्याची प्रवासी संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

रेल्वेने देशांतर्गत लांबचा प्रवास करत असाल तर पुढील दोन महिने ते शक्य होणार नाही. कारण उन्हाळी सुटीच्या काळातील पुढील दोन महिन्यांसाठी रेल्वेगाड्या फुल्ल झाल्या आहेत. आता तत्काळ तिकिट वगळता अन्य तिकिट मिळणार नाहीत. रेल्वे फुल्ल झाल्याने उन्हाळी सुटीच्या काळातील प्रशासनाकडून स्पेशल रेल्वेगाड्या सोडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, उन्हाळ्यात अनेकजण सहकुटुंब प्रवासाचे नियोजन करतात. यावेळी इच्छितस्थळी जाण्यासाठी प्रवाशांकडून किमान दोन महिने अगोदर आरक्षण तिकिट काढण्यात येत आहेत. त्यामुळेच मध्य रेल्वेच्या सर्व रेल्वेगाड्या फुल्ल झाल्याने, उन्हाळी विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन असल्याचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी सांगितले आहे.

**रेल्वे प्रशासनाने सकारात्मक विचार करावा**

परीक्षा संपल्यानंतर चिमुकल्या बाळगोळपांना उन्हाळ्यात बाहेर फिरायला जाण्याचे वेध लागतात. त्याच पद्धतीने लग्न समारंभासाठी आणि विशेष धार्मिक स्थळांना जाण्यासाठी प्रवासी बाहेर पडतात. अशावेळी रेल्वे आरक्षण संपूर्णपणे बुक होते. तेव्हा रेल्वे प्रशासनाने ज्यादा उन्हाळी गाड्या सोडण्याचे नियोजन करावे. सोलापूर हैदराबाद, सोलापूर मुंबई,सोलापूर पुणे, सोलापूर गोवा, त्याच पद्धतीने हैद्राबाद हुबळी रेल्वेगाडीचा थांबा होटगी स्टेशन पर्यंत असून, तो थांबा सोलापूर पर्यंत वाढवावा. जेणेकरून प्रवासी वर्ग हुबळी मार्गे गोव्याला जाऊ शकतात. यावर मध्य रेल्वे प्रशासनाने सकारात्मक विचार करावा.

**- राजा जाधव, अध्यक्ष सोलापूर रेल्वे प्रवासी संघटना.**

**'या' रेल्वेगाड्या फुल्ल**

कर्नाटक, राजकोट, कोणार्क, राजकोट, एलटीटी, चेन्नई, हुसेनसागर, हैदराबाद, एलपीआर हमसफर, बिकानेर, मुंबई, उद्यान एक्स्प्रेस, सीएसएमटी मेलसह उत्तर व दक्षिण भारतात जाणऱ्या गाड्या फुल्ल आहेत.

**आरक्षित तिकिट मिळेना**


दरवर्षी काश्मीर, केरळ, वैष्णवीदेवी यात्रा नियोजन करतो. यंदा रेल्वे तिकिट मिळल नाही. दहा मिनिटांत तिकिट संपतात. मध्य रेल्वे प्रशासनाने ज्यादा उन्हाळी गाड्या सोडण्याचे नियोजन करावे.

**- संतोष नवले, प्रवासी**

# अभियांत्रिकीमध्ये बायो मटेरियलचा उपयोग या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

विजापूर रोडवर स्थित जिल्ह्यातील एक अग्रणामांकित संस्था अशी ओळख असलेल्या ए.जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये आय ई आयच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाल्याची माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी दिली. अभियांत्रिकीमध्ये बायो मटेरियलचा उपयोग कशा पद्धतीने केला जाऊ शकतो या विषयावर वेगवेगळ्या संशोधक आणि प्राध्यापकांनी आपापली मते मांडली सदर कार्यशाळा दि. ९ जानेवारी ते ११ जानेवारी २०२५ दरम्यान घेण्यात आली. यामध्ये सुमारे ४०० प्राध्यापकांनी भाग घेतला अशी माहिती त्यांनी त्यावेळी दिली. यामध्ये तज्ञ प्रा. डॉ. सिनप्पा (कोडगू युनिव्हर्सिटी), आणि आय ई आय सोलापूर चे अध्यक्ष डॉ. एम. एस.




देशपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. आर एम. कुलकर्णी (, ) यांनी बायो अँड नॅनो मटेरियल या विषयावर प्रो. एस. ए. जेऊरकर, सोलापूर यांनी बायो मटेरियल सायन्स या विषयावर डॉ. पी.हर्षदा यांनी डेंटल एप्लीकेशन ऑफ बायो मटेरियल यावर डॉ.ए. वाय. पाटील यांनी स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग एप्लीकेशन ऑफ बायो मटेरियल यावर मार्गदर्शन केले

सदर कार्यक्रमाचे आयोजन मॅकॅनिकल इंजिनिअरिंग डिपार्टमेंट तर्फे करण्यात आले होते. डॉ. एस. बी.गदवाल यांनी कनव्हेनर म्हणून काम पाहिले. तसेच प्रा.मळेकर, प्रा दोंतुल, प्रा. जी.आर.देशपांडे, प्रा. एस. ए. देशपांडे प्रा. मुजावर, प्रा. उपाध्ये, प्रा. राठोड आणि प्रा.डी.ए. जव्हेरी यांनी वेगवेगळ्या गोष्टींचे नियोजन केले. तसेच संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, कॅम्पस डायरेक्टर डॉ.एम. ए. चौगुले यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. संस्थेचे ट्रस्टी शिवानंद पाटील व अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांनी याप्रसंगी सर्वांचे अभिनंदन केले.

## बोरामणी गवताळ सफारीचे ऑनलाईन बुकींग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

सोलापूर जिल्ह्यामध्ये वनविभागाने बोरामणी येथे गवताळ सफारी म्हणून नाविन्य पुर्ण कार्यक्रम सुरु केला आहे. सोलापूरातील व इतर ठिकाणचे पर्यटक, निसर्ग प्रेमीनी बोरामणी गवताळ सफारीचा लाभ घेण्याचे आवाहन वन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

१४ फेब्रुवारी २०२५ रोजी बोरामणी गवताळ सफारीचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रविण, उपवनसंरक्षक लेफ्टनंट कुशाग्र पाठक यांच्या हस्ते बोरामणी येथे उद्घाटन करण्यात आले होते. सफारीसाठी ऑनलाईन बुकिंगची सोय करण्यात आली आहे. सदरची सफारी ही दोन टप्पयामध्ये करण्यांत आली असून, सकाळची वेळ ६:३० ते १०:३० आणि दुपारची वेळ ३:३० ते ६:३० ठेवण्यात आली आहे. बोरामणी येथे गवताळ सफारी करीत असताना त्याठिकाणी वन्यप्राणी लांडगा, कोल्हा, खोकड, काळवीट, नीलगाय, रान ससा, रानडुक्कर, रान मांजर, उद मांजर, म्हसण्या मांजर व माळसरडा दिसून येतील. तसेच त्याठिकाणी वन्यपक्षी सर्पमार गरुड, मॉन्टेक्यूचा भोवत्या, मोर, खंड्या, पिवळ्या गाठीची माळ टिटवी, सातभाई व्हल्ले, हरीयल, बुलबुल, इंडियन रॉबिन, खाटिक व भारव्दाज अशा विविध प्रकारचे फुलपाखरे पाहावयास मिळणार आहेत. बोरामणी गवताळ सफारी येथे भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सुविधेसाठी या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मचाण, शौचालय इत्यादींची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरची सफारी ही स्वतःच्या गाडीने करावयाची असून, सोलापूर वनविभागातर्फे गाईड घेणे बंधनकारक आहे. यामध्ये सफारीचे ५०० रुपये शुल्क, सोबत गाईडचे ५०० रुपये शुल्क व कॅमेरा (असल्यास) १०० रुपये शुल्क असे एकूण ११०० रुपये आकारण्यांत येणार आहे. बुकींग करतेवेळी सदरचे पेमेंट ऑनलाईन पध्दतीने करता येईल. सफारीच्या वेळेस एका वेळी ४ ते ५ गाड्या सोडण्यांत येतील.

# रमजान ईदनिमित्त आजपासून मीना बाजार सुरू

**विविध प्रकारचे ७०० स्टॉल्स उपलब्ध**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

रमजान ईदनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे सोलापुरातील विजापूर येथे मीना बाजार शुक्रवार दि. २१ मार्च २०२५ पासून भरविण्यात येणार आहे. यामध्ये सुमारे ७०० स्टॉल्स उपलब्ध राहणार आहेत. नेटके नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती



अध्यक्ष रियाज(राजू) कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. गेल्या ७० ते ७५ वर्षापासून सोलापूर शहरातील विजापूर वेस परिसरात हा मीना बाजार भरविण्यात येतो. मीना बाजार व्यापारी संघाच्या वतीने याचे आयोजन केले जाते. रमजान ईदनिमित्ताने अनेक हिंदू - मुस्लिम बांधव या परिसरात दुकाने थाटतात. शीरखुर्माचा सुकामेवा, कपडे, महिलांचे सौंदर्य प्रसाधने, धार्मिक ग्रंथ, लहान मुलांचे कपडे, अत्तर यासह विविध साहित्य व पदार्थ विक्री केली जाते. सुमारे ७०० स्टॉल्स यामध्ये उपलब्ध आहेत.


व्यापारी आणि ग्राहक यांच्यात सुसूत्रता आणण्याचे काम मीना बाजार व्यापारी संघाच्या वतीने करण्यात येते. या परिसरात कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेचे डिजिटल लावू नये यासाठी पोलीस आणि महापालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले आहे. या मीना बाजारसाठी सोलापूर महापालिका, राज्य विद्युत मंडळ, पोलीस यांचे सहकार्य लाभते, असेही अध्यक्ष रियाज कुरेशी यांनी सांगितले.

**नूतन पदाधिकारी**

मीना बाजार व्यापारी संघाची बैठक माजी अध्यक्ष हाजी मतीन बागवान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामध्ये नूतन पदाधिकारी निवडण्यात आले. यामध्ये अध्यक्ष रियाज कुरेशी, उपाध्यक्ष वसीम सालार, म. कलीम तुळजापुरे, जनरल सेक्रेटरी - अश्फाक बागवान, जॉइंट सेक्रेटरी मुस्ताक नजम रंगरेज, खजिनदार अ. अजीज शेख, कार्याध्यक्ष महमदसाब सौदागर, प्रमुख सल्लागार हाजी मैनुद्दीन शेख, हाजी मुनाफ चौधरी, इसाक सय्यद, जुबेर बागवान, इम्रान सालार, सदस्य जाकीर नाईकवाडी, सलीम हिरोली, मंजूर बागवान, हाजी तोफिक हत्तुरे, राजा सिंदगीकर, याकुब शेख आदी.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (८४) गौरव

श्री. गुरुजींच्या स्मृतींना आठवताना एका नवीन प्रेरणेचा संचार आपल्या तनामनात होतो. आपल्या पाठ्यपुस्तकातून आपल्या भारत मातेचा गौरवांकित इतिहास शिकवला जावा असे श्री गुरुजींचे आग्रही मत होते. श्री गुरुजींनी म्हणजे बालपणीच्या माधवने शालेय जीवनात वक्तृत्व स्पर्धेत खूप बक्षिसे मिळवली होती. नंतर पुढे सरसंघचालक या नात्याने त्यांनी अगणित विषयावर अगणित भाषणे केली. इतिहास हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. शैक्षणिक सुधारणेसाठी आपला खरा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांना शिकवला पाहिजे. अन्यथा आदर्शहीनता, केवळ पोटार्थी वृत्ती आणि स्वार्थी प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण होईल. अशा शब्दात गुरुजींनी तेव्हाचे केंद्रीय शिक्षण मंत्री श्री छगला यांना मुद्दाम भेटून विनंती केली होती. ती विनंती शिक्षणमंत्र्यांना पटली होती. पण पाठ्यक्रमातील इतिहास बदलवण्यास त्यांनी असमर्थता दर्शवली होती. निरनिराळ्या ठिकाणी श्री गुरुजींनी शिक्षण विषयक मतप्रदर्शनात इतिहासा संबंधी प्रामुख्याने काही मुद्दे मांडले होते, ते असे होते. आपल्या अत्यंत थोर राष्ट्रपुरुषांची जीवने आणि ऐतिहासिक प्रसंग-आपल्या थोर ऋषीमुनींच्या महान परंपरेचा अभिमान विद्यार्थ्यात रुजवला पाहिजे. आज पाश्चात्त्य जगत हळूहळू 'निखळ जडवादापासून अध्यात्म विचाराकडे वळत आहे' पण आपण मात्र राष्ट्रभक्तीच्या भक्कम आधाराविना उच्च व श्रेष्ठ जीवनापासून केवळ जडवादी जीवनाच्या दिशेने घसरत आहोत, अशी खंत गुरुजी व्यक्त करीत असत. आपल्या पाठ्यक्रमातून संस्कृत भाषेची दारुण उपेक्षा होते आहे. संस्कृत ही मृत भाषा नसून जिवंत भाषा आहे हे सत्य ध्यानात घेतले पाहिजे.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# करकंबकरांवर लालपरी रुसलेलीच

## लांब पल्याच्या बसेस जातात बाहेरूनच; विद्यार्थी, महिला, वृद्ध, प्रवासी व रुग्णांची होतेय गैरसोय

**तभा वृत्तसेवा । राजेंद्र करपे**
**करकंब, दि. २० मार्च-**

करकंब हे गाव पंढरपूर तालुक्यामध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने एक नंबरचे गाव असल्याने येथील बाजारपेठही मोठी आहे.परिसरातील गावातील नागरिकांचा करकंब गावाशी मोठ्या प्रमाणात संपर्क असतो. शाळा, महाविद्यालये, पोलीस स्टेशन, दवाखाने, पाटबंधारे, वीज वितरण कार्यालय, मोठी बाजारपेठ, बँका, पतसंस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये व इतरही अनेक कारणांनी करकंब येथे प्रवाशांची नेहमीच वर्दळ असते.

या मार्गावरून एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही मोठी आहे.मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व नागरिक या मार्गावरून प्रवास करत असतात. पंढरपूर ते टेंभुर्णी,पुणे,अहमदनगर,नाशिक व इतर ठिकाणी जाणाऱ्या काही एसटीच्या बसेस करकंब एसटी बस स्थानकावर न येता गावाच्या बाहेरूनच जात असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना उन, वारा, पाउस, अंधार असला तरी करकंब बस स्थानकापासून पायीच एक ते दीड किलोमीटर अंतरावरती असणाऱ्या महादेव चौक, नेमतवाडी चौक, जळोली चौक इत्यादी ठिकाणी जाऊन एसटी बसने पुढील प्रवास करावा लागत आहे.



> करकंब बसस्थानकावरून प्रवास करणाऱ्या संबंधित प्रवाशांकडून या मार्गावरील एसटी बसेस करकंब गावातील बसस्थानकमार्गे घेऊन जाण्याबद्दल अर्ज आल्यास संबंधित अर्ज वरिष्ठांकडे पाठवून त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे योग्य ती कारवाई करून याविषयी अंमलबजावणी करण्यात येईल.
>
> **- योगेश लिंगायत**
> **वरिष्ठ आगार व्यवस्थापक**
> **पंढरपूर आगार**

एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय दूर व्हावी म्हणून या अगोदरही करकंबमधील विविध राजकीय, समाजसेवी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याकडून या एसटी बसेस करकंब गावातूनच जाण्यासाठी विनंती अर्ज, आंदोलने करून याबाबत वारंवार मागण्या करण्यात आल्या होत्या.विनंती अर्ज व आंदोलने केल्यानंतर, पंढरपूर आगार प्रमुखांनी सूचना केल्यानंतर संबंधित एसटी चालक व वाहक काही ठराविक काळच या एसटी बसेस करकंब एसटी बसस्थानकमार्गे घेऊन जातात. कालांतराने प्रवाशांना विस्मरण झालेकी या बसेस गावात न येता गावाच्या बाहेरूनच जातात.

### चालक वाहक सूचना

वास्तविक पाहता पंढरपूर बस स्थानकावरील फलाट क्रमांक एकवरती पंढरपूर आगार व्यवस्थापक यांचे आदेशानुसार पंढरपूर व इतर आगारातील सर्व चालक, वाहक यांना सर्व लांब पल्ला, मध्यम पल्ला व शटल सेवा या सर्व फेऱ्या करकंब गावातूनच आत बाहेर करून प्रवाशांची चढ उतार करण्याच्या सूचना तसेच या निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा देणारा माहिती फलकही लावण्यात आलेला होता. परंतु या आदेशाची अंमलबजावणी संबंधित चालक व वाहक करत नसल्याचे दिसून येते.

### करकंब-मोडलिंब एसटी बस सेवा

करकंब, तुळशी, अरणमार्गे मोडलिंब अशा प्रकारे एसटी बस सेवा सुरू केल्यास या परिसरातील विद्यार्थी, भाविक,शेतकरी,व्यापारीवर्ग यांची सोय होईल.यामुळे महाराष्ट्रातील वारकरी भक्तांचे श्रद्धास्थान श्री. पांडुरंग हे पंढरपूर येथे आहे तर आरण येथे श्री. संत सावता माळी यांची संजीवनी समाधी आहे. त्यामुळे या दोन्ही तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या भाविकांची सोय होऊन त्यांचा वेळ व खर्चामध्ये बचत होण्यास मदतच होणार आहे. श्रीसंत एकनाथ महाराज व श्रीसंत निवृत्ती महाराज पालखी मार्ग हा प्राजिमा १३३ मधून चांगल्या प्रतीचा बायपास करकंब बाहेरून घेतल्याने एसटी बस सेवा सुरू करण्यास कोणतीच अडचण नसल्याने लवकरात लवकर ही एसटी बस सेवा चालू करावी, अशी मागणी प्रवासी वर्गांकडून करण्यात येत आहे.

### वाहतूक नियंत्रण कक्ष सुरू करण्यात यावा

करकंब बस स्थानक येथे वाहतूक नियंत्रण कक्ष सुरू करण्यात यावा त्यामुळे संबंधित एसटी बस चालक व वाहक यांच्यावर नियंत्रण ठेवून या मार्गे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची होणारी गैरसोय दूर होण्यास मदत होईल. एसटी प्रवाशांच्या इतरही काही मागण्या, सूचना, अडचणी, गैरसोय याबद्दल विनंतीअर्ज यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवण्यास मदत होणार आहे. त्या अनुषंगाने करकंब बस स्थानक येथे वाहतूक नियंत्रण कक्ष सुरू करण्यात यावा.

### पंढरपूर ते कुर्डूवाडी एसटी बस सेवा.

श्रीसंत एकनाथ महाराज व श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज हा रुंद व चांगल्या प्रतीचा पालखीमार्ग झाल्याने पंढरपूर ते करकंब, तुळशी, अरण, कुर्मदास, लऊळमार्गे कुर्डूवाडी एसटी बस चालू करण्यात यावी. ही बससेवा सुरू झाल्यास सदर मार्गावरील विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, प्रवासी यांची होणारी गैरसोय दूर होणार आहे. ही बस सेवा सुरू करण्याबाबत करकंब व तुळशी येथील प्रवासी प्रयत्नशील आहेत.

यापुढे तरी पंढरपूर आगार प्रमुखांनी या मागणीचा गांभीर्याने विचार करून संबंधित एसटी बस चालक व वाहकांना या बसेस करकंब बस स्थानकमार्गे घेऊन जाण्याच्या सूचना द्याव्यात व विद्यार्थी, महिला, रुग्ण, वृद्ध, व प्रवासी यांची होणारी गैरसोय टाळावी. या मागणीचा विचार न झाल्यास आगार प्रमुख रा.प.महामंडळ पंढरपूर यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा करकंब ग्रामस्थांनी दिला आहे.

करकंब येथील प्रवाशांना करमाळा, नगर, नाशिक, बार्शी व इतर ठिकाणी जाण्या-येण्यासाठी या एसटी बसेसने कधी पहाटे सहाच्या दरम्यान तर कधी रात्री दहाच्या दरम्यान प्रवास करावा लागतो.सकाळी सहाच्या किंवा रात्री दहाच्या दरम्यान काही एसटी बसेस करकंब बसस्थानकमार्गे न आल्याने त्यांना एक ते दीड किलोमीटर अंतरावर असणाऱ्या महादेव चौक, नेमतवाडी चौक, जळोली चौक येथे जाता, येता पायी चालत जाऊनच पुढील प्रवास करावा लागत आहे.

---

## सावरकर, भाई राऊळ चौकात हायमास्ट बसवावेत

### ग्राहक पंचायतीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० मार्च -**

वीर सावरकर चौक व आमदार भाई राऊळ चौकात हायमास्ट लाईट बसविण्याची मागणी अ. भा. ग्राहक पंचायतीने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

शहरातील विविध चौकात हायमास्ट लाईट बसविले आहेत मात्र अत्यंत रहदारीच्या वीर सावरकर चौकात व तुळशी वृंदावन, यमाई तलाव ट्रॅक,रेल्वे स्टेशन, गणेशनगर, लक्ष्मीटाकळीकडे जाणाऱ्या तसेच तालुका पोलीस स्टेशन, तहसील,पंचायत समिती इ. कार्यालयाकडे जाणाऱ्या आमदार भाई राऊळ चौकात लख्ख प्रकाशाची गरज असताना अद्याप तेथे हायमास्ट लाईट बसविलेले नाहीत. त्यामुळे अत्यंत गर्दीच्या ठिकाणी पुरेसा उजेड नाही ही वस्तुस्थिती आहे. तेथील मोठ्या वाहतुकीची परिस्थिती लक्षात



घेऊन तेथे प्राधान्याने हायमास्ट लाईट बसविण्याची गरज आहे. वाहनधारक, पादचारी यांना जीव मुठीत धरून चौक ओलांडवे लागतात. त्यामुळे अपघातानंतर व्यवस्था करण्यापेक्षा अगोदरच काळजी घेतली जावी अशी अपेक्षा सुभाष सरदेशमुख, विनोद भरते, दीपक इरकल, सुहास निकते, अण्णा ऐतवाडकर, संतोष उपाध्ये, विनय उपाध्ये, महेश भोसले, नंदकुमार देशपांडे, प्रा. धनंजय पंधे, आझाद अल्लापूरकर, सागर शिंदे, संजय खंडेलवाल, सतिश निपाणकर, अंकुश वाघमारे, शाम तापडिया, इंद्रजित फडे यांनी व्यक्त केली आहे.

---

## बेसुमार वाळू उपशाच्या 'त्या' तक्रारीची घेतली दखल

### जिल्हा प्रशासनाकडून चौकशीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २० मार्च-**

बठाण येथील भीमा नदी पात्रातून होणारा बेसुमार वाळू उपसा भविष्यात अनेक योजनावर जल संकट निर्माण करणारा ठरवू शकतो. याबाबतच्या तक्रारीनंतर जिल्हा महसूल प्रशासनावतीने उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी मंगळवेढा प्रांताधिकारी यांना चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

बठाण येथील भिमा नदी पात्रातील गाळमिश्रीत वाळू उपसा करण्यास टेंडर झाले असून हे सांगली जिल्ह्यातील एका व्यक्तीने घेतले आहे. गौण खनिजचे सर्व नियम धाब्यावर बसवून रात्रंदिवस वाळू उपसा सुरू असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. येथे कुठलाही गाळ नसताना भरमसाठ वाळू उपसा होत असल्याने भविष्यात नदीचे पात्र कोरडे पडून पाण्याचा साठा नष्ट होणार असल्याने ठेका रद्द करण्याची मागणी आहे. मंगळवेढा तहसील कार्यालयातील गौण खनिज विभागात कार्यरत असलेले आनंद गायकवाड यांनी बठाण येथील वाळू उपशाबाबत अधिकृत माहिती देण्यास मागील चार दिवसापासून प्रसार माध्यमांना टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी केली आहे. ही माहिती प्रांत अधिकारी बी. आर. माळी यांच्याकडे प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीनी केल्यानंतर माहिती नायब तहसीलदार शुभांगी जाधव यांनी उपलब्ध करून दिली.

> तहसिलदार यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश नुकतेच देण्यात आले असून अहवाल प्राप्त होताच वरिष्ठांना सादर केला जाईल. मी एक जबाबदार अधिकारी म्हणून वाळूच्या स्पॉटला दैनंदिन भेट देवून मोजमाप व पाहणी कटाक्षपणे करत असतो.
>
> **- बी.आर.माळी, प्रांत अधिकारी, मंगळवेढा**

---

## महिलांच्या नेतृत्वाने ग्रामविकास शक्य : हभप शिवलीला पाटील

### चपळगांव येथे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० मार्च-**

कुटुंबाच्या जडणघडणीत महिलांची भूमिका मोलाची ठरते. प्रामाणिक, कर्तृत्वान, कष्टाळू आणि हातोटी बाळगणारी महिला आपल्या कुटुंबाचा निश्चितच उध्दार करते. प्रत्येक कुटुंबातील महिला अशी आदर्श बनावी.आणि अशा महिला निश्चितच ग्रामविकास साधु शकतात असे प्रतिपादन किर्तनकार शिवलीला पाटील यांनी व्यक्त केले.

चपळगाव व बावकरवाडी ग्रामपंचायतीकडुन महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण, गावातील पोलिस लेकींचा सन्मान आयोजित करण्यात आला होता. याच कार्यक्रमात आयोजित किर्तन सोहळ्यात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरती रविकांत पाटील होत्या. तर व्यासपीठावर रोहिणी उमेश पाटील, यशोदा बसवराज बाणेगांव, माजी जि.प.सदस्या भाग्यश्री चव्हाण, सरपंच वर्षा भंडारकवठे, उपसरपंच सुवर्णा कोळी,वन अधिकारी श्रध्दा नाईकवाडी, ग्रा.प. सदस्या धनश्री वाले, रेश्मा तांबोळी, वंदना कांबळे, गौराबाई अचलेरे, गंगाबाई वाले, रेणुका जाधव, चित्रकला कांबळे, शोभा गजधाने, वर्षा सोनार आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिद्धाराम भंडारकवठे, गणपती कोळी, धर्मेंद्र दुलंगे, पांडुरंग चव्हाण, परमेश्वर वाले, पोलिस पाटील विवेकानंद हिरेमठ, तंटामुक्त अध्यक्ष कलप्पा बडुरे, यमुनाबाई गजधाने, उमेश सोनार, विष्णूवर्धन कांबळे, अमोल गजधाने, रविकांत कोरे, आकाश बिराजदार, मिनाज पटेल यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शंभुलिंग अकतनाळ यांनी तर आभार ग्रामसेवक सोमलिंग कणगी यांनी मानले.



> **पोरींनो सावध व्हा...शेतकरी पोरासोबत लग्न करा**
>
> आजकाल सोयरीकीचा विषय अत्यंत गंभीर होत चालला आहे. मुलींच्या मुलाबद्दल अपेक्षा वाढत चालले आहेत. चांगला दिसणारा व पैसेवान मुलगा पसंत करणाऱ्या मुलींना भविष्यात अडचणी निर्माण होतात. परंतु शेतकरी असणारा मुलगा जो कष्ट करतो व प्रामाणिक असतो त्याला मुली नाकारतात ही बाब गंभीर असून यावर मुलींनी निश्चितपणे विचार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

---

## महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण द्यावे : डॉ. पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० मार्च-**

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्य विकसित करण्यासाठी व्यवसायाभिमुख शिक्षण देण्याची गरज आहे. असे प्रतिपादन न्यू कॉलेज कोल्हापूर येथील प्राचार्य डॉ वसंतराव पाटील यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, संपदा पाटील उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, बहुसंख्य विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असते म्हणून त्यांच्यासाठी महाविद्यालयाने विविध कोर्सेस सुरू केले पाहिजेत. विद्यार्थ्यांसाठी कन्स्ट्रक्शन, प्लंबिंग, सेंटरिंग, इलेक्ट्रिकल व कृषी तंत्रज्ञान तर मुलींसाठी ब्युटी पार्लर, फॅशन डिझाईन व बेकरी प्रॉडक्ट इत्यादी कोर्सेस सुरू करून त्यांना सक्षम केले पाहिजे त्यामुळे रोजगार उपलब्ध होऊन देशाचे दरडोई उत्पन्न वाढणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी प्रयत्न केले पाहिजेत. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर. लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शीतल झिंगाडे-भस्मे यांनी केले आभार प्रा. राजशेखर पवार यांनी मानले.

---

# दहिगाव उपसा सिंचन योजनेचे उन्हाळी आवर्तन सुरू

## उन्हाळी आवर्तनातून चालू पिकांची जोपासणार : सरपंच पृथ्वीराज पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २० मार्च-**

करमाळा तालुक्यातील दहिगाव येथील पंप हाऊस एक मध्ये आज उन्हाळी आवर्तनासाठी जेऊरचे सरपंच तथा आमदारपुत्र पृथ्वीराज पाटील यांच्या हस्ते कळ दाबून पंप सुरु करण्यात आले. यावेळी पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता आवटे, शाखा अभियंता सौंदणे, माजी पंचायत समिती सदस्य सुनिल तळेकर, सरपंच विकास गलांडे, सरपंच संजय गलांडे, जि.प. सदस्य बिभीषण आवटे, पं प सदस्य गणेश चौधरी, माजी सरपंच जोतीराम नरुटे, सोसायटी माजी चेअरमन सुरेश नरुटे, राहुल गोडगे, उपसरपंच अजित नाईकनवरे, बिभीषण पवार, माजी सरपंच मारुती पवार, भीमराव घाडगे-पाटील, विक्रम पवार आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना पृथ्वीराज पाटील म्हणाले की, रब्बी आवर्तन वेळेवर दिल्याने पूर्व भागातील शेतातील गहु, हरभरा, उडीद, कांदा यासह केळी सारख्या नगदी पिकांना जीवदान मिळाले. आ. नारायण पाटील यांनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या खंबीर भुमिकेमुळेच आज या महिनाभरात कुकडी, दहिगाव उपसा सिंचन योजना, मांगी मध्यम प्रकल्प, भीमा सीना बोगदा व सीना माढा उपसा सिंचन योजनेचे पाणी शेतकऱ्यांना मिळाले. आता उन्हाळी आवर्तनात सुध्दा पूर्व भागातील चारीच्या तांत्रिक अडचणी नसलेल्या सर्व गावांना पाणी दिले जाणार आहे. शिवाय नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई तसेच गुरांच्या चारा टंचाईच्या बाबतीतही या योजनेतुन शक्य तेथे पाणी द्यावे अशी सुचनाही आमदार नारायण आबा पाटील यांनी संबंधित विभागास दिली असल्याचे पृथ्वीराज पाटील यांनी सांगितले.उपस्थितांचे आभार शाखा अभियंता घोडेस्वार यांनी मानले. उपअभियंता राजगुरू यांच्या देखरेखीखाली व त्यांनी आखलेल्या नियोजनानुसार हे आवर्तन चालू झाले आहे.





> दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या रब्बी आवर्तनातुन तालुक्यातील शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचे पिक उत्पादन घेता आले, उन्हाळी आवर्तनातुन चालू पिकांची जोपासना होणार आहे.आजपासून सुरू होणाऱ्या दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या उन्हाळी आवर्तनाने पिकांना जीवदान मिळेल.
>
> **- पृथ्वीराज पाटील, सरपंच,जेऊर**

---

## संक्षिप्त वृत्त



### निसर्गाच्या अन्नसाखळीत चिमण्यांचे योगदान महत्त्वाचे : अजय टोपे

**बार्शी, दि. २० मार्च-**

पृथ्वीवरील निसर्ग साखळीत सर्वच प्राण्यांचे महत्त्वाचे स्थान असून अतिशय छोटा असणाऱ्या चिमणी या पक्षाचे निसर्ग साखळीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, अशी माहिती लोकसेवा विद्यालयातील शिक्षक श्री. अजय टोपे यांनी दिली. विद्यालयात आंतरराष्ट्रीय चिमणी दिनाच्या निमित्ताने ते बोलत होते. आगळगाव येथील लोकसेवा विद्यालय प्रशालेत २० मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय चिमणी दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चिमण्यासाठी टाकाऊपासून टिकाऊ या उपक्रमांतर्गत रिकाम्या बाटल्यापासून चिमण्यांना पाणी पिण्याचे साहित्य आणून त्यामध्ये पाणी ठेवून प्रशालेतील झाडांना बांधण्यात आले. यावेळी ए. एस. टोपे यांनी आंतरराष्ट्रीय चिमणी दिनाची संकल्पना आणि चिमणीचे पर्यावरण साखळीतील महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रशालेतील सचिन उकिरडे, एम.पी. नाईकनवरे, पी. एम. शिंदे, श्रीमती एस.डी. मोरे, एन.बी. कोळेकर, ऋतुजा गरड, एस.सी.बचुटे, एस. एम. अवतार, चंद्रकांत दोडमणी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन एस. एम. मिरगणे यांनी केले.



### स्वच्छ प्रशासकीय अधिकारी म्हणून पोपटराव पाटील यांचा सत्कार

**अणदूर, दि. २० मार्च-**

महाराष्ट्र पोलीस टाईम्स आणि साप्ताहिक धनगर शक्ती न्यूजचा ४ था वर्धापन दिन व महाराष्ट्र पोलीस टाईम्सच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन धाराशिव येथे करण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवराचा त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. धाराशिव येथील महाराष्ट्र पोलीस टाइम्सचे मुख्य संपादक उमेश काळे यांच्या हस्ते स्वच्छ प्रशासकीय अधिकारी म्हणून पोपटराव पाटील आरटीओ (चिवरी) यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पोलीस टाइम्स मुख्य संपादक उमेश काळे हे होते. प्रमुख पाहुणे धाराशिव उपविभागीय पोलीस ठाण्यात स्वप्निल राठोड यांच्या हस्ते संपर्क कार्यालयाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले यावेळी स्वप्निल राठोड, शहर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक शकील शेख, बेंबळी पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश पाटील उपस्थित होते. सरकारी वकील अमोल सिद्ध कोरे, कृषीभूषण दीपक घोडके, पत्रकार राजेंद्र स्वामी, ग्रामसेवक नेताजी दबडे, अनिल हजारे कळंब तालुका, याचाही पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सरकारी कामगार कल्याण अधिकारी धाराशिव सुधाकर कोनाळे यांनाही सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन प्रदीप मगर यांनी केले. प्रास्ताविक आर.एस. गायकवाड यांनी केले.तर आभार डॉ. झाकिर शेख यांनी मानले.



### महिलांनी मानसिक व शारीरिक सक्षमतेचा विकास करावा : डॉ. कदम

**अकलूज, दि. २० मार्च-**

महिलांनी मानसिक व शारीरिक सक्षमता आणि चांगल्या गुणांचा विकास करावा असे विचार डॉक्टर अंजली कदम यांनी व्यक्त केले. शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती व IQC च्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. अंजली कदम (स्त्रीरोग तज्ञ) यांचे महिलांचे आरोग्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. आपल्या मार्गदर्शन पर भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षम राहून आपल्या मधील चांगल्या गुणांचा विकास करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना निर्भय व सक्षम होण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमासाठी डॉ. एस. एस. देवकर, डॉ. एस. जी. बनसोडे , डॉ. ए. एस. रेळेकर उपस्थित होते. प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. डी. आर. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एस. एस. पाटील तर आभार डॉ. एस. एम. सातपुते यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रबंधक बामणे व कार्यकालिन अधीक्षक मालुसरे यांचे सहकार्य लाभले.



### पै. अजय भुसनर यांचा शिवसेनेकडून सत्कार

**नातेपुते, दि. २० मार्च-**

अकलूज येथे जनसेवा संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र केसरी निवड चाचणीत ६१ किलो वजन गटातून पै. अजय भुसनर (रा. जांबुड) यांची निवड झाल्याबद्दल शिवसेना माळशिरस तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वस्ताद भिमराव भुसनर, महादेव तुपसौंदर, सुनील साठे, महेंद्र साठे, निखिल पलंगे, भैय्या लांडगे, महेश पवार, रणजित गायकवाड, महादेव जगताप उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माळशिरस येथे एकनाथ षष्ठी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २० मार्च-**

माळशिरस येथील श्री रामदेव श्री हनुमान देव मंदिरात एकनाथ षष्ठीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हभप गलांडे महाराज यांनी कीर्तन सेवा बजावली.

एकनाथ षष्ठी निमित्त मंदिरात सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत हभप गलांडे महाराज यांचे कीर्तन झाले या कीर्तनात त्यांनी एकनाथ महाराज यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. त्यानंतर दुपारी बारा वाजता एकनाथ महाराजांच्या प्रतिमेवर



फुले टाकून एकनाथ षष्ठी साजरी करण्यात आली यावेळी मंदिरात कार्यक्रमासाठी भाविकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमानंतर ॲड. मिलिंद कुलकर्णी यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### गादेगावच्या मोठेगावकर पब्लिक स्कूलमध्ये वृक्षारोपण

**पंढरपूर, दि. २० मार्च -**

रंगपंचमीनिमित्त सोलापूर सोशल फाउंडेशन व कंडरेज फिटनेस हब यांच्या वतीने गादेगाव येथील प्रा.शिवराज मोटेगावकर पब्लिक स्कूल येथे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लावून वृक्षाबरोबर रंगपंचमी साजरी करण्याचा एक अनोखा उपक्रम कंडरेज उद्योग समूहाचे अजितदादा कंडरे यांनी राबविला. कार्यक्रमास सोलापूर सोशल फाउंडेशनचे प्रमुख विजय पाटील उपस्थित होते. दरवर्षी झाडे लावून पर्यावरण संगोपनाचे काम श्री. कंडरे यांच्याकडून सुरू आहे. सांगोला येथील येलमार मंगेवाडी येथे चार एकर जागेवर वृक्षारोपण केले आहे. झाडांचे संगोपन करण्याची पूर्ण जबाबदारी घेणार असल्याचे आश्वासन संस्थेचे अध्यक्ष गणपत मोरे यांनी दिले. यावेळी सरपंच सीमा बागल, उद्योजक गणेश पाटील, कायदेतज्ञ विजयकुमार जाधव, आबासाहेब बाबर, राजेंद्र बोबडे, गणेश स्वामी, वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीधर यलमार, सोनकेचे उपसरपंच बाबासाहेब हाके, सतीश बागल, अनिल बागल, बाजीराव बागल, वाल्मीक कोळी, उद्धव बागल, गणेश फाटे, मोहन झांबरे, विजय पाटील, केराप्पा चव्हाण, बालाजी देशमुख, महेश सावंत, अजय मोरे उपस्थित होते.



### ग्राहकांच्या हक्कासह सायबर फसवणूक सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नातेपुते, दि. २० मार्च -**

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त बारामती तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायततर्फे विद्या प्रतिष्ठान इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये ग्राहकांचे हक्क, अधिकार, सायबर फसवणूक यबाबत विद्यार्थ्यांना ग्राहक संरक्षण परिषद सदस्य ॲड. तुषार झेंडे पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बारामती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार गणेश शिंदे, प्राचार्य डॉ. एस बी. लांडे, तालुका पुरवठा अधिकारी श्रीमती तितिक्षा बारापत्रे, संजीव बोराटे, सतीश खंडाळे, मंजुश्री तावरे, महेश पवार, युवराज इंदलकर, नानासाहेब तावरे, बाबासाहेब शिंदे, चेतन मोहिते, धनंजय तावरे, नागेश देशमाने, दिलावर तांबोळी, प्रमोद जाधव, डॉ. पी. आर. चित्रगार, डॉ. हाफिज शेख, शशांक बिरादार, पी.एम.पाटील, संतोष करे, के.एम.जाधव, आर. एच. अंबोले आदीसह विद्यार्थी उपस्थित होते. नीरज सातपुते व ईशान शेवते यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी.आर.चित्रगार, डॉ. हाफिज शेख आणि शशांक बिरादार यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार झाला. संजीव बोराटे यांनी आभार मानले.



### रंगपंचमीनिमित्त बार्शीत हास्यरंग कार्यक्रम

**बार्शी, दि. २० मार्च-**

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा बार्शी यांचेवतीने होळी रंगपंचमीनिमित्ताने सार्वजनिक वाचनालयाचे सभागृहात हास्यरंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय आझाद कामगार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व साहित्यिक प्राचार्य चंद्रहान्स गंभीर हे होते. प्रा. अशोक सावळे व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. जुगल बापू तिवाडी हे पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा बार्शीचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामधून दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या साहित्यिक कार्याचा आढावा सादर केला व हास्यरंग कार्यक्रमचा उद्देश स्पष्ट केला. या कार्यकमामुळे सर्वांना मनसोक्त हसण्याचा आनंद मिळावा, दैनंदिन कामाच्या व्यापामधून थोडेसे मोकळे चाकले व्हावे, तणाव मुक्त व्हावे, एकत्रित येऊन वेगळेपणा अनुभवावा गंभीर सर यांची ओळख शाखेचे कोषाध्यक्ष बी. आर. देशमुख यांनी करुन दिली. यामध्ये कवयित्री शुभांगी काळे, कवी आर. डी. लिंबकर, प्रकाश गव्हाणे, कवी सचिन उकिरडे तसेच लेखक आबासाहेब घावटे, प्रकाश महामुनी, प्रदीप कांदे, स्वप्नील तुपे, सुनील फल्ले, सुभाष पाटील, हेमंत मस्के प्रा. अशोक सावळे, जुगल बापू तिवाडी, शब्द पल्लवीकार दिलीप कल्याणी, प्रा. बी. आर. देशमुख यांनी सहभाग घेतला. अध्यक्षीय भाषणामधून प्राचार्य गंभीर यांनी खळाळून सोडणारे विनोदी किस्से सांगितले. सर्वांचे कौतुक केले तसेच जीवनामधील विनोदाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे संचलन कवी किरण विभुते यांनी केले. आभार दिलीप कल्याणी यांनी मानले. कार्यक्रम यशवी करण्यासाठी गिरीष सोनार, प्रा. कल्याण घळके, प्रा. डॉ. रविराज फुरडे, सिद्धेश्वर धुमाळ, प्रकाश महामुनी, प्रकाश गव्हाणे, आबासाहेब घावटे, किरण विभुते व शाखाध्यक्ष निपाणीकर यांनी परिश्रम घेतले.

## जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर, संत चोखामेळा स्मारक उभारणार

**● ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे : जागा उपलब्धतेसाठी समिती गठित करणार**
**● आ. आवताडे, आ. देशमुख, आ. पाटील यांचा चर्चेत सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० मार्च -**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा ही संतांची भूमी आहे. या भूमीत जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा यांच्या नियोजित स्मारकासाठी जागा निश्चितीनंतर स्मारक उभारणीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच स्मारक उभारणी हा केंद्रबिंदू म्हणून स्मारकाच्या जागा निश्चितीसाठी नव्याने समिती गठित केली जाईल, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तरावेळी सांगितले.

महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा यांच्या स्मारकाबाबत सदस्य समाधान आवताडे यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य अभिजीत पाटील व विजय देशमुख यांनीही सहभाग घेतला. मंत्री





गोरे यांनी सांगितले, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी यापूर्वी तत्कालीन पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती मात्र सध्या ही समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे नव्याने समिती गठीत केली जाईल.महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी कृषी विभागाची जागा प्रस्तावित होती, मात्र ती नाकारल्यानंतर कृषि तलावाच्या बाजूची जागा स्मारकासाठी विचाराधीन आहे. ही जागा देण्याच्या प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले. मंगळवेढा येथे संत चोखामेळा यांच्या स्मारकासाठी ही जागा निश्चित उपलब्ध करून देण्याबाबत मंगळवेढा नगरपरिषदेला सूचित केले जाईल. मंगळवेढा येथे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा स्मारकासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही ते म्हणाले.

आ. आवताडे यांचे मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत, मंत्री जयकुमार गोरे यांनी येत्या महिन्याभरात दोन्ही स्मारकासाठी जागा निश्चिती करून निधी मंजूर करणार असल्याचे स्पष्ट केले. संबंधित लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांच्या सहसंयुक्त बैठक घेऊन या स्मारकाचा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.



## सांगोल्यात जागतिक चिमणी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० मार्च-**

सांगोल्यात जागतिक चिमणी दिन सांगोला महाविद्यालय येथे प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला.

यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी विद्यार्थी आणि सर्व नागरिकांनी पक्षी संवर्धनाचे कार्य केले पाहिजे असे मत व्यक्त केले. रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ. प्रकाश बनसोडे यांनी आपले आरोग्य निरोगी आणि आरामदायी करायचे असेल तर पर्यावरणाचे आणि पक्षी संवर्धनाचे कार्य सर्वांनी हाती घेतले पाहिजे असे सांगितले. प्रा. डॉ. विधीन कांबळे यांनी परिसरातील दुर्लक्षित पक्षी या विषयावरती सादरीकरण करून विद्यार्थी व उपस्थितांना माहिती करून दिली. अध्यक्षीय भाषणात प्र. प्राचार्य सुरेश भोसले यांनी पक्ष्यांची घरे बांधण्याची कला ही स्थापत्यशास्त्राला लाजवण्यासारखी असते असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा.डॉ.विजय यादव, प्रा.अशांक भोसले, प्रा. सीमा बिचुकले, प्रयोगशाळा परिचर प्रदीप आसबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.प्रसाद लोखंडे यांनी तर प्रा. डॉ. विजय गाडेकर यांनी आभार मानले.

## हत्ती तलावाच्या संगीत कारंजासाठी पाच कोटींचा निधी झाला मंजूर

शहराच्या सौंदर्यात पडणार अधिक भर

### आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रयत्न यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि २० मार्च-**

येथील श्री स्वामी समर्थ मंदिराजवळील हत्ती तलावात विद्युत रोषणाईयुक्त संगीत कारंजा बसवण्यासाठी पाच कोटींचा निधी मंजूर झाला असून यासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. लवकरच हे काम सुरू होऊन हत्ती तलावासह शहराच्या सौंदर्यात वाढ होणार असल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

कारंजा कामासाठी यापूर्वीच १० कोटीचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यातून बांधकामासाठी पाच कोटी निधी मंजूर झाला आहे. तर आता पुढील टप्प्याती काम ासाठीही पाच कोटी मंजूर झाले आहेत. यामुळे अक्कलकोटचे एक पाऊल पुढे पडणार आहे. कोरोनानंतर अक्कलकोटच्या धार्मिक पर्यटनात मोठी वाढ झाली. गेल्या दोन वर्षांपासून शहरात राहण्यासाठी चांगले लॉजिंग, हॉटेल्स, चारही बाजूने जोडणारे राष्ट्रीय महामार्ग झाल्याने



> हत्ती तलावाच्या एकूण १० कोटी रुपयांच्या कामांमुळे अक्कलकोट शहराच्या सौन्दर्यात भर पडणार आहे. देश-विदेशातून येणाऱ्या स्वामी भक्तांची धार्मिकतेबरोबरच विरंगुळा म्हणून करमणूकीची मोठी सोय होणार आहे. शहराच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. येत्या काळात अक्कलकोट शहरासाठी ज्या ज्या गोष्टी करता येतील त्या सर्व कामांसाठी निधी मिळवून दिलेला प्रत्येक शब्द न शब्द पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> **- सचिन कल्याणशेट्टी**
> **आमदार, अक्कलकोट**

भाविकांची संख्या वाढली आहे. त्याचा नेमका लाभ अक्कलकोटच्या व्यापाऱ्यांना आणि पर्यटन वृद्धीसाठी व्हावा याचा विचार करून आमदार कल्याणशेट्टी यांनी संस्थानकालीन ऐतिहासिक हत्ती तलावाचे नूतनीकरण आणि सौंदर्यकरण करण्याचा प्रयत्न सुरू केला. पहिल्या टप्प्यात तिथल्या बांधकामासाठी पाच कोटीचा निधी मिळाला. त्याच अनुषंगाने पुढील काम हत्ती तलावामध्ये कारंजा बसवणेसाठी सुद्धा पाच कोटींच्या निधीच्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. यासाठी एकूण १० कोटींचा निधी प्राप्त झालेला आहे. सदर कारंजाचे वैशिष्ट्य असे की त्यासाठी लागणारे पाणी शुद्धीकरण करून कारंजामध्ये घेतले जाणार आहे. जेणेकरून कारंजा नियमितपणे विनाअडथळा सुरू राहील. सदर कारंजे आकर्षक विद्युत रोषणाई आणि संगीतमय असणार आहेत. यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा नियोजन अधिकारी पवार यांचे सहकार्य लाभल्याचे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले. यामुळे शहरातील नागरिक आणि स्वामी भक्तामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे

## जिजाऊ रथयात्रेत करमाळ्यातून हजारो बांधव जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२० मार्च-**

मराठा सेवा संघाच्या मराठा जोडो अभियानाअंतर्गत निघालेली जिजाऊ रथयात्रा दि.२४ मार्च रोजी सोमवारी कुर्डूवाडीत येत आहे. त्या रथयात्रेच्या स्वागतासाठी करमाळ्यातून हजारो बांधवांनी जाण्याचे जेऊर येथील बैठकीत ठरवण्यात आले.



या रथयात्रेचे कुर्डूवाडीत सोमवार दि. २४ मार्च सायंकाळी साडेपाच वाजता गावदेवी मंदिर, कुर्डूवाडी येथे स्वागत होणार आहे. सायंकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा होणार आहे. हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रथयात्रेच्या स्वागताची जंगी तयारी सुरू असून या सभेला करमाळा तालुक्यातून बहुसंख्य कार्यकर्ते व समाज बांधव कुर्डूवाडी येथे हजर राहणार आहेत.

यावेळी उपस्थित पुणे विभागीय, कार्याध्यक्ष नितीन खटके मराठा सेवा संघ ता. अध्यक्ष सचिन काळे, बाळासाहेब झोळ, ता.अध्यक्ष सुहास पोळ, निलेश पाटील, शहराध्यक्ष अतुल निर्मळ, गणेश कुकडे, संदीप रोडगे, भीमराव लोंढे, सोमनाथ रोकडे, रमाकांत, गटकळ, पांडुरंग घाडगे, आदिनाथ माने, सागर साखरे, नाना पोळ, पिंटू जाधव, सागर बनकर, सागर कोठावळे, अजित उपाध्ये, बाळासाहेब तोरमल,इ उपस्थित होते.सोलापूर जिल्ह्यात ही रथयात्रा तीन दिवस असणार आहे. राज्यभरातील मराठा समाजबांधवांना एकत्रित करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठीच १८ मार्च रोजी शहाजी महाराजांच्या जन्मदिनी वेरुळ येथील भोसले गढी येथून जिजाऊ रथयात्रेचा प्रारंभ झाला. महाराष्ट्र दिनी १ मे रोजी लाल महाल पुणे येथे या रथयात्रेची सांगता होणार आहे. कोल्हापुरातून सांगलीमार्गे २३ मार्च रोजी रविवारी सांगोला येथे रथयात्रेचे आगमन होणार आहे. तेथून ती पंढरपूर येथे मुक्कामी असेल. २४ मार्च रोजी सोमवारी पंढरपूरहून अकलूज टेंभुर्णीमार्गे कुर्डूवाडी येथे येईल आणि तेथेच मुक्कामी असेल. २५ मार्च रोजी मंगळवारी कुर्डूवाडीहून माढा, मोहोळमार्गे सोलापुरात पुणे नाक्यावरील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळ आगमन होईल.

## डॉ. राहुल पालके यांची तालुका समन्वयकपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मार्च-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे डॉ. राहुल भगवान पालके यांची महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यरत असलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी सोलापूर, तालुका बार्शी या विभागासाठी तालुका समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे.



त्यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, उच्च शिक्षण विभाग, सोलापूरचे सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार व जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, डॉ. एस. डी. पवार, प्रा. युवराज सोलापूरे व डॉ. राजशेखर शिंदे यांनी अभिनंदन केले.

## विश्वतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या विवाह स्वागत समारंभास मान्यवरांची हजेरी

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले शुभेच्छा पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० मार्च-**

दिनांक आठ मार्च रोजी अकलूज येथे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे नातू तथा आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांचे चिरंजीव विश्वतेजसिंह मोहिते -पाटील आणि चि.सौ. का. शिवांशिका यांच्या शुभविवाह अकलूज येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात संपन्न झाला.



यानिमित्ताने निमित्ताने हॉटेल सेंट रिजेस मुंबई येथे स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभाशीर्वाद दिले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुभ संदेश पाठविला व वधू-वरांना शुभाशीर्वाद दिले या स्वागत समारंभात खालील मान्यवर उपस्थितीत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मकरंद पाटील, मंत्री शंभूराजे देसाई, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, आमदार छगन भुजबळ, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, मंत्री जयकुमार रावल, माजी मंत्री जयंत पाटील, मंत्री प्रताप सरनाईक, मंत्री अदिती तटकरे, आ. मिलिंद नार्वेकर आ. सचिन आहीर मा. हर्षवर्धन पाटील, आ. आदित्य ठाकरे, आ. रोहित पवार, दिग्दर्शक बोनी कपूर, अभिनेते रितेश देशमुख, अभिनेत्री जेनेलिया देशमुख, खासदार अमोल कोल्हे, खासदार संजय पाटील, खासदर संजय राऊत, आमदार राहुल आवाडे, कृष्णराज महाडीक आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील सौ. नंदिनी देवी मोहिते-पाटील, आमदार रणजीत सिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते पाटील राजसिंह मोहिते-पाटील, उदयसिंह सरनाईक यांनी केले.

विजयसिंह मोहिते-पाटील यांचा विवाह लक्ष भोजनाने गाजला होता. आता त्यांच्या नातवाचा विवाह मान्यवरांच्या उपस्थितीने गाजला आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या चौथ्या पिढीतील हा विवाह सोहळा अत्यंत देखणा झाला आहे.

> **शाश्वत धर्मानुसार विवाह म्हणजे अपूर्णतेकडून पूर्णतेकडे नेणारा प्रसंग असून दांम्पत्य जीवनातील प्रवेशावेळी नवीन दांम्पत्यास हार्दिक शुभेच्छा. या शुभवेळी इच्छा असूनही मला उपस्थित राहता आले नाही. असे गृहमंत्री अमित शहा यांनी संदेश पत्रात म्हटले आहे.**



CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम : २३ मार्चला असाक्षरांची परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

केंद्र पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी २३ मार्च २०२५ रोजी स.१० ते साय. ५ या वेळेत होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाइन नोंदणी केलेल्या प्रत्येक शाळेचे केंद्र असणार आहे.ही परीक्षा ऑफलाइन असून ३ तासांची व १५० गुणांची असेल.त्यामध्ये ५० गुण वाचन, ५० गुण लेखन आणि ५० गुण संख्याज्ञानासाठी असतील.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये परीक्षेसाठी एकूण ११ हजार४३५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. तालुकानिहाय विद्यार्थी भूम(९७१), धाराशिव(१८४०), कळंब(१७४३), लोहारा (१०३५),उमरगा(२०४५), परांडा(७१७), तुळजापूर(१६५४) आणि वाशी(१४३०). ही परीक्षा १५ वर्षापुढील असाक्षर व्यक्तींसाठी घेण्यात येणार असून,त्यातून शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होईल. या परीक्षेस उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा नियमक समिती अध्यक्ष कीर्ती किरण पुजार, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यकारी समिती अध्यक्ष डॉ.मैनाक घोष, शिक्षणाधिकारी (योजना) सुधा साळुंके, शिक्षणाधिकारी (प्राथ.) अशोक पाटील, उपशिक्षणाधिकारी (योजना) संतोष माळी यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### स्पर्धापरीक्षा तयारीसाठी कार्यशाळा संपन्न

**धाराशिव गडपाटी, दि.२० मार्च -**

आर.पी. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात, संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रतापसिंहजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी औषधनिर्माण क्षेत्रातील तसेच इतर स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी कार्यशाळेची प्रस्तावना करत फार्मसी क्षेत्रातील विविध स्पर्धा परीक्षेची माहिती दिली. मुख्य मार्गदर्शक रुपेश चौरे (जीडीसी क्लासेस, नवी दिल्ली व लातूर) यांनी औषधनिर्माण क्षेत्रातील तसेच जागतिक स्पर्धा परीक्षा विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेतील बौद्धिक परीक्षा घेण्यात आली. ज्यात कुमारी माने संजीवनी, कुमारी सानिया कोबरु आणि किशोर भिसे यांनी क्रमांक पटकावले. त्यांना ॠळ क्लासेस कडून मार्गदर्शक पुस्तक संच बक्षीस दिला गेला.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. विद्या माळी, प्रा.रोहिणी निकम आणि महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले.



### हणमंत रसाळ यांचा सत्कार

**लोहारा, दि.२० मार्च -**


लोहारा खुर्द येथील हणमंत ज्ञानेश्वर रसाळ यांनी कर्मचारी निवड आयोगाच्या संयुक्त पदवीस्तर परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून सांख्यिकी अधिकारी वर्ग-२ (मंत्रालय, मुंबई) या पदासाठी निवड मिळवली आहे. या अभिमानास्पद यशानिमित्त शिवसेना ठाकरे गट तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, नगरसेवक अविनाश माळी, अविनाश रसाळ, अजय रसाळ, मंगेश गोरे, अविनाश गोरे, प्रतीक विरोधे, श्रीकांत माळी, व मित्रपरिवार यांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी हणमंत रसाळ यांच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे विशेष कौतुक केले.



### सेवानिवृत्त सैनिकाचा वर्गमित्रांतर्फे सत्कार

**तुळजापूर, दि.२० मार्च -**

येथील सय्यद अलाउद्दीन यांनी तीस वर्ष भारतीय सैन्य दलामध्ये सेवा दिली असून एक फेब्रुवारी रोजी सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्या नंतर तुळजापूर येथे आले असता त्यांचे दहावी १९९० बॅचचे सर्व वर्गमित्रांनी रेस्ट हाऊस येथे त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सय्यद अलाउद्दीन यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पुढील जीवन हे समाजासाठी व मित्रांसाठी भरपूर वेळ देण्याचे आश्वासन दिले हे ऐकून सर्व मित्र भरावून गेले यावेळी शिवाजीराव मोरे, संतोष साळुंखे, फिरोज पठाण, बाळासाहेब जाधव, बंडू बैरागी, दिगंबर हुंडेकरी, संजय केवडकर, दादासाहेब नन्नवरे, नानासाहेब पेंदे, धनंजय मोरे उपस्थित होते



### विद्यार्थ्यांची आयुर्वेदिक रुग्णालयास भेट

**उमरगा, दि.२० मार्च -**

भारत शिक्षण संस्था संचालित तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची उमरगा शहरातील श्री विश्वांश आयुर्वेदिक रुग्णालय व पंचकर्म केंद्र, उमरगा रुग्णालयास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कवलजीत बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या औषधनिर्माण शास्त्र पदविका पहिल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांनी रुग्णालयाची विविध आयुर्वेदिक उपचार व औषधी पद्धतीची माहिती घेतली. यावेळी रुग्णालयाचे डॉ. लक्ष्मण बिराजदार, यांनी विद्यार्थ्यांना माहिती देत असताना, आयुर्वेदिक रुग्णालयामध्ये चालणाऱ्या उपचार पद्धती तसेच त्यावर चालणारी औषधे व तसेच औषधी वनस्पती पासून बनविले जाणारे चूर्ण, भस्म, तेल, वटी, अरिष्ठा, असव, लेह यांना बनवण्याच्या शास्त्रीय पद्धतीची माहिती देण्यात आली. तसेच त्या औषधी कोणत्या आजारावर उपचारासाठी वापरण्यात येतात याची माहिती देण्यात आली. रुग्णालयाची संपूर्ण रुग्णालय फिरून माहिती विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. यावेळी सोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक सुरज भगत व अमित रेडी तसेच महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### ऊसतोड कामगारांसाठी अनुदान योजना

**धाराशिव, दि.२० मार्च -**

ऊसतोडणी व वाहतूक करताना होणाऱ्या अपघातांमुळे ऊसतोड कामगार,वाहतूक कामगार आणि मुकादम यांना मोठे नुकसान सहन करावे लागते.अपघातामुळे मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास कुटुंबाच्या उत्पन्नावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत आर्थिक मदत देण्यासाठी गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन बाबासाहेब अरवत,सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.

# जिल्ह्याच्या शाश्वत औद्योगिक परिवर्तनाला मिळणार गती

## उद्योगमंत्र्यांच्या बैठकीत पाच महत्वपूर्ण निर्णय, रोजगारनिर्मितीच्या दिशेने ठोस पाऊल...मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**



धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला प्रतिसाद देत त्यांनी आज दिनांक १९ मार्च रोजी त्यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक घेतली. बैठकीत तामलवाडी, वडगाव,कौडगाव,वाशी एमआयडीसी सह धाराशिव येथील विमानतळा बाबत पाच महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. जिल्ह्यातील कुशल तरुणांना जिल्ह्यातच हक्काचा रोजगार मिळावा यासाठी आपण घेत असलेल्या प्रयत्नांना उद्योगमंत्र्यांनी पाठबळ दिले आहे. त्यामुळे या चारही एमआयडीसीच्या माध्यमातून मोठ्या रोजगार निर्मितीच्या दिशेने सकारात्मक व ठोस पाऊल पडले असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

देशातील पहिला स्वतंत्र टेक्निकल टेक्स्टाईल पार्क एमआयडीसीच्या माध्यमातून कौडगाव येथे उभारण्यात येणार आहे. यापूर्वीच उद्योगमंत्री सामंत यांनी तशी घोषणा केली आहे. टेक्निकल टेक्स्टाईल या क्षेत्रात काम करणाऱ्या देशातील नामांकित कंपन्यांसोबत उद्योगमंत्री स्वतः बैठक घेणार आहेत. आजघडीला उद्योग विभागाच्या धोरणानुसार ज्या सवलती दिल्या जात आहेत, त्याहून अधिकच्या सवलती धाराशिव जिल्ह्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना देण्याचा महत्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला. तसेच ज्या परदेशातील कंपन्यांकडून आपण टेक्निकल टेक्सटाईल आयात करतो अशा कंपन्या शोधण्यासाठी कन्सल्टंट नेमण्यात आले असून त्यांना कौडगाव येथे उत्पादन करण्यासाठी निमंत्रण देण्याचेही या बैठकीत ठरले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. कौडगाव टेक्निकल टेक्सटाईल पार्कच्या पायाभूत सुविधांसाठी जे टेंडर काढण्यात आले आहे त्याचा आठवड्यात कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे.

सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या तामलावडी येथील गुंतवणुकी बाबत एप्रिल महिन्यात उद्योग मंत्री उदय सामंत स्वतः सोलापूर येथे बैठक घेणार आहेत. या बैठकीत या इंडस्ट्रियल पार्कच्या अनुषंगाने इच्छुक गुंतवणूकदार उद्योजक, सर्व संबंधित विभागाचे अधिकारी व एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी यांची ही बैठक घेण्यात येणार आहे. तामलवाडी एमआयडीसीत गुंतवणूक करण्यासाठी धाराशिव, सोलापूरसह राज्यातील १३० उद्योजकांनी उत्स्फूर्तपणे तयारी दर्शवली आहे. ३६७ एकरावर साकारण्यात येणाऱ्या या नवीन एमआयडीसीमध्ये टेक्सटाईलसाठी ८० तर गारमेंटसाठी ५० उद्योजक गुंतवणूक करण्यास तयार आहेत. या सर्वांसोबत एप्रिल महिन्यात उद्योग मंत्री संवाद साधणार असल्याचे आमदार पाटील म्हणाले.

धाराशिव तालुक्यातील सिद्धेश्वर वडगांव येथील एमआयडीसीत मध्यम,लघु व सूक्ष्म उद्योग अर्थात 'एमएसएमई पार्क' स्थापन करण्याच्या अनुषंगाने या बैठकीत महत्वपूर्ण चर्चा झाली. यात सदर एमआयडीसीचे फायनल ले आउट करून त्याला महिनाभरात मंजुरी देण्याचेही ठरले.

ले-आउटची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वडगावच्या एमआयडीसीत ४६ कोटी रुपयांच्या पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. धाराशिव या जिल्हा मुख्यालयापासून अगदी जवळ असलेल्या सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव एमआयडीसीत ८० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. त्यापैकी १५० एकरचा औद्योगिक वापर करण्यात येणार आहे. यात ७५ एकर जमिनीवर मध्यम,लघु व सूक्ष्म उद्योग (चडचए) पार्क उभारण्यात येणार आहे.आपण केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हा आणि परिसरातील तब्बल ९४ उद्योजकांनी नोंदणी करून वडगाव एमआयडीसीत गुंतवणूक करण्यासाठी उत्स्फूर्तपणे तयारी दर्शविली असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील सांगितले आहे.

वाशी औद्योगिक वसाहतीत फायर वर्क्स पार्क व लॉजिस्टिक पार्क करण्याच्या अनुषंगाने लवकरच स्वारस्याची अभिव्यक्ती काढण्याचे ठरले आहे. धाराशिव येथील विमानतळ ९९ वर्षासाठी रिलायन्स कडे दीर्घकालीन लीज वर दिले होते ते आता परत घेण्यात आले आहे.

येत्या १५ दिवसात सदर विमानतळ एमआयडीसी, एमएडीसी किंवा केंद्र सरकारचे नागरी विमान वाहतुक मंत्रायल यांच्यापैकी कोण चालवण्यासाठी घेणार हे ठरणार आहे.त्यानंतर सदर विमानतळाच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्वपूर्ण बैठक ठरली असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.


बैठकीला अपर मुख्य सचिव (विमानचालन), सचिव (उद्योग), मुख्य कार्यकारी अधिकारी, म. औ. वि.म.,सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम,जिल्हाधिकारी, धाराशिव (व्ही. सी.द्वारे) सह सचिव- (उद्योग १४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (३), मऔविम उप विभागीय अधिकारी, कळंब,तहसीलदार, वाशी, प्रादेशिक अधिकारी-मऔविम, लातुर व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## ८ वर्षीय बालकाचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

**रंगपंचमी दिवशी घडलेल्या हृदयद्रावक घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.२० मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील खोताचीवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता दुसरी वर्गातील विद्यार्थी सार्थक सतीश शिंदे वय८ वर्ष याचा शेतातील घराशेजारील शेततळ्यात बुडून बुधवार १९ मार्च रोजी दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ऐन रंगपंचमी दिवशी घडलेल्या या दुर्दैवी घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



सरडेवाडी खोताचीवाडी येथील गट नंबर ४४ मध्ये त्याचे घर असून घराशेजारील गेल्याच आठवड्यात तयार करण्यात आलेल्या शेततळ्यात त्याचा बुडून मृत्यू झाल्याने परिसरातून हळहळ व प्रचंड दु:ख व्यक्त केले जात आहे. पाण्याची पातळी खालावल्याने जनावरांच्या पिण्याची व चाऱ्याची व्यवस्था व्हावी, यासाठी ४५ बाय ४५ चे हे शेततळे तयार करण्यात आले आहे.

अवघ्या आठवड्यात ही दुर्दैवी घटना घडल्याने संपुर्ण गावावर शोककळा पसरली आहे. सार्थक हा शाळेत प्रचंड हुशार व गुणी विद्यार्थी होता त्याच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी, भाऊ,आज्जी आजोबा असा परिवार आहे.

त्याच्यावर बुधवार १९ मार्च रोजी रात्री दहा वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या कुटुंबातील सदस्य यांचा हृदयद्रावक हंबरडा पाहून अंत्यसंस्कारासाठी उपस्थितानाही आपले अश्रू अनावर झाले होते. त्याच्या या आकस्मित निधनाने मंगरुळ व परीसरातून प्रचंड हळहळ व दु:ख व्यक्त केले जात आहे.

### जळकोट येथे एकनाथषष्ठी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२० मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील वेशी नजीकच्या एकनाथ मंदिरात एकनाथषष्ठी मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.

जळकोट येथील मोरे कुटुंबीय वर्षाला एकनाथषष्ठी साजरी करतात. ही परंपरा श्री. कृष्णात मोरे यांनी पुढे अखंडित चालू ठेवली आहे. एकनाथषष्ठीनिमित्त एकनाथ मंदिरात अदल्यादिवशी जळकोट व जळकोटवाडी (नळ)येथील महिला पुरुष भजनी मंडळाने हरी जागराचा कार्यक्रम सादर केला.

## मार्च अखेरच्या वित्तीय व्यवहारांसाठी बँका आणि कोषागारे उशिरापर्यंत सुरु राहणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

वित्तीय वर्ष २०२४-२५ समाप्तीच्या पार्श्वभूमीवर शासकीय आर्थिक व्यवहार सुरळीत पार पडावेत म्हणून जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांना दिनांक ३० व ३१ मार्च २०२५ रोजी कोषागार कार्यालयाचे व्यवहार पूर्ण होईपर्यंत रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार मार्च महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील वित्तीय देवाणघेवाणीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. ३० मार्च रोजी सार्वजनिक सुट्टी (गुढीपाडवा) आणि ३१ मार्च रोजी रमजान ईद असल्याने शासकीय निधीच्या वितरणाची प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी बँका आणि कोषागारे सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे शासकीय रक्कमांचे व्यवहार वेळेत पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका व कोषागारे सुरू राहणार आहेत.

## एआय सेमिनारच्या मास्टर ट्रेनर म्हणून श्री समर्थ कॉम्प्युटर्सच्या संचालिका अनुराधा नाईक यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० मार्च -**



धाराशिव येथे कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आले होते. या सेमिनार मध्ये तुळजापूर येथील मास्टर ट्रेनर म्हणून श्री समर्थ कॉम्प्युटर्सच्या संचालिका अनुराधा नाईक, हाय-इन्फोतेक वाशीचे दीपक निर्मल आणि R-Tech चे रियाज गवंडी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात उद्योगतज्ज्ञ, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच केंद्र समन्वयकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सेमिनारचा उद्देश एआयच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे आणि त्याचा व्यावसायिक व दैनंदिन जीवनातील उपयोग समजावून सांगणे हा होता.

सेमिनारमध्ये मशीन लर्निंग, डीप लर्निंग, स्वयंचलन आणि एआयचे नैतिक परिणाम यावर सखोल चर्चा झाली. त्यांनी एआय शिक्षण, उद्योगातील संधी आणि त्याचा समाजावर होणारा प्रभाव याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. या सेमिनारला उत्तम प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी चघउङ जिल्हा समन्वयक मा. धनंजय जेवळीकर यांनी एआयच्या वाढत्या महत्त्वावर प्रकाश टाकला.

एआयमुळे उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतत अद्ययावत राहून या संधींचा फायदा घ्यावा. भविष्यात असे उपक्रम सातत्याने राबवले जातील जेणेकरून धाराशिवमध्ये एआय शिक्षण आणि संशोधनाला चालना मिळेल. अशी माहिती MKCL जिल्हा समन्वयक मा. धनंजय जेवळीकर यांनी दिली.

## नदीजोड प्रकल्पातुन येणाऱ्या पाण्याचा धाराशिव, लातूर, बीडचा हिस्सा ठरवून पाणी वाटप करा : आ.कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

मराठवाड्याला नदीजोड प्रकल्प करून पाणी देताना धाराशिव, लातूर व बीड जिल्ह्याचा हिस्सा ठरवून द्यावा व तसा प्रकल्प अहवाल आराखडा तयार करावा अशी आग्रही मागणी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात केली.

यावेळी आ. पाटील म्हणाले की, जलसंपदा विभागाद्वारे सध्या मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यात मुख्यमंत्री यांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे, गेल्यावेळी या नदीजोड प्रकल्पातुन मराठवाड्यासाठी १६७ टीएमसी पाणी देणार होते पण आताच्या अर्थसंकल्पात ते पाणी ५४.७० टीएमसी वर आले आहे. मराठवाडा यामध्ये दिसत असला तरी धाराशिव, लातूर व बीड याबाबत पाणी वाटपाचा उल्लेख यात दिसत नसल्याने त्याबाबतची भूमिका स्पष्ट करावी. जायकवाडी धरणात पाणी येणार असून पुढे माजलगाव जलशायात हे पाणी येणं शक्य आहे. तिथून कुंडलिका धरणामध्ये पाणी आणून तांदुळवाडी प्रकल्पात सोडल जाऊ शकते. शेवटी हे पाणी मांजरा व तेरणा धरणात येऊ शकते, असा मुद्दा देखील पाटील यांनी यावेळी मांडला.



ज्यावेळी या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल तयार करायचा तेव्हा या तीनही जिल्ह्याचा त्यात समावेश करण्यात यावा अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. पार गोदावरी प्रकल्पाचा अहवाल करण्यासाठी २०१४ साली सात कोटीची तरतूद केली होती. पण अद्याप तो पूर्ण झाला नाही आता त्यासाठी ५२ कोटींचा खर्च लागणार आहे. पण मूळ मुद्दा हा विकास आराखडा वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनाने कालमर्यादा निश्चित करणे अपेक्षित असल्याचे मत आ. पाटील यांनी व्यक्त केले. हा प्रकल्प अहवाल करताना धाराशिव, बीड लातूर यात समावेश केल्यास तीनही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना याचा फायदा होईल अशी भूमिका पाटील यांनी मांडली.

मांजरा व तेरणा धरणावर कोल्हापूरी बंधारे आहेत पण सध्या त्याची मोठी दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे या बंधाऱ्याचे रूपांतर बॅरेजेस मध्ये करावे अशी मागणी आहे. तसा प्रस्ताव शासनदरबारी प्रलंबित आहे, तो मंजूर करावे अशी मागणी आमदार पाटील यांनी केली आहे.

# उद्योग वाढीसोबतच रोजगार निर्मितीसाठी सुविधा उपलब्ध करुन द्या

## जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे प्रशासनास निर्देश... जिल्हा उद्योग मित्र समिती बैठक...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**



जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.असे जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी सांगितले.

आज १९ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव,जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बडे, व्यवस्थापक एम.डी.सूर्यवंशी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी श्री.खाडे, महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री.आडे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास, तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि औद्योगिक असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण काळे व त्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी सांगितले की,जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उभारल्या जातील. विशेषतः वडगाव सिद्धेश्वर, उमरगा, वाशी, सरमकुंडी, तामलवाडी, डिकसळ आणि कळंब या औद्योगिक क्षेत्रांमध्ये पाणीपुरवठा, वीजपुरवठा,पोलीस चौकी आणि प्रदूषण नियंत्रण यासारख्या सुविधांवर भर दिला जाईल.तसेच फटाके उद्योगासाठी जागा उपलब्ध करून देण्याची तसेच लेदर क्लस्टर आणि सोलर प्रकल्प उभारण्याची मागणी समितीपुढे ठेवण्यात आली.औद्योगिक विकासामुळे जिल्ह्यात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होतील, असेही श्री.पुजार यांनी सांगितले. तसेच,उद्योग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



CMYK

धाराशिव

# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## इन्साफ यात्रेत युवक समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष कृष्णा रोचकरी यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० मार्च -**

महाड चवदार तळे सत्याग्रहाला ९८ वर्षे पूर्ण झाली असल्याने सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन आणि समाजवादी पार्टीच्या वतीने महाड येथील इन्साफ यात्रेत समाजवादी पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष कृष्णा रोचकरी यांनी भव्य संख्येने युवा कार्यकर्त्यांसह सहभाग नोंदविला.

या प्रसंगी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आझमी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी समाजवादी पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तेरखेडा-नांदगाव मार्गे शिर्डी जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था

### संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी डोळ्यावर काळा गॉगल घातल्याने त्यांना रस्ते दिसेनात

**तभा वृत्तसेवा/तालुका प्रतिनिधी**
**वाशी, दि.२० मार्च -**

वाशी तालुक्यातील रस्त्याचे प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून संबंधित विभागाचे अधिकारी डोळ्यावरती काळा गॉगल लावून रस्त्याकडे पाहत आहेत. त्यामुळे रस्त्याची दुरावस्था त्यांना कशी दिसणार. तालुक्यातील महत्त्वाचा समजला जाणारा तेरखेडा-नांदगाव मार्गे शिर्डी जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे.

रस्त्यावरती जागोजागी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा हे समजणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे वाहन चालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. खड्यामुळे मोटरसायकल धारकाचे तर अनेक छोटे-मोठे अपघात या रस्त्यावर सतत सुरू आहेत. शिर्डी साईबाबा दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांसाठी हा महत्वाचा रस्ता आहे. हा रस्ता भूम, जामखेड, अहिल्यानगर मार्गे शिर्डी जोडला जात असल्याने या रस्त्याने वाहनांची प्रचंड वर्दळ असते,तसेच जवळचा मार्ग असल्याने



वेळेची आणि इंधनाची बचत या मार्गाने होते. कर्नाटक आंध्र प्रदेश तसेच तामिळनाडू राज्यातील भाविक जवळचा मार्ग म्हणून भाविक तेरखेडा नांदगाव रस्त्याने प्रवास करतात. परंतु आता रस्ता खराब झाल्याने वाहन चालकांची तसेच प्रवाशांची डोकेदुखी वाढलेली आहे. परिणामी गाड्यांची टायर फुटणे तसेच रस्ता खराब असल्याने लुटमरीच्या घटना देखील रस्त्यावर घडतात. तरी देखील संबंधित विभागाचे या रस्त्याकडे दुर्लक्ष असून किती जणांचे जीव गेल्यानंतर हा रस्ता करणार? संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी डोळ्यावरती काळा गॉगल घातल्यामुळे या रस्त्यावरचे मोठे मोठे पडलेले खड्डे त्यांना कसे दिसणार. अधिकारी आता डोळ्यावरचा चष्मा कधी काढणार आणि हा रस्ता कधी करणार असा सवाल नागरिक विचारत आहेत.

## 'ते'वादग्रस्त स्टेटस ठेवल्याने टायर जाळून रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० मार्च -**

तालुक्यातील नारंगवाडी येथे समाजकटकाने औरंगजेब याचा फोटो स्टेटसवर ठेवल्याने नारंगवाडी येथे तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली होती. या घटनेमुळे शिवप्रेमी व हिंदू संघटना आक्रमक झाले असून उमरगा - लातूर महामार्गावर नारंगवाडी पाटी येथे रस्त्यावर टायर जाळून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

आंदोलकांनी समाजकटकाला तात्काळ अटक करण्याची मागणी केली. यावेळी उमरगा - लातूर महामार्गावरील वाहतूक तब्बल तीन तास ठप्प राहिली. या घटनेमुळे उमरगा शहरांमध्ये तणाव वाढला असून पोलिसांनी घटनास्थळी मोठा बंदोबस्त ठेवला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी सदाशिव शेलार यांच्या नेतृत्वाखाली पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



यावेळी हिंदू संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलिसांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेतले असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सतर्कता बाळगली आहे. यावेळी उमरगा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांनी परिसरात शांतता राखण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त वाढवला असून, नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पोलीस पाटलाचा पती करतोय दोन नंबर धंदेवाल्याकडून हप्ते वसुली

**सलगरा मडडीत पोलीस पाटलामुळे कायदा व सुव्यवस्था मोडकळीस.. गावात स्थानिक नसून कोणतेही कर्तव्य बजावत नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप.. उपविभागीय पोलीस अधीक्षकांकडे ग्रामस्थांची निवेदनातून तक्रार ...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील सलगरा मडडी येथील नागरीकांनी उपविभागीय पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली आहे की, सलगरा मडडी येथील पोलीस पाटील हे गावात राहत नसुन ते कोणतेही कर्तव्य बजावत नाहीत याची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी निवेदनातून केली आहे.

पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, मौजे सलगरा मडडी येथे गाव कामगार पोलीस पाटील म्हणुन श्रीमती पद्मजा उर्फ पदमावती दत्तात्रय खेमकर यांची आपले कार्यालयाकडुन नेमणुक केलेली आहे.

परंतु सन २०१८ पासुन पोलीस पाटील श्रीमती पद्मजा उर्फ पदमावती दत्तात्रय खेमकर हया आपल्या कुटूंबासह अक्कलकोट रोड पाण्याच्या टाकीजवळ सोलापूर येथे कायम स्वरुपी राहण्यास आहेत. गावात १५ ऑगष्ट, २६ जानेवारी रोजी झेंडा वंदनला येतात.

पोलीस पाटील श्रीमती पद्मजा उर्फ पदमावती दत्तात्रय खेमकर यांचे पती हे गावात येउन दोन नंबर धंदेवाल्याकडुन हफ्ते घेतात, तसेच किराणा दुकान, वारीक, भाजीवाले यांना दमदाटी करुन घेतलेल्या मालाचे पैसे देत नाहीत व माझी पत्नी पोलीस पाटील आहे मी पैसे देणार नाही असा दम देतात. पोलीस पाटलाच्या पतीच्या गुंडगिरी प्रवृत्तीला संपूर्ण गाव कंटाळले आहे.

गावामध्ये कायम स्वरुपी पोलीस पाटील नसल्यामुळे गावातील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस आली आहे. जेणे करुन आमचे गावात सरकारी व्यक्ती आल्यानंतर त्यास मदत करण्यासाठी पोलीस पाटील उपलब्ध होत नाही. तरी अशा कर्तव्यशुन्य पोलीस पाटील श्रीमती पद्मजा उर्फ पदमावती दत्तात्रय खेमकर यांची सखोल चौकशी करुन त्यांना बडतर्फ करावे व योग्य असे कायम स्वरुपी व आमच्या गावात नेहमी उपलब्ध होणारा व्यक्तीची निवड करुन देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

सदरील निवेदनावर त्रिंबक मोरे, वैभव मोरे, भाऊसाहेब जगदाळे, लखन शिंदे, पृथ्वीराज मोरे, प्रतीक मोरे, तुळशीराम जगदाळे, संकेत मोटे, शिवकुमार तळवार, राहुल जाधव, नामदेव मोरे, मोहसीन शेख, सद्दाम शेख अरविंद जाधव, महेश मोरे, अमोल जगदाळे, इंद्रजीत मोरे, राजेंद्र मोरे, विजय विटकर, गणेश कदम, समर्थ कोकाटे, शत्रुघ्न चव्हाण, विजय शिरगिरे, धोंडीराम चव्हाण यांच्यासह ग्रामस्थांच्या मोठ्या संख्येने स्वाक्षरी आहेत

## संसारोपयोगी साहित्य जळून खाक; संसारात पसरला काळोख

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२० मार्च -**

गावात रंगपंचमीचा उत्सव सुरू असताना, एका कुटुंबाच्या घरात फ्रिजवर ठेवलेल्या तेवत्या वातीच्या दिव्याने कपड्याला पेट घेऊन लागलेल्या आगीत संसार उपयोगी सर्व साहित्य जळून खाक झाले. ऐन रंगपंचमी दिवशी सकाळच्या सुमाराला संसाराचा बेरंग झाला. ही घटना जळकोट (ता. तुळजापूर) येथे बुधवार (दि.१९) रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली. याआगीत कुटुंब उघड्यावर आले असून ४ लाखाचे नुकसान झाले आहे.



या आगीचे सविस्तर वृत्त असे की, तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रेमनाथ मठानजीक गणेश मधुकरराव कदम व त्यांचे कुटुंब राहते. या कुटुंबाच्या घरात एका खोलीमध्ये फ्रिजवर सकाळी-सकाळी तेवत्या वातीचा दिवा ठेवण्यात आला होता. त्यानंतर खोली बंद करण्यात आली. कुटुंबातील महिला सदस्य आपापल्या कामात व्यस्त होत्या. या वातीच्या दिव्याने फ्रिजवर असलेल्या कपड्याला पेट घेतला. हळूहळू ही आग पूर्ण खोलीत पसरून खोलीत ठेवलेल्या कपाट, फ्रिज, भांडे, साड्या, कपडे, फर्निचर आदि संसार उपयोगी साहित्य जळून पूर्णतः खाक झाले. आग लागल्याचे खोलीतून धूर आल्यानंतर समजले.

तोपर्यंत आगीत सर्व भस्मसात झाले होते. आजूबाजूच्या शेजाऱ्यांनी आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न केले. परंतु आगीत कुठलेही साहित्य वाचले नाही. सर्व संसारासाठी लागणारे साहित्य जळाल्याने या कुटुंबाचा रंगपंचमी दिवशी संसाराचा बेरंग झाला आहे. गणेश मधुकरराव कदम हे शेतकरी कुटुंबातील असल्याने त्यांचा संसार उघड्यावर आला आहे. याआगीत जवळपास ४ लाखाचे नुकसान झाले आहे. दुर्दैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही.

एका शेतकरी कुटुंबाचा संसार रंगपंचमी दिवशी उघड्यावर आल्याने लोकप्रतिनिधी व शासनाने आर्थिक मदत करावी. अशी मागणी होत आहे.

## उद्या कराळी येथे विशाल बौध्द धम्म परिषद; कपिलवस्तू बुद्ध विहार परिसरात जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० मार्च -**

तालुक्यातील कराळी येथिल कपिलवस्तू बुद्ध विहार परिसरात शनिवारी (दि.२२) होत असलेल्या विशाल बौद्ध धम्म परिषदेची जय्यत तयारी करण्यात आली असून धम्म परिषदेत मोफत आरोग्य शिबीर ठेवण्यात आले असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या धम्मपरिषदेत पूर्णा येथिल भदन्त डॉ उपगुप्त महाथेरो यांची धम्मदेसना होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री संजय बनसोडे,हे असून धम्म परिषदेचे उद्घाटन जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.स्वागताध्यक्ष दिलीप भालेराव आहेत तर परिषदेचे संयोजक भदन्त सुमंगल हे आहेत.



या धम्मपरिषदेत पूज्य भन्ते पय्यांनंद थेरो,भन्ते धम्मसार थेरो,भन्ते सुमेध नागसेन,भन्ते कश्यप,भन्ते अमरज्योती यांची धम्म प्रवचने होणार आहेत.प्रारंभी भिक्षू संघाच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण होणार आहे.पाली पूजा झाल्यानंतर भीम बुद्ध गीतांचाजंगी कार्यक्रम होणार आहे. मार्गदर्शन करण्यासाठी अमरावतीचें खासदार बळवंत वानखेडे, आमदार डॉ.सिद्धार्थ खरात, आमदार राज्यु खरे, कर्नाटकाचे माजी मंत्री सतीश धारकुळी, उद्योगपती पद्मश्री कल्पनाताई सरोज, अनु.जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड.धर्मपाल मेश्राम, रत्नदीप गायकवाड, डॉ.कमलाकर कांबळे, डॉ.श्रीकांत गायकवाड, बौद्धांचार्य मिलिंद कांबळे हे करणार आहेत. यावेळी माजी साखर संचालक डी.आय.गायकवाड, माजी अति.जिल्हाधिकारी राजकुमार सागर, मनोहर सूर्यवंशी, सिद्धार्थ भालेराव, श्रीमंत सुरवसे,प्रा किरण सगर उपस्थित आहेत.या परिषदेत मोठया संख्येने बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष विलास खिल्लारे, उपाध्यक्ष एम.एस.सरपे, सचिव संजीव ओव्हाळ, कोषाध्यक्ष कैलास शिंदे, डी.टी.कांबळे यांनी केले आहे.

डॉ.के.डी.शेंडगे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजचे प्रमुख डॉ.आर.डी.शेंडगे आणि त्यांची संपूर्ण टीम या परिषदेत सहभागी नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी करून औषध उपचार करणार आहेत. धम्मदेसना आणि आरोग्य सुविधा हा दुहेरी कार्यक्रम धम्म परिषदेत घेण्यात येत आहे.

## खुलेआम सुरु असलेल्या ऑनलाईन चक्री जुगाराला कुणाचे अभय?

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० मार्च -**

जळकोट ता. तुळजापुर येथे खुलेआम सुरु असलेल्या ऑनलाईन चक्री जुगाराला कुणाचे अभय? याच्या पाठीमागे कोणत्या आकाचा वरदहस्त आहे. मध्यंतरी धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी सुरु असलेल्या ऑनलाईन चक्री जुगारावर धाडी पडल्या मात्र आजही जळकोट येथे ऑनलाईन चक्री जुगार सुरूच आहे. पोलिसांनी तात्काळ या ऑनलाईन चक्री जुगार चालकाच्या मुसक्या आवळुन हा ऑनलाईन चक्री जुगार बंद करावा, अशी मागणी होत आहे.

या ऑनलाईन चक्री जुगारामुळे अनेक कुटुंबे उध्द्वस्त झाली आहेत. अनेक युवकांसह जेष्ठ नागरीकही या ऑनलाईन चक्री जुगाराच्या आहारी गेले आहेत. अनेकांनी या चक्री जुगारामध्ये लाखो रुपये घातले आहेत. जळकोट येथे दोन ठिकाणी पत्र्याच्या शेडमध्ये हा ऑनलाईन चक्री जुगार सुरु आहे.

मध्यंतरी तुळजापुर येथे सापडलेल्या एमडी ड्रग्स मुळे सर्वत्र खळबळ उडाली होती. यानंतर धाराशिव जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या जिल्हाअंतर्गत बदल्या करून अधिकाऱ्यांची अदलाबदल केली होती. पोलिसांनी एमडी ड्रग्स प्रकरणी योग्य तपास करून यातील आरोपिंच्या मुसक्या आवळल्या आहेत. यातील आरोपी आता जेलमध्ये बंद आहेत.

एमडी ड्रग्स प्रकरणानंतर जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिसांनी कारवाई सुरु केली होती. मात्र जळकोट येथे सुरु असलेला ऑनलाईन चक्री जुगार मात्र आजही बंद झालेला नाही खुलेआम सुरु असलेल्या या ऑनलाईन चक्री जुगाराला कुणाचे अभय आहे? इतका कोणता मोठा आका या चक्री जुगाराच्या पाठीशी आहे जेणेकरून अनेकांना कंगाल करणारा हा चक्री जुगार बंद होत नाही.

नळदुर्ग पोलिस ठाण्याचे नुतन पोलिस निरीक्षक सचिन यादव यांनी तात्काळ जळकोट येथे सुरु असलेल्या ऑनलाईन चक्री जुगारावर कारवाई करून या चक्री जुगार चालकाच्या मुसक्या आवळुन पुन्हा याठिकाणी चक्री जुगार सुरु होणार नाही याची दक्षता घेण्याची मागणीही होत आहे.



## बनावट खरेदी अधारे सातबारा उताऱ्यावर नोंदी घेतल्याची चौकशीची प्लॉटधारकांनी मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

धाराशिव येथील जमीन सर्वे क. १०६ मधील पुर्वीची खरेदी असताना बनावट व खोटया खरेदी अधारे ७/१२ उताजयावर नोंदी घेतल्याबाबत त्याची चौकशी करून संबधितावर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी धाराशिव येथील जमीन सर्वे नंबर १०६ मधील क्षेत्र ८६ आर या जमीनीमधील प्लॉटधारकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे गुरुवारी (दि.२०) केली आहे.

या निवेदनावर फत्तेसिंह साळुंके- देशमुख, लक्ष्मण बाबुराव सरडे, अशोक भिकाजीराव सावंत, विलास शंकरराव गुरव, काकासाहेब नागनाथ आहेर, तुकाराम कोंडीबा शिंदे,

सतरी पंढरीनाथ धाकतोडे, चंद्रकला गोपाळराव भोसले, लक्ष्मण भगवान कवडे, मोहन शिवाजी धावडे, भागवत गोवर्धन मुरवसे, संतोष भाऊसाहेव निंबाळकर, रामचंद्र कुंडलिक जावळे, महादेव चंद्रहार जाधव, विजय बापुराव चव्हाण, गोपाळ पांडुरंग कावरे आदी ३४ जणांच्या स्वाक्षरी आहेत.

## उद्योग मंत्री उदय सावंत यांनी घेतला जिल्ह्याच्या औद्योगिक क्षेत्राचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी १९ मार्च रोजी मंत्रालयातील त्यांच्या दालनातून दृरदश्यप्रणालीच्या माध्यमातून जिल्हयातील औद्योगिक क्षेत्राचा आढावा घेतला.यावेळी त्यांच्या दालनात आमदार सर्वश्री राणाजगजितसिंह पाटील,कैलास पाटील व प्रवीण स्वामी उपस्थित होते. तर जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव,जिल्हा उद्योग केद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे, महावितरणचे अधिक्षक अभियंता श्री.आडे एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी श्री.खाडे,सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे,जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास,औद्योगिक असोशिएशनचे अध्यक्ष प्रवीण काळे व त्यांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



सामंत यावेळी म्हणाले की, जिल्हयात उद्योगाला चालना देण्यासाठी औद्योगीक क्षेत्रात आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दयाव्यात.औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असलेली जमीन संपादीत करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

ज्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्राची आवश्यकता आहे,त्या ठिकाणी उद्योग उभे राहतील व त्या उद्योगामधून रोजगार निर्मितीला चालना दयावी.त्यामुळे रोजगारानिमित्त होणारे स्थलांतर रोखण्यास मदत होईल.औद्योगिक असोशिएशनच्या ज्या अडीअडचणी आहेत,त्या सोडविण्यात येतील.विविध विभागांनी औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी त्यांच्या जबाबदाऱ्या वेळीच पार पाडाव्या, असे सावंत यावेळी म्हणाले.

जिल्हयातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण कराव्यात असे सांगुन श्री.सामंत म्हणाले,जिथे औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करण्यात येणार आहे,ते क्षेत्र सपाट असावे, शक्यतो ती जमीन अतिक्रमीत व वन विभागाची नसावी.शक्यतो शासकीय जमीन असावी,त्यामुळे भूसंपादनाचा मोबदला देण्याचे काम पडणार नाही.

जे उद्योजक औद्योगिक क्षेत्रात उद्योग सुरू करण्यास इच्छुक असतील,त्यांना औद्योगिक क्षेत्रात भूखंड देण्यात येतील, वाशी औद्योगिक वसाहतीत फटाका उद्योगाला जागा देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून यासाठी लागणारी अतिरिक्त जमीन संपादीत करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.असे त्यांनी सांगितले

सावंत पुढे म्हणाले, जिल्हयातील वडगांव, उमरगा, लोहारा, वाशी, तामलवाडी, कौडगावसह अन्य ठिकाणी असलेल्या औद्योगिक क्षेत्राचा विकासाच्या दृष्टीने सहकार्य करण्यात येईल.धाराशिव आकांक्षित जिल्हा असल्यामुळे औद्योगिक विकासाला चालना देवून रोजगार निर्मितीवर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार कैलास पाटील व आमदार प्रवीण स्वामी यांनी जिल्हयातील औद्योगिक क्षेत्राच्या अडीअडचणीबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात यावेळी उपस्थित औद्योगिक असोशिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी देखील श्री.सावंत यांच्याशी संवाद साधून जिल्हयातील औद्योगिक क्षेत्राच्या अडीअडचणी मांडल्या.अडीअडचणी सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल, असे सावंत यांनी सांगितले.

# रोजगार मेळाव्याच्या माध्यमातूनच यशस्वी जीवनाची सुरुवात : डी.पी. सावंत

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २० मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये पहिल्यांदाच रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास विद्यार्थ्यांनीही भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी विद्यापीठाने हा एक चांगला पुढाकार घेतलेला आहे. कारण अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांच्या यशस्वी जीवनाची सुरुवात होत असते, असे मत महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे राज्यमंत्री मा. डी.पी. सावंत यांनी व्यक्त केले.

ते आज दि. २० मार्च रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण, डॉ. हनमंत कंधारकर, कौशल्य विकास केंद्राच्या सहाय्यक आयुक्त रेणुका तमलवार, अरविंद कंग्रालकर, अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, वित्त व लेखाधिकारी मोहमद शकील अब्दुल करीम यांची प्रमुख उपस्थिती होती.



या मेळाव्यास ३२०० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. स्पॉट नोंदणी मध्ये १२०० विद्यार्थी आले आहेत. असे एकूण जवळपास ४५०० विद्यार्थ्यांनी या रोजगार मेळाव्यामध्ये सहभाग घेतला आहे. या विद्यार्थ्यांना रोजगार देण्यासाठी जवळपास ५० कंपन्यांचे प्रतिनिधी मुलाखत घेण्यासाठी आलेले आहेत.

अध्यक्षीय समारोपात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, असे रोजगार मेळावे आयोजन करण्याची ही विद्यापीठाची पहिलीच वेळ आहे. येथून पुढे वर्षातून दोन वेळा नियमितपणे अशा रोजगार मेळाव्याचे आयोजन होणार आहे. त्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपनीसोबत आपण सामंजस्य करार करणार आहोत. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने येथे आलेल्या कंपन्यांना मुलाखत द्यावी आणि यशस्वी जीवनाची वाटचाल सुरू करावी, अशा शुभेच्छाही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिल्या.

या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. बालाजी मुधोळकर, प्रा. डॉ. बी सुरेंद्रनाथ रेड्डी, प्रा. डॉ. शैलेश वाढेर, प्रा. डॉ. कृष्णा चैतन्य, प्रा. डॉ. एल.एच. कांबळे, प्रा. डॉ. निना गोगटे, प्रा. डॉ. सुहास पाठक, प्रा. डॉ. अर्चना साबळे, प्रा. डॉ. योगेश लोलगे, प्रा.डॉ. महेश जोशी, प्रा. डॉ. काशिनाथ बोगले, प्रा. डॉ. राजकुमार मून यांनी परिश्रम घेतले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### राष्ट्रिय बेसबॉल स्पर्धेत सूधा शिंदे यांची निवड

**भोकर**-पंजाब येथे होणाऱ्या सबज्यूनियर राष्ट्रिय बेसबॉल स्पर्धेत मंजूळाबाई किन्हाळकर मूलींचे विद्यालयात इयत्ता नववीत शिकणारी भोकरच्या सूधा शिंदे या खेळाडूची निवड करण्यात आली. दि.२७ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत पार पडणाऱ्या राष्ट्रिय बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ संगरुर (पंजाब) येथे रवाना होणार आहे. या गूणवंत खेळाडूच्या निवडीबद्यल हौशी बेसबॉल असोशिएशन नांदेडचे अध्यक्ष प्रशांत अण्णा तिडके व उपाध्यक्ष नरसिंग अण्णा आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूची निवड झाली महाराष्ट्र बेसबॉल असोशिएशन सचिव राजेंद्र ईखनकर तांत्रिक समिती चेअरमन अशोक सरोदे हौशी बेसबॉल असोशिएशन नांदेडचे सचिव आनंदा कांबळे,बालाजी गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले संघटने तर्फे तसेच मंजूळाबाई किन्हाळकर मूलींचे विद्यालयाच्या मूख्याध्यापिका एस.एन. पाटील सहशिक्षक दिनेश मांजरमकर सह सर्व शिक्षक वृंद सूधा शिंदे हिची निवड झाल्याबद्यल जाहिर सत्कार करण्यात आला व राष्ट्रिय स्पर्धेसाठी खेळाडूंना शूभेच्छा देण्यात आल्या.

### तामसा येथे माकडाने चावा घेतल्याने महिला गंभीर जखमी

**तामसा**-तामसा येथील जुन्या गावात राहणारी महिला कपडे वाळवण्यासाठी छतावर गेली असता माकडाने त्यांचेवर अचानक हल्ला करून जबर चावा घेतल्याने त्या महिला गंभीर जखमी झाल्या असून पुढील उपचारासाठी महिलेला नांदेडला पाठवण्यात आल्याची खळबळजनक घटना दि. १८ रोजी मंगळवारी दुपारी तामसा जुन्या गावात घडली आहे. माकडाच्या दहशतीने महीला, लहान बालकांत भीतीचे वातावरण पसरलेले आहे. वन विभागाने माकडांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी पुढे आली आहे. तामसा गावातील जैन मंदिर परीसरातील अर्चना बालाजी गरड (वय ३८) ही महिला मंगळवारी दुपारी कपडे वाळवण्यासाठी घराच्या छतावर गेली होती. तेथे एका माकडाने त्यांच्यावर अचानक हल्ला करून त्यांना जबर चावा घेतल्याने त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. आरडाओरड केल्यानंतर माकडाच्या तावडीतून त्यांची सुटका झाली. अर्चना गरड यांना तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारास पाठवले होते. तेथे प्राथमिक उपचार करुन त्यांना पुढील उपचारासाठी नांदेडला पाठवण्यात आल्याची माहिती आरोग्य सूत्राने दिली. माकडाच्या हल्ल्यात महिला जखमी झाल्यानंतर अनेकांनी स्थानिक वनपाल व हदगाव वनपरिक्षेत्र अधिकारी यांना भ्रमणध्वनीवरून घटनेची माहिती दिल्याचे सांगण्यात आले. परंतु वनपाल, वनरक्षक किंवा वनपरिक्षेत्र अधिकारी यापैकी कोणीही घटनास्थळी पोहोचू शकले नाहीत. यावरून तामसा वन परिमंडळ वाऱ्यावर सोडण्यात आले की काय? असा प्रश्न सहाजिकच उपस्थित झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वन विभागाने पुढील अनर्थ टाळण्यासाठी माकडांचा वेळीच बंदोबस्त करावा. अशी मागणी पुढे आली आहे.

### नांदेडच्या बुद्धगया मुक्ती आंदोलन महामोर्चात सहभागी व्हावे

**भोकर**-बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले विहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी नांदेड येथे येत्या दि. २५ मार्च रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय - सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केलेले आहे. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली वर्षांनवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापनावर ताबा घेऊन मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल ॲक्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पोहोचल्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे. भोकर शहर आणि तालुका परिसरातून बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने मोर्चा सहभागी होणार आहेत.

### घरकुल मंजुर झाले पण लाभार्थ्यांना बांधकामासाठी वाळुच मिळेना

**हाणेगाव**-सर्वांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने महाराजस्व अभियानांतर्गत दारिद्र्य रेषेखालील तसेच आर्थीक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी आवास योजना आमलात आणली आहे या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रती पाच ब्रास वाळु देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.या निर्णयानुसार जिल्हा प्रशासनाने तालुक्यातील घाट राखीव ठेवले पण मागील दोन महीण्यापासुन वाळु घाट चालु नसल्याने आनलाईन केलेल्या लोकांना याचा त्रास होत आहे आणि लाभार्थी या योजनेपासुन वंचीत राहत आहेत.लोकांना थोड्या पैशात वाळु मिळत नाही याचे दर तर अव्वाच्या सव्वा झाल्या आहेत यामुळे आनेक लाभार्थ्यांचे घर बांधकाम थांबले आहेत काहींनी याचा पर्याय म्हणुन क्रशरचा वापर करीत आहेत वाळुच्या दरात दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळें सर्वसामान्यांना वाळु खरेदी करणे कठीण झाले असुन बांधकाम करावं तरी कसे हा प्रश्न? पडला आहे.बऱ्याच लाभार्थ्यांना खात्यावर थोडेफार पैसे पडले आहेत उर्वरीत रक्कम पुढील कामाच्या स्वरुपावरुन दिली जाते आहे.मग वाळुच नाही तर बांधकाम कसे करायचे आणि उर्वरीत रक्कम उचलायचे कसे असा प्रश्न लोकांना पडला आहे म्हणुन आनेक लोकांचे घर बांधकामाचे स्वप्न भंग तरी होणार नाहीत ना? अशी चर्चा लाभार्थी करीत असताना दिसते आहे.




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह करून ऐतिहासिक क्रांती केली आहे. ही घटना कायमस्वरुपी स्मरणात रहावी यासाठी २० मार्च हा दिवस 'राष्ट्रीय जलदिन' म्हणून घोषित करावा या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महेंद्र पिंपळगावकर यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करून निवासी उप जिल्हाधिकारी महेश वडदकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी सुभाष काटकांबळे, भगवान गायकवाड, बापूसाहेब सावंत, राजू लांडगे, रवि गायकवाड, सुनिल खिल्लारे, रवि गोयल, सिद्धार्थ महागडे, शिलरत्न वाघमारे, श्रीरंग गायकवाड, मोहम्मद जुबेर, मिर्झा शहजाद, सतिश बनसोडे व इतर

# समृद्ध ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षणासाठी प्रत्येक नांदेडकरांनी पुढे यावे : राहूल कर्डिले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० मार्च**

शिलालेखा पासून किल्ल्यापर्यंत आणि मंदिरांपासून कलात्मक बावडीपर्यंत नांदेडकडे शतकानुशतकाचा इतिहास पर्यटनाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या वारस्याच्या रक्षणासाठी गावागावांमध्ये जनजागृती व्हावी तसेच यासाठी शासनासोबतच राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेलाही जिल्ह्यामध्ये प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी व्यक्त केली.

महावारसा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपवनसंरक्षक केशव वाबळे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे, रूक्मिण रोडगे, डॉ. कामाजी डक, वास्तुविशारद स्मिता कासार पाटील हे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा वारसा समितीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील प्रमुख स्मारकांच्या संदर्भात सुरू असलेल्या व प्रस्तावित असलेल्या कामांबाबत चर्चा झाली. प्रामुख्याने होट्टल येथील प्राचीन शिल्प मंदिर, माहूर येथील किल्ला, कंधार येथील किल्ला या ठिकाणच्या पर्यटकांच्या सोई-सुविधांवर चर्चा झाली. या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्यासाठी समिती गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# आय. सी. टी. लॅब हे विद्यार्थ्यासाठी ज्ञानाचा भांडार

**तभा वृत्तसेवा**
**देगलुर, दि. २० मार्च**

शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय येथील आय. सी.टी प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यासाठी वरदान ठरत असून येथील मुख्याध्यापक यशवंत गजभारे यांच्या मार्गदर्शनखाली शाळेमध्ये अनेक उपक्रम राबवण्यात येतात. यापैकी एक उपक्रम सद्या असल्याचे वरदान म्हणून आय.सी.टी लॅब आहे. या प्रयोग शाळेत रामेश्वर वजीरे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.



आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे असून सर्वच ठिकाणी संगणकांचाअ वापर होत आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जग ठेंगणे झाले आहे. डिजिटल इंडियाच्या स्वप्नपूर्तीसाठी शालेय स्तरावरच्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षणाचे धडे मिळणे आवश्यक आहे. आधुनिक काळात टिकायचे असेल तर संगणकाशी मैत्री करावी लागणार हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद राज्य प्रकल्प संचालक यांनी आय.सी.टी हा उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. समग्र शिक्षा अंतर्गत अनेक शाळांना या उपक्रमाचा जास्तीत जास्त फायदा होत आहे. आधुनिक तंत्रांचा वापर करून नेहमीच्या विषय शिकवण्यासाठी व विद्यार्थ्यांची रुची वाढवण्यासाठी येणाऱ्या काळामध्ये विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा निश्चित फायदा होईल असे शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी व्यक्त केले आहे. तसेच या उपक्रमासाठी शिक्षणाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या आहे. त्याचं बरोबर विद्यालयाचे मुख्याध्यापक यशवंत गजभारे हे सतत प्रयोगशाळेची पाहणी तसेच मार्गदर्शन करतात.

# सिमेंट रोड व नळाला पाणी सोडण्याची सिडको-मोंढा भागातील नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० मार्च**

सिडको मोंढा येथे रस्त्याचे काम तात्काळ करावे व या भागाला महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी या भागातील नागरिकांनी मनपा आयुक्त आणि आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. येथील राज अपार्टमेंट ई फ्लॅट क्रं २०१ सिडको मोंढा नांदेड येथे अनेक कुटूंबं वास्तव्यास आहेत. निवेदनकर्ता सूर्यभान कागणे हे नांदेड पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक या पदावर पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जनसंपर्क विभागात कार्यरत आहेत. विशेष म्हणजे ते दिव्यांग असून त्यांचे जांगेपासुन दोन्ही पाय गंभीर अपघातात तुटले आहेत.



अशा परिस्थीतीत ते व इतर दिव्यांग बांधव सिडको मोंढा येथुन दिव्यांगाच्या स्कुटीवर कर्तव्याकरीता येणे जाणे करीत असतात. मनपा तर्फे सिडको मोंढा भागातील संपूर्ण रस्ते खोदुन ड्रेनेज पाईप टाकण्यात आली आहेत. परंतु सिमेंट रोड व नळ योजना चालू करण्यात आली नाही. रोड खोदल्यामुळे मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. तसेच ड्रेनेजचे चेंबर उघडे पडलेले आहेत. ड्रेनेज फुटल्यामुळे पाणी रस्त्यावर येवुन वाहने स्लीप होत आहेत. त्यामुळे रात्री-अपरात्री जातांना ड्रेनेजच्या खड्ड्यात पडून एखादी प्राणहाणीसारखी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच या भागात पाईप लाईन झालेली आहे. परंतु अद्याप नळाला पाणी सोडण्याची व्यवस्था झालेली नाही. नळाला पाणी देत नाही, रस्ते बरोबर नाहीत. पण नळ पट्टी, घर पट्टीची देयके मात्र मनपाकडून नियमीत दिल्या जात आहे.

सध्या सिडको मोंढा भागातील संपूर्ण सिमेंट रस्ते व नळाला पाणी सोडणे ही कामे लवकर करावीत, अशी मागणी या भागातील रहिवाशांनी आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या भागात दिव्यांग अधिकारी, कर्मचारी, तसेच इतर दिव्यांग व्यक्ती सुध्दा राहात असतात. पाऊस पडल्यास दिव्यांग व्यक्तींना अतिशय तातडीच्या प्रसंगी दवाखान्यात उपचाराकरीता सुध्दा जात येत नाही. आता कांही दिवसात उन्हाळा सुरु होणार आहे. उन्हाळ्यात जमीनीतील पाणी पातळी कमी होत असते. अशा वेळी बोरला पाणी येत नाही. पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत आमच्या सारख्या दिव्यांग व्यक्तीची खुप मोठी अडचण निर्माण होत आहे.

सिडको मोंढा भागातील सर्व समस्या सोडविण्यात याव्यात, सिमेंट रस्ते बनविणे आणि नळाला पाणी सोडणे या समस्या लवकर सोडवाव्यात, अशी मागणी नवीन सिडको मोंढा भागातील रहिवाशांच्या वतीने करण्यात आली आहे.

# ग्राम पंचायत भानेगावचा प्रताप

## पुनर्वसनाच्या ५ कोटी रुपयांच्या निधीस लावला सुरुंग

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.२० मार्च**

हदगाव तालुक्यातील मोजे. भानेगाव या ग्रामपंचायतास पुनर्वसनाच्या अंतर्गत आलेल्या ५ कोटी रुपयांच्या निधीस संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांनी संगणमत करून या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या सभागृह, सी.सी. रस्ता, सी.सी.नाली व समाज मंदिर हे पुनर्वसित भागात न करता जुन्या गावात करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करून सदरील कामास तात्काळ स्थगिती देऊन चौकशी करावी तसेच पुनर्वसन प्लॉट मालकी मिळावे या दोन्ही मागण्या पूर्ण करण्याकरिता ग्रामपंचायत सदस्य प्रशांत सिंगनवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे बेमुदत उपोषणास बसले असून आज त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे. तालुक्यात प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत गावात विकास कामांचे नियोजन करण्याकरिता विविध योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत असतो. शासनाचे हे निधी गावात ग्रामपंचायत कार्यालयास भेटल्यानंतर संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचे मनोमिलन झाले तर या आलेली निधीस पद्धतशीरपणे सुरुंग लावण्याचे काम केले जात असते याची मोठ्या प्रमाणावर नागरिकांतून ओरड होतच असते. त्यातील एक प्रकरण म्हणजे मोजे भानेगाव चा असून जिल्हाधिकारी कार्यालयातून पुनर्वसन प्लॉट व निधीची चौकशी करण्याकरिता पत्र निघून सुद्धा संबंधित ग्रामपंचायतचे कर्मचारी यांनी कुठलीही कारवाई न करता एक प्रकारे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत एक प्रकारे आव्हान दिल्यासारखेच दिसत असून संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी याकरिता प्रशांत सिंगनवाड हे बेमुद्दत उपोषणास बसले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली रुजू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० मार्च**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा मेघना कावली यांनी पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी या पदावर कार्यरत असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांची जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे. त्यांच्या जागी शासनाने मेघना कावली यांची नियुक्ती केली आहे.



जिल्हा परिषदेच्या कार्यालयात पदभार स्वीकारल्यानंतर मेघना कावली यांनी सर्व विभाग प्रमुखांची ओळख करून घेतली तसेच विविध विभागांच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला. रुजू झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण विकासासाठी नाविन्यपूर्ण योजना हाती घेण्याचा निर्धार व्यक्त केला. तयावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संतोष तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# नांदेड जिल्ह्यातील अनु. जातीच्या आश्रम शाळांना न्याय द्या!

## शाहु, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचा आंदोलनाचा ईशारा

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २० मार्च**

शाहू फुले आंबेडकर १६५ अनुसुचीत जातींच्या आश्रम शाळांना तगछ्ढ शाळासंहिता लागू करुन नियमित वेतनश्रेणी प्रमाणे १०० टक्के अनुदान देऊन शिक्षकांच्या होणा-या आत्महत्या थांबवने बाबत दि. १९ मार्च बुधवार रोजी शाहू, फुले आंबेडकर, अनु. जाती आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य, नांदेड जिल्ह्याच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री यांना जिल्हाधिकारी नांदेड व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नांदेड यांच्यामार्फत संघटनेकडून निवेदन देण्यात आले.

शाहु, फुले, आंबेडकर, १६५ आश्रमशाळा योजनेते नांदेड जिल्ह्यात एकूण ११ शाळा आहेत. दरम्यान १६५ आश्रमशाळा योजनेत असलेल्या बीड जिल्ह्यातील केळगाव येथील आश्रमशाळेतील शिक्षक धनंजय नागरगोजे सरांनी १८ वर्षापासून वेतन नसल्याने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले. नागरगोजे सरांना श्रद्धांजली वाहून मृत शिक्षकांच्या कुटुंबाला रु.१०,००,०००/- (दहा लाख रुपये) ची आर्थिक मदत देण्यात यावी आशी मागणी केली आहे. शासनाकडून या शाळांना न्याय मिळावा अशी भावना येथील शिक्षक व्यक्त करीत आहेत.



गेल्या अनेक वर्षांपासून शाहू, फुले, आंबेडकर १६५ निवासी आश्रमशाळेत अनुसूचित जातीतील गोर गरिबांची मुले शिक्षण घेतात. अनेक वर्षांपासून या शाळांना न्याय मिळत नाही. मात्र या शाळांना १००% प्रमाणे वेतनश्रेणी नुसार अनुदान मिळावे व व्ही जे एन एटी च्या आश्रमशाळेची संहिता लागू करून कर्मचाऱ्यांना सेवा सात्यत मिळावे अशी मागणी कर्मचारी संघटनेची आहे. महाराष्ट्रातील १६५ आश्रमशाळेच्या सखोल तपासण्या झाल्या यातील अनेक शाळा आश्रमशाळा पात्र होवुन देखील. शासनाकडून दखल घेतली जात नाही तसेच शाहू, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा कर्मचारी संघटने तर्फे ५८ दिवस मुंबई आझाद मैदान येथे साखळी आमरण उपोषण होवुन देखील न्याय मिळत नाही हि फार मोठी शोकांतिका आहे. जर अनुदान मिळाले नाही तर अशा किती आत्महत्या होतील? सांगता येत नाही. अनुदान न मिळाल्यामुळे शिक्षकांच्या पदरी निराशाच आली आहे. एका बाजुला अनुदान नाही दुसरीकडे कुटुंबांचा खर्च भागविणे अवघड चालले आहे.

त्यामुळे आश्रमशाळेतील कर्मचारी चिंताग्रस्त,निराशमय जीवन जगत आहे. याच निराशेतून धनंजय नागरगोजे शिक्षकांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचललेले आहे. सरकारने जर आश्रमशाळांना अनुदान दिले असते तर नागरगोजे सरांचा जीव वाचला असता. सरकार अजुन किती आश्रमशाळेतील शिक्षकांचा बळी घ्यायचा आहे? असा संतप्त सवाल शाहु, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष अविनाश काळे, राज्य सचिव अतिक अन्सारी, राज्य उपाध्यक्ष विलास पवार, अविनाश साखरे, सहसचिव किरण बोरूडे , कोषाध्यक्ष - सी.डी.पाटील, बापूराव पवार यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर राजुरे, जिल्हा जिल्हा उपाध्यक्ष भास्कर मनुरकर, राठोड डि के, बुद्देवार व्ही जी, शिंदे बी डी, वाघमारे आर के, नळगिरे पि बी, भेंडेकर आर जी, बोरगावे ए बी, मरखेले बी डी, घाटे बालाजी, जाधव ए डी, सावळे आर व्ही, बनसोडे बी बी, जाधव एस पि याची उपस्थिती होती.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शेती पिकाच्या नुकसानीसाठी ई-केवायसी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** खरीप हंगाम २०24 मध्ये माहे जून ते आक्टोबर २०२४ या कालावधीत लातूर जिल्हयात अतिवृष्टीने झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून ४६६ कोटी ४0 लाख इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी वाटपाची कार्यवाही डीबीटी प्रणालीमार्फत सुरु आहे.

आजपर्यंत जिल्ह्यातील ३ लाख ८६ हजार ५0५ लाभार्थी मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ३ लाख ५0 हजार ३७३ लाभार्थ्यांना ३८७ कोटी ३४ लाख रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच २४ हजार ३८२ शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी न केल्याने रक्कम २१ कोटी ७७ लाख रुपये इतका निधी वितरीत करणे शिल्लक आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयामार्फत ई-केवायसी प्रलंबित असलेल्या शेतक-यांची गावनिहाय यादी संबंधित गावच्या ग्रामपंचायतीचे ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच याबाबत दवंडी व वर्तमानपत्रात प्रसिद्धी देऊन शेतकऱ्यांना ईकेवायसी पूर्ण करणेबाबत आवाहन करण्यात आले आहे. तरी ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केलेली नाही, अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसील कार्यालय किंवा ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे संपर्क साधून व्हीके नंबर प्राप्त करुन घेऊन नजीकचे आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सुविधा केंद्र (सीएससी) येथे जाऊन ई-केवायसी २५ मार्च २०२५ पूर्वी पूर्ण करुन घ्यावी. संबंधित शेतकरी यांनी ई-केवायसी पूर्ण केल्यानंतरच शासनाकडून डीबीटीपर्यंत शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात मदतीची रक्कम जमा होणार आहे. जे शेतकरी मदतीसाठी पात्र आहेत व अद्याप पर्यंत ई-केवायसी केलेली नाही, अशा शेतकऱ्यांनी मुदतीत ई-केवायसी करुन घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## कुस्तीपटू विष्णू तातपूरे आणि महेश तातपूरे यांचा लातुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागून असलेल्या लातूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थान यात्रेतील कुस्ती स्पर्धेत रायगड ग्रुपचे अमर कोकाटे यांच्याकडून दिले जाणारे ५१ तोळे चांदीचे कडे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील विष्णू तातपूरे आणि केतन हलवाई यांच्यावतीने दिले जाणारे २१ तोळे चांदीचे कडे महेश तातपूरे यांनी जिंकले. त्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. आशिष क्षिरसागर, डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रवींद्र सुरवसे, डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. मनोहर चपळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## आर्टिफिशल इंटेलिजेन्सच्या वापरातून शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळेल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** २१ व्या शतकाच्या मध्याकडे झेपावतांना शिक्षण क्षेत्रात नवी क्रांती घडत असून जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी भारतानेही नव्या शैक्षणिक धोरणात लवचिकता बाळगत अनेक चांगल्या तरतूदी केल्या असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अविष्कार समजल्या जाणाऱ्या आर्टिफिशल इंटेलिजन्सचा स्विकार केल्यास शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळेल असे प्रतिपादन जे.एस.पी.एम. शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण केंद्र, मुरुडच्यावतीने एम.आय.डी.सी. येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या सभागृहात आयोजित शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण टप्पा क्र.५ च्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डायट मुरुडच्या प्राचार्या डॉ. भागीरथी गीरी या उपस्थित होत्या तर मंचावर प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मु.अ. शिवाजी सुर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, मुख्याध्यापक गंगाधर खेडकर, डॉ. संदीप जगदाळे, कासले सर, प्रविण घोरपडे, व्ही.एस. कोळी आदिंची उपस्थिती होती.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात आनंदनगरीचा उत्साह

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'उत्कर्ष २०२४-२५' स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात साजरे होत आहे. स्नेहसंमेलन दरम्यान आनंद नगरीने विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्स उभारले होते.

यावेळी खाद्यपदार्थ विक्रीतून शेकडो रुपयांची उलाढाल झाली. शिवाय, विद्यार्थ्यांना व्यवसायाचे प्रात्यक्षिक ज्ञानही भेटले. आनंदनगरीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बाळासाहेब चव्हाण, क्रीडा संचालक डॉ.नितेश स्वामी, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.मनिषा अष्टेकर, आनंद नगरीचे प्रमुख डॉ.विशाल वर्मा, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. साईनाथ उमाटे, बीसीए विभाग प्रमुख प्रा.शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ.वैशाली सातपुते, कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.सुभाष मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



## हिंदुत्व म्हणजे आत्मोन्नती सोबतच विश्वोन्नती -विवेक घळसासी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** हिंदुत्व ही संकल्पना समजून घेण्यासाठी ठसठशीत बुद्धिवादाची आवश्यकता असते.आत्मोन्नती सोबतच विश्वोन्नती हा हिंदुत्वाचा आयाम आहे. स्वामी विवेकानंदांनी हा विचार आत्मसात करून आयुष्यभर त्याचा वापर केला,असे प्रतिपादन ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी केले.

अभाविप विवेकानंद संस्कार संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात विवेक घळसासी बोलत होते. विवेकानंदांचे हिंदुत्व या विषयावर त्यांनी विचार मांडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजिका मृणाल कुलकर्णी यांची उपस्थिती होती. विषय स्पष्ट करताना विवेक घळसासी म्हणाले की, मध्यंतरीच्या काळात हिंदुत्व हे अशास्त्रीय व कालबाह्य असल्याचा दुष्प्रचार केला गेला. डाव्या समाजवाद्यांनी या कारस्थानाला पाठबळ दिले.




हिंदुत्व हे शेंडी जानव्याचं आहे, असे सांगितले गेले. पण तो हिंदुत्वातील आत्मोन्नतीचा धार्मिक मार्ग आहे. राजकीय अभिव्यक्ती हा हिंदुत्वातील आणखी एक स्तर आहे, असेही त्यांनी सांगितले.

विवेक घळसासी म्हणाले की, हिंदुत्वाचे अनेक पैलू आहेत.हिंदुत्व हे स्वयंभू आणि विश्व कल्याणकारी आहे.कशाची तरी प्रतिक्रिया म्हणून ते तयार झालेले नाही.हिंदुत्वामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना आहे. राष्ट्र हा हिंदुत्वाचा आधार असून वेद व उपनिषदांनी त्याचेच चिंतन केले आहे. ऋषीमुनींनी राष्ट्रीयतेचीच भावना वाढीस लावल्याचे म्हणाले. स्वामी विवेकानंदांनी ईश्वरी तत्वाचा शोध घेताना जगातील इतर धर्माच्या धार्मिक साहित्याचा भाबडेपणा उघड केला.वेद व उपनिषदे हाच हिंदुत्वाचा आधार असल्याचे ते मानत.मानवी जीवनातून मानसिक दौर्बल्य,भीती आणि नशीब हे तीन शब्द काढून टाकले पाहिजेत.हिंदुत्व हा समस्या संपवणारा विचार आहे. त्यासाठी विवेकानंदांनी तरुणांनाच आवाहन केले होते. हिंदुत्वाने कधीही एकट्याच्या कल्याणाचा विचार केला नाही.प्रेम हा हिंदुत्वाचा ब्रम्हांडव्यापी अविष्कार आहे. हिंदुत्व म्हणजे विश्व कल्याणाचे चिंतन आहे, असे विवेकानंदांचे विचार होते. म्हणूनच विवेकानंदांनी मानसिक दौर्बल्य, नशीब यांना थारा दिला नाही.समर्थ व्हा,संघटित व्हा,घाबरू नका, समाजसेवा करा हे तत्व त्यांनी शिकवले. हिंदुत्वात हिंसेला स्थान नाही हे सांगणारे विवेकानंदांचे हिंदुत्व होते. त्यात एकात्म मानवतेचा विचार आहे, असेही घळसासी म्हणाले. आज नियतीने हिंदुत्ववादी विचारांच्या प्रसारासाठी अनुकूल काळ निर्माण केला आहे.त्याचा योग्य वापर करत जात-पात, भाषा व प्रांताचे भेद मानू नका.

पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा आग्रह धरा.स्वधर्म,स्वदेशीचा आग्रह धरा, असे आवाहनही घळसासी यांनी केले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.संस्थेच्या वतीने अध्यक्ष संजय पांडे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात उद्योजिका मृणाल कुलकर्णी यांनी आजच्या कुटुंब व्यवस्थेत मातृशक्तीची भूमिका या संदर्भात विवेचन केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## वाढत्या उन्हामुळे शाळा सकाळच्या सत्रात सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढला आहे. त्यामुळे सर्व माध्यमांच्या शाळा सकाळच्या सत्रात भरवाव्यात, अशी मागणी शिक्षक संघटना समन्वय समितीने केली होती. त्याची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी परवानगी दिली असून, बुधवारपासून शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात येत आहेत. सोमवार ते शुक्रवार सकाळी ८ ते दुपारी १ या वेळेत, तर शनिवारी सकाळी ८ ते ११.३० वाजेपर्यंत शाळांची वेळ राहणार आहे.

मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच तापमानाचा पारा वाढला आहे. जिल्ह्यात शनिवारपासून ४० अंशावर तापमान पोहचले आहे. वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्यात, अशी मागणी जिल्हा परिषद शिक्षक समन्वय समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. या मागणीनुसार सकाळच्या सत्रात शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची सुरूवात बुधवारपासून करण्यात आली आहे. दरम्यान, एप्रिल महिन्यात परीक्षा सुरू राहणार असून, या परीक्षा २५ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहेत. १ मे रोजी निकाल जाहीर झाल्यावर जूनच्या मध्यावधीपर्यंत सुटी राहणार आहे. बुधवारपासून सकाळच्या सत्रात शाळा भरविण्याच्या सूचना प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे आणि माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी सर्व गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापकांना केल्या आहेत. नियमित वेळेनुसार सुरू राहतील. त्यांच्या वेळेत कोणताही बदल करण्यात येऊ नये, अशा सूचनाही शिक्षणाधिकारी यांनी केल्या आहेत.

## सिकंदरपूर ग्रामपंचायतीला पाणी गुणवत्तेचा पुरस्कार




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानचा (२०२२-२३) विभागीय स्तरावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता पुरस्काराचा मान पुन्हा सिकंदरपूर ग्रामपंचायतीस मिळाला. या पुरस्काराने स्मार्ट व्हिलेज सिकंदरपूरच्या सन्मानात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

राज्य शासनाच्या ग्रामविकास, पंचायतराज आणि विभागीय आयुक्त कार्यालयाच्यावतीने मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या गावांची तपासणी करून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा २०२२-२३ मध्ये झाली. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता विशेष पुरस्कार सिकंदरपूर ग्रामपंचायतीस जाहीर होऊन त्याचे वितरण विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगरात झाले. यावेळी महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, अपर आयुक्त के आर. परदेशी, उपायुक्त सुरेश बेदमुथा, साधना जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. रोख ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप होते. हा पुरस्कार सिकंदरपूरच्या उपक्रमशील सरपंच रेश्मा माधवराव गंभीरे यांनी स्विकारला. यावेळी ग्रामविकास अधिकारी के. बी. कलबुने, 'यशदा'चे प्रवीण प्रशिक्षक माधवराव गंभीरे, ग्रामपंचायत कर्मचारी गहिनीनाथ बोयने उपस्थित होते. ग्राम संसद, अंगणवाडी, स्मशानभूमी आयएसआय करून २०२२, २३ मध्ये ग्राम संसद सिकंदरपूरने वेळोवेळी प्रयोगशाळेच्या पाणी तपासणीत चंदेरी कार्ड व ग्रीन कार्ड मिळविले. गावचा शाश्वत विकास करत ग्रामस्थांना स्वच्छ पाणीपुरवठा, सार्वजनिक ठिकाणी हात धुण्यास हॅन्ड स्टेशन, घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक साठवण्यासाठी शेगारिकेशन शेड उभारणी, घंटागाडीद्वारे कचरा संकलन अशा अनेक कामांमुळे सिकंदरपुरास आर. आर. आबा स्मार्ट ग्राम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** तालुक्यातील मुरुड येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागील बाजूच्या एका हॉटेलमधील टेबलवर उभे राहून लोखंडी अँगलला गळफास घेऊन एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी मुरुड पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. संजय बलभीम चव्हाण (वय४0) असे मयताचे नाव आहे. मयताचे नातेवाईक रितेश चव्हाण यांच्या फिर्यादीवरून मुरुड पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही.

## तणावमुक्त आणि आनंदी रहा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** अनेक अडचणी पार करत, संघर्षाला तोंड देत घर आणि नोकरी ही जबाबदारी पेलणे सोपे काम नसते. ते तुम्ही यशस्वीपणे करीत आहात. काळाच्या कसोटीवर स्वत:स सिध्द केलेल्या तुम्ही स्वयंसिध्दा आहात. इतरांसाठी तुम्ही धावता, झिजता, स्वत:साठीही वेळ काढा, तणावमुक्त आणि आनंदी रहा, असा सल्ला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी शहर स्वच्छतेची धुरा वाहणाऱ्या कष्टकरी भगिनींना मंगळवारी दिला.




महिलादिनाचे औचित्य साधून डॉ. भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात राज प्रतिष्ठान व मित्रमंडळातर्फे महापालिकेतील महिला सफाई कर्मचारी व महिला होमगार्डस अशा १८८ महिलांना जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते साडी वाटप करण्यात आल्या. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी महापालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत देशमुख, लातूर 'आएएमए'चे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. विमल डोळे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सुमित्रा तांबारे, हंसराज जाधव, डॉ. हर्षवर्धन राऊत, धनंजय शेळके, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. मंजुषा कुलकर्णी, सुरेखा गरड, डॉ. श्वेता काटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी सर्वांना 'टी.बी.मुक्त भारत'ची शपथ देण्यात आली. जिल्हाधिकारी ठाकूर यांना विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## कोरडा रंग खेळत दिला निसर्ग संवर्धनाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** भारतीय संस्कृतीत वसंताला पवित्र मानले जाते. याला सृजनाचा ऋतू म्हटले जाते. हा काळ निसर्ग, समाज आणि माणसांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणतो. वसंत ऋतूमधील निसर्गाचे, फुलांचे, पक्ष्यांचे सौंदर्य टिपण्याची दृष्टी नवीन पिढीला मिळावी म्हणून सह्याद्री देवराई व सनराईज योगा स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक रंगाची आणि फुलांची उधळण करत रंगपंचमी साजरी करा, असा संदेश शेकडो महिलांनी दिला.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. आरती झंवर आणि डॉ. नम्रता जाजू या उपस्थित होत्या. तत्पूर्वी सनराईज योगा स्टुडिओ संचालिका आणि सह्याद्री देवराईच्या सदस्या नंदिनी पडिले यांनी या उपक्रमामागची भूमिका मांडली. पाणी हेच जीवन आहे. पाणी आहे तर आपले या ग्रहावर वास्तव्य आहे. म्हणून पाण्याचा ऱ्हास टाळणे आज गरजेचे आहे. आम्ही सर्वजणी सह्याद्री देवराईचे सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांच्यापासून सह्याद्री देवराईपासून प्रेरणा घेऊन आज आगळावेगळा निसर्गोत्सव साजरा केला आहे, असे सांगितले.

सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी फोन करून या पर्यावरण पूरक रंगपंचमीचे कौतुक केले. या महिलांनी दीडशे पेक्षा जास्त दुर्मिळ वनस्पतींची माहितीही संकलित केली. ही माहिती पुस्तिका सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांच्याकडे सुपूर्द करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. हा उपक्रम सकाळी ६ ते ८ या वेळेत पार पडला.

## लातुरात तरुणाई भिजली रंगांच्या उधळणीत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** लातूर शहर व जिल्ह्यात रंगपंचमी बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त तरुणाई रंगात न्हाऊन निघाली. तरुणाईसह अबालवृध्दांनीही रंग खेळला. विशेष म्हणजे यंदा नैसर्गिक रंगांचा वापर झाला. केमिकलयुक्त रंग, वार्निस व काचेचे कलर न वापरता तरुणाईने नैसर्गिक रंगांची उधळण करून जल्लोष साजरा केला. शहरातील चौका-चौकात डॉल्बीच्या तालावर नृत्यांची धमाल करीत तरुणाई दिवसभर रंगात चिंब रंगली. चौका-चौकात आणि रस्त्या-रस्त्यांवर तरुणाईच्या जथ्यांनी एकमेकांवर रंगाची मुक्त उधळण केली.

जिल्ह्यात होळीनंतर पाचव्या दिवशी रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. भारतीय संस्कृतीनुसार रंगपंचमीचा सण फाल्गुन मासात येतो. याच कालावधीत वसंत ऋतूचे आगमन होत असल्याने या सणाला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. यंदा




समाधानकारक आणि मुबलक पाऊस झाल्यामुळे तरुणाई रंगात चिंब चिंब न्हाऊन निघाली. शहरात जागोजागी तरुणांनी सप्तरंगांची उधळण केली. विविध गाण्यांच्या तालावर तरुणाई थिरकल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

रंगपंचमीनिमित्त चौका-चौकात रंगाचे पिंप भरुन तरुणाई ओलीचिंब झाली. लातुरात गावभागासह शहरातील विविध ठिकाणी तरुणाईने एकत्र येऊन रंगांची उधळण केली. रंगपंचमीनिमित्त शहरातील संपूर्ण बाजार 'अशोषित संचारबंदी'प्रमाणे बंद होता. रंगांचे स्टॉल, व शीतपेयांची गाडे सोडली तर इतर दुकाने बंद ठेवण्यात आली होती. रस्त्यांवर नागरिक, तरुणांची गर्दी झाली होती. हातात विविध प्रकारचे रंग, पिचकारी, रंगीत पाण्यानी भरलेले फुगे घेऊन रंग लावण्यासाठी तरुण पळत होते. एकमेकांना रंग लावत शुभेच्छा दिल्या जात होत्या. आनंदी व उत्साही वातावरणात शहरात रंगपंचमी साजरी करण्यात आली.

## आर्वी - नांदगाव रस्त्याचे काम निकृष्ट; काँग्रेसने केली अधिकाऱ्याकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च -** मुख्यमंत्री ग्रामसडक योजना भाग - २ अंतर्गत मंजूर झालेल्या आर्वी - नांदगाव रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. या कामात दाणेदार उपआधार, खडीकरण आणि एम.पी.एम.चे काम पूर्ण झाले असून, २० मी.मी. पूर्व मिश्रित जाडीचे काम सुरू आहे. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आ. अमित देशमुख यांच्याकडे आल्या होत्या.

या संदर्भाने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांना सुचना केल्या तसेच काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना रस्त्याचे होत असलेले निकृष्ट काम थांबवून चांगले काम करण्यात यावे, असे निवेदन देण्याच्या सूचना केल्या.




लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव आणि पदाधिकाऱ्यांनी आ. देशमुख यांच्या सुचनेवरुन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांची बुधवारी भेट घेतली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना भाग - २ अंतर्गत मंजूर झालेल्या आर्वी - नांदगाव रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. या कामातील दाणेदार उपआधार, खडीकरण आणि एम.पी.एम. चे काम पूर्ण झाले असून, २० मी.मी. पूर्व मिश्रित जाडीचे काम सुरू आहे. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे होत असलेले निकृष्ट काम थांबवून चांगले काम करण्यात यावे असे निवेदन दिले आहे. यावेळी रविंद्र काळे, समद पटेल, रघुनाथ शिंदे, अनंत बारबोले, सुभाष माने, गोवर्धन मोरे, नितीन पाटील आदी उपस्थित होते.